सहजसुंदर भाषा, नेटके शब्द,
आशयघन विचार यातून साकारणाऱ्या
आकर्षक, प्रभावी निबंधासाठी हवा

म. ग्रं. सं. ठाणे.
विषय निबंध
३४६८

भाग-२ (८ वी, ९ वी, १० वी)

# लेखनवसा निबंधाचा

निबंध, कल्पनाविस्तार, सारलेखन, आकलन,
पत्रलेखन आणि रसग्रहण

REFBK-0026570

डॉ. ललिता गुप्ते

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

ाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे,
यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे
ी भरावी लागले.

SEP 1992

JG 1997

JG 1997

UG 1997

OC 1997

ele

R 1998

4 AP

( क्रु. मा. पहा )
१००००–११–८९

संदर्भ निबंध

३४६७
२६५७०
ग६।१२

३४६७
२६५७०
निबंध ग६।१२

# लेखनवसा निबंधाचा : भाग - २
(इ. ८ वी, ९ वी, १० वी साठी)

**डॉ. ललिता गुप्ते**
एम. ए., एम. एड, पीएच. डी., रा. पंडित, साहित्यरत्न.
पर्यवेक्षिका, न्यू. इंग्लिश स्कूल, टि. रोड, पुणे.

REFBK-0026570

उन्मेष प्रकाशन

उन्मेष प्रकाशन (६६)

लेखनवसा निबंधाचा : भाग -२
(इ. ८ वी, ९ वी, १० वी साठी)

प्रकाशक - मुद्रक :
मेधा राजहंस
उन्मेष प्रकाशन
२६, पर्वती
पुणे ४११ ००९

© डॉ. ललिता गुप्ते
४८९ अ / २ 'गजानन प्रसाद'
व्होल्गा हॉटेलच्या माडीवर,
लक्ष्मीनारायण थिएटरसमोर,
स्वारगेट, पुणे ९

किंमत ५० रुपये

प्रथमावृत्ती :
जानेवारी १९९२

मुखपृष्ठ
धनंजय सस्तकर

टाइपसेटिंग :
प्रमोद प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
११२०, सदाशिव पेठ, पुणे ३०

मुद्रणस्थळ :
स्मिता प्रिंटर्स
प्रमोद वि. बापट
१०१९, सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ, पुणे ३०


निबंध
घाटदार, प्रसन्न शैली
प्रवाही, ओघवती भाषा
घटना, प्रसंग, संवाद
नेमके, नेटके शब्द
आशयघन विचार
संपन्न अनुभवविश्व
आकर्षक प्रारंभ, पकड घेणारा मध्य
आणि विचारांना चालना देणारा शेवट

## ऋणनिर्देश-

मी भाषा विषयाची शिक्षिका. मराठी, हिंदी, इंग्लिश या तिन्ही भाषांचे अध्यापन मी गेली कैक वर्षे माध्यमिक शाळेत (इयत्ता ५ वी ते १० वी या वर्गांना) करत आहे. अध्यापन करताना निबंधवजा प्रश्नांचा अभ्यास– या तासांना मी आणि मुलं वेळोवेळी रंगून जायचो. निबंध म्हणजे काय ? विचार कसे सुचतात ? लेखनासाठी विषयाची निवड कशी करावयाची ? मुद्दे कसे काढतात ? इत्यादी अनेक प्रश्न हे विद्यार्थी मला विचारायचे. त्यांच्या शंकांचे निरसन करताना, त्यांच्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देताना मीही खूप शिकत राहिले. अध्ययन आणि अध्यापन या दोन्ही प्रक्रिया हळूहळू अधिक सखोल, अधिक परिपूर्ण व्हाव्यात म्हणून धडपड सुरू झाली. अनुभवांना उजाळा मिळाला, ज्ञानाला खोली वाढवाविशी वाटली. उमेद वाढली, जिद्द फुलली. या दिशेने उपक्रम करून, संशोधन करून नेमके-नेटके विचार बनून परिपक्वता यायला लागली. हे सारे परिवर्तन ज्यांच्यामुळे घडले, ज्यांच्यासाठी हा सारा प्रपंच मला मांडावासा वाटला त्या माझ्या असंख्य विद्यार्थ्यांना म्हणूनच ही लेखनकृती आज अर्पण कराविशी वाटतीय. कारण त्यांच्यासाठी आजवर केलेल्या अध्यापनाचं, परिश्रमांचं हे बांधेसूद, गोमटं शब्दशिल्प पुढीलांसाठी साकारलंय !

–डॉ. ललिता गुप्ते.

## खास ऋणनिर्देश-

निबंधलेखनाचा अभ्यास म्हणून मी काही प्रयोग केले. मुलांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या. त्यांच्याशी वारंवार चर्चा केली. निबंधाचे तंत्र-मंत्र समजावून देत काही विषय देऊन त्यावर त्यांना बोलते केले, लिहिते केले. त्यांच्या अभिव्यक्तीची चाचपणी करण्यासाठी त्यांना भरपूर वाव दिला, सराव करण्याची संधी दिली. त्यातूनच काही चांगले निबंध समोर आले. योग्य तेवढ्याच दुरुस्त्या केल्या, सुधारणा केल्या. मुलांच्या विश्वात डोकावल्याने, त्यांच्यात रमण्याची संधी घेतल्याने त्यांच्या कल्पना, त्यांच्या भाव-भावना, त्यांचे विचार, त्यांच्या संवेदना हे सारे मला समजू शकले. त्यामुळे त्या त्या वयोगटातील मुलांच्या आवडीनिवडी, त्यांचे प्रश्न हे सारे नव्याने समजले. या साऱ्या प्रयोगात मला अनेकांचे सहकार्य लाभले. त्यांचे ऋण मी मनोमनी जपणार आहेच. काहींचे निबंध मी वानगीदाखल, काहींचे अभ्यासासाठी दिले आहेत.

या प्रयोगात माझ्या सहकारी शिक्षिका सौ. अपर्णा थत्ते, सौ. अनघा जोशी, सौ. प्रिया सप्रे यांचे सर्वोत्तम सहकार्य लाभले. तसेच इयत्ता ८ वी, ९ वी, १० वी तील काही विद्यार्थी, शाळेचे (श्रेयनामावलीत झळकलेले) गुणी माजी विद्यार्थी आणि रेणुका स्वरूप प्रशाळेतील कु. शिल्पा देशपांडे, कु. गीतांजली पंढरपुरे, कु. श्रुती लोंढे (१० अ) संग्राम तुकाराम कदम-- बोर्डात एकूणात ४ था, विषय-मराठी, गुण ८०, सागर गोखले (वक्तृत्वात चमकलेला माजी विद्यार्थी), सूरज कर्णिक-- बोर्डात एकूणात १७ वा, या साऱ्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. यांचा आवर्जून खास उल्लेख म्हणूनच केला आहे.

**- ललिता गुप्ते**

## मनोगत

शिक्षकी पेशातला निरामय आनंद म्हणजे विद्यार्थ्यांच्या हृदयातलं स्थान लाभणं ! त्यांची भक्ती, त्यांची श्रद्धा उदंड लाभणं म्हणजे 'आम्ही चालवू हा पुढे वारसा' अशी मनोमनी मिळालेली कृतार्थ हमी, ग्वाहीच ! संस्थाचालकांचं प्रेरण-प्रोत्साहन, सहकाऱ्यांची साथ, पालकांचा विश्वास, विद्यार्थ्यांची अढळ भक्ती या साऱ्यांमुळे मी अध्यापनात नित्यनूतन उपक्रम, प्रकल्प, प्रयोग करू शकले, अनुभव गाठी बांधू शकले, विचार देऊ-घेऊ शकले.

'व्यक्ती तितक्या प्रकृती' हे जरी खरं असलं, तरीही प्रत्येकात निर्मितीक्षमता-सृजनशीलता थोड्याफार फरकाने कमी-मध्यम-अधिक असतेच असते. सृजनाचा खरा आनंद हा लेखनातून मिळू शकतो. सुरुवातीला शब्द-शब्द जुळवून परिपूर्ण वाक्य, मग अर्थपूर्ण परिच्छेद, मग सुसंगत निबंधलेखन हा असा लेखनप्रवास सुरू होतो. शिकण्याची गोडी लागली की, भाषा विषयात रस वाटू लागतो. वाचन, संभाषण, श्रवण, कथन यांतून अनुभवविश्व समृद्ध होत जाते. आकलनानंतरची पायरी व्यक्तीकरणाची-अभिव्यक्तीची. शिल्पकार शिल्पांतून, चित्रकार चित्रांतून, कलाकार कलेतून, संगीतकार सुरातून आणि रचनाकार, साहित्यकार त्याच्या रचनेतून आणि साहित्यातून कळत-नकळत व्यक्त होतो. साहित्याचा आस्वाद घ्यायला शिकवलं की, मग मुलं झपाटल्यासारखी अवतीभवती डोळसपणे-सूक्ष्म अवलोकनानं पाहयला लागतात. रसिक वृत्ती जागी ठेवून अनुभव मनमुक्तपणे वेचायला, स्वीकारायला पुढे झेपावतात. प्रतिभा अंकुरू लागते, सहजतेने पालावते. शब्द फेर धरायला लागतात, अनुभव बोलायला लागतात. या वेड्यावाकुड्या शब्दांना हळूहळू अर्थ येतो, आकार येतो; एक लय, एक नाद, एक सूर लाभतो. लेखणीची जादू, तिचं कसब कधी कवितेच्या रूपानं तर कधी कथेतून, कधी लघुनिबंधांतून तर कधी नाट्यरूपानं साकारतं. लहानपणी मुलांना अध्ययन-अध्यापनातून असा प्रतिभेचा, सृजनशीलतेचा परीसस्पर्श लाभला की शब्दांचं सोनं करण्याची किमया, हातोटी,

नकळत साधते. लहानपणी निबंधवजा प्रश्न मनापासून, सहजस्फूर्तपणे लिहिता लिहिताच अनुभव घेत घेत, वेचत मोठेपणी ती लेखकूही होतात. हे पाहणं आणि अनुभवणं हा शिक्षकी पेशातील खरा आनंद.

या पुस्तकात म्हणूनच काही गुणी विद्यार्थ्यांचे निबंध आवर्जून देत आहे. त्यांचा पुढील मुद्द्यांच्या आधारे अभ्यास करा. वाचा, विचार करा, पडताळा, पारखून घ्या, बारकावे टिपा, काय हवं काय नको याचा मागोवा घ्या. मग तुम्ही त्याच विषयावर नव्या ओढीनं, उर्मीनं, उमेदीनं लिहायला सुरुवात करा. निर्दोष, बांधेसूद, विषयानुकूल, सुसंगत, आशयघन, विचारप्रवर्तक निबंध तुम्हीही नक्कीच लिहू शकाल.

| | |
|---|---|
| १. प्रारंभ. | ६. भाषा. |
| २. घटना-प्रसंग. | ७. शब्दसामर्थ्य. |
| ३. मुद्दे. | ८. शैली. |
| ४. क्रम. | ९. रचनाकौशल्य. |
| ५. मध्य. | १०. उदाहरणं. |

निबंधवजा प्रश्नांची उत्तरं परिपूर्ण व्हावीत म्हणून भरपूर वाचायला हवं, लिहून पाह्यला हवं. मनन-चिंतन करून अनुभवसंपन्नता मिळवायला हवी. वाचन, लेखन, श्रवण, आवृत्ती, सराव या साऱ्यांचा एकत्र परिणाम होऊनच बांधेसूद, आकर्षक निबंध तुम्हा विद्यार्थ्यांना लिहिता येईल.

चालक, पालक, शिक्षक यांनी मुलांना वेळोवेळी विविध अनुभूती द्यायला हव्यात. ज्ञान परजल्याशिवाय, बुद्धी वापरल्याशिवाय, विचारांना दिशा मिळाल्याशिवाय, जिज्ञासेला, कुतूहलाला खतपाणी घातल्याशिवाय, कल्पनेला पंख फुटल्याशिवाय, धुमारे फुटल्याशिवाय नवनवोन्मेषशालिनी प्रतिभा तुम्हा-आम्हाला वश होऊ शकणार नाही. म्हणूनच मुलांना पाह्यची, बोलायची, वाचायची, लिहायची भरपूर संधी वारंवार उपलब्ध करून द्यायला हवी, तरच लेखनवसा फलद्रूप होऊ शकेल.

*

## अनुक्रम–


■ **भाग १–**

१. निबंध म्हणजे–
२. निबंधाची पूर्वतयारी.
३. हा वसा घेऊ या.
४. निबंध– विविधांगी प्रकार.
५. यशाची पंचसूत्री.

■ **भाग २ –**

**(अ) वानगीदाखल निबंध**

१. माझी मायबोली.
२. शब्दांचे सामर्थ्य.
३. निर्माल्यातले फूल बोलू लागले.
४. जगात आरसा नसता तर.
५. मोठेपणातील दुःखे.
६. आदर्श विद्यार्थी : माझ्या कल्पना.
७. प्रतिज्ञा कशी ? कशासाठी ?
८. रिकामा फ्लॅट बोलू लागला तर–
९. सुसंस्कार : काळाची गरज.
१०. एकविसाव्या शतकातील ~~शाळा.~~ भारत
११. लोकशाहीत वृत्तपत्रांचे स्थान.
१२. भाकरी बोलू लागली.
१३. मी पाऊलवाट बोलतेय !
१४. महाबळेश्वर : एक रमणीय स्थळ
१५. आला श्रावण श्रावण !
१६. वेळेचा सदुपयोग.
१७. व्रतवैकल्ये आणि आम्ही.

## (ब) अभ्यासासाठी

१८. जय स्वावलंबन.
१९. एका शेतकऱ्याचं मनोगत.
२०. माझी मायबोली.
२१. नको विषमता, हवी समता.
२२. दानात दान.
२३. एकविसाव्या शतकातील शाळा.
२४. तुकयाची अभंगवाणी.
२५. भिंतीवरी कालनिर्णय असावे.
२६. माझी मायबोली.
२७. माझे ध्येय.
२८. निरोपाचा क्षण.
२९. मी केलेले वृक्षारोपण.
३०. मनाचे श्लोक : एक संस्कार.
३१. 'चिमणीपासुनि शिकुनि घेई !'
३२. उंचीचे फायदे-तोटे.
३३. माझे जीवनगाणे.
३४. माझा आवडता महिना— श्रावण.
३५. श्रमाचे मोल.
३६. आदर्श विद्यार्थी : माझ्या कल्पनेतला.
३७. जीवन हीच एक शाळा

## (क) सरावासाठी

३८. मानवतेचे उपासक – महात्मा फुले.
३९. देश हा देव असे माझा.
४०. सुसंगती सदा घडो.
४१. पाटीचे मनोगत.
४२. निरोप घेताना... शाळेचा.

३४६५ २६५६० निबंध मराठी ०२

४३. आजचे विद्यार्थी हीच समस्या.
४४. आजच्या विद्यार्थ्यांच्या समस्या.
४५. राष्ट्रीय एकात्मता आणि मी !
४६. एका दलिताचे मनोगत.
४७. माझा आवडता कवी.
४८. भ्रष्टाचार ! भ्रष्टाचार ! भ्रष्टाचार !

■ **भाग ३–**
१. आकलन.
२. सारलेखन.
३. रसग्रहण.
४. कल्पनाविस्तार.
५. पत्रलेखन.

■ **परिशिष्ट**
(अ) विषय (सरावासाठी)
(ब) सुविचार (विस्तारासाठी)
(क) कल्पनाविस्तार.

*

# भाग - १

# निबंध म्हणजे

विद्यार्थिमित्रांनो,

मराठी विषयाचे अध्ययन-अध्यापन करताना एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की तुमची आमची गाडी अडते, अडखळते ती निबंध लिहिताना ! गद्य वा पद्य प्रश्नांची उत्तरे लिहिताना न थांबता, न अडता तुमची लेखणी जणू धावत सुटते. पण तीच दिलेल्या विषयावरील निबंध लिहिताना मात्र अडेलतट्टूसारखी पावलागणिक अडते. शब्द लिहिण्याऐवजी खोडण्यातच वेळ आणि शक्ती खर्ची पडते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सरावाचा अभाव. दिशा निश्चित असली तर पाऊल योग्य पडते. तसेच निबंध म्हणजे नक्की काय, हे सुस्पष्टपणे समजले तरच निबंधाचा सराव सुरू होतो आणि सराव करता करता निबंधाचे तंत्र अन् शास्त्र नकळत अवगत होते. निबंधाबद्दल जेव्हा मी तुमच्यासारख्या विद्यार्थ्यांशी, मराठी विषय शिकविणाऱ्या शिक्षकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या, चर्चा केली तेव्हा विविधांगी प्रतिक्रिया मला अनुभवायला मिळाल्या. काही बोलक्या प्रतिक्रिया वानगीदाखल अवलोकनार्थ देत आहे.

बोलक्या प्रतिक्रिया—

१. निबंध म्हणजे विचार, माहिती, अनुभव, आविष्कार यांचे एकत्रीकरण.

२. निबंध म्हणजे सुसंगत, सलग विचार. विविध प्रकारच्या माहितीचे संकलन. आपल्याला आलेल्या अनुभवांचे अलंकारिकरीत्या आणि हृदयाला भिडणाऱ्या भाषेत वर्णन. आपल्या मनातील भावभावना, संवेदना आणि मतांचा

आविष्कार.

३. दिलेल्या विषयाला अनुसरून प्रारंभ-मध्य-शेवट या क्रमाने, मुद्देसूदपणे केलेली तर्कशुद्ध मांडणी म्हणजे निबंध.

४. निबंध (नि + बंध) (नि + बध्) याचाच अर्थ बांधणे, जुळवणे. निबंधात आपण दिलेल्या विषयांच्या अनुषंगाने आपल्या मनातील सुयोग्य विचार आकर्षक-ढंगदार शैलीत, सहजसुंदर भाषेत केलेली बांधेसूद जुळणी, मांडणी, सुबक बांधणी.

५. कागदावर काही ठराविक ओळी खरडणे, उतरवणे, लिहिणे म्हणजे निबंध नव्हे. दुसऱ्याचे उसने न घेता वाचून, ऐकून, पाहून मिळालेल्या माहितीच्या, अनुभवांच्या आधारे मनन, चिंतनातून स्वतःचे स्वतंत्र, सहजस्फूर्त विचार मांडणे म्हणजे निबंध लेखन करणे.

६. निबंध– वैचारिक, कल्पनात्मक, निवेदनात्मक, लघुनिबंध अशा कुठल्याही प्रकारचा असू दे. त्यातलं मर्म हेच आहे की, मांडणीत एक क्रम असतो, सुसंगती असते.

७. आपण ऐकलेली, पाहिलेली, अनुभवलेली, वाचलेली माहिती संकलित करून तिची सूत्रबद्ध टप्प्याटप्प्याने रचना करणे म्हणजे निबंध लिहिणे. निबंधाचा प्रारंभ, मध्य आणि उपसंहार हे तीन महत्त्वाचे टप्पे निबंध लेखकाला यशस्वीपणे हाताळावे लागतात. हे टप्पे एका विशिष्ट सूत्राने, सुसंगत क्रमाने, धाग्याने, एका वैचारिक साखळीने एकमेकांना जोडता येणे म्हणजे सुंदर, आकर्षक निबंध लिहिणे.

८. निबंध म्हणजे दिलेल्या विषयावर पूर्वानुभवाच्या आधारे, स्वतंत्र विचाराने केलेली सहजस्फूर्त कौशल्यपूर्ण रचना, मांडणी होय. परिश्रमपूर्वक, विचारपूर्वक केलेली बांधेसूद रचना म्हणजे निबंध.

आता या सर्व प्रतिक्रियांचे, मतांचे, विचारांचे मनन-चिंतनाच्या आधारे गवसलेले नवनीत म्हणजेच सारगर्भ संकलन पुढीलप्रमाणे (अभ्यासासाठी) आहे. तुम्ही-आम्ही यातले बारकावे टिपले पाहिजेत, मथितार्थ लक्षात घेतला पाहिजे आणि पूर्वानुभव पडताळून पाहत निबंधाची सुस्पष्ट कल्पना, संकल्पना समजावून, पारखून घेत हळूहळू ती आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

निबंध म्हणजे लेखकाच्या मनातील एखाद्या विषयासंबंधी मांडलेले विचार.

सहजसुंदर भाषा, शब्दालंकार आणि अर्थालंकारांचा सजावटीसाठी केलेला माफक उपयोग, विषयाला साजेशी मांडणी, सुबद्ध, घाटदार, सुबक रचना म्हणजे निबंध. लेखकाला विषयाचे, वेळेचे, आकाराचे, प्रकाराचे, शब्दसंख्येचे बंधन यात निश्चितच असते. मनाला वाटेल तसे, सुचत जाईल तसे भरकटत लिहीत सुटणे म्हणजे निबंध नव्हे. निबंधातून नेमके काहीतरी सांगायला, सुचवायला हवे. ठोस, आशयघन विचार, आत्मविश्वासपूर्ण तर्कशुद्ध पद्धतीने मांडलेली मते म्हणजे निबंध. निबंधातून माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचे, भावभावनांचे, विचारांचे, बुद्धीचे दर्शन घडायला हवे. निबंध हा एक सहेतुक, विचारप्रवर्तक, आकर्षक, कलात्मक लेखनप्रकार आहे. दर्जेदार लेखनाची पूर्वतयारी अनुच्छेदलेखन, आकलन, सारलेखन, कल्पनाविस्तार, रसग्रहण इत्यादी विविध प्रकारच्या अभ्यासातून, सरावातून कळत-नकळत, प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष होत असते. मराठी भाषा, ज्ञान आणि अनुभव यांची खरी कसोटी म्हणजे निबंध लेखन. साधा विषय, मोठा आशय, रसाळ, प्रवाही भाषा, वैचारिक समृद्धी, आकर्षक-प्रभावी वर्णनशैली, कल्पकता या साऱ्यांचा सुरेख मेळ म्हणजे परिपूर्ण, ठोस, निबंध. विषय वाचल्यावर मनात येणारे विचार विविध मुद्द्यांच्या आधारे परिच्छेद पाडून सुसंगत मांडणे म्हणजे मनासारखा, दुसऱ्यांना वाचावा वाटावा असा निबंध लिहिणे होय.

प्रत्येकाच्या मनाची विशिष्ट बैठक असते. विचारांची, कल्पनांची एक विशेष झेप असते. भावनोत्कटता प्रत्येकाची वेगवेगळी असते. लिहिण्याची धाटणी व्यक्तिपरत्वे बदलती असते. प्रतिभेचे लेणे प्रत्येकाला कमी-अधिक प्रमाणात पण वेगवेगळ्या प्रतीचे लाभलेले. भाषा, संवेदना, क्षमता, कुवत, भावभावना, अनुभवविश्व, विचार या साऱ्यांत व्यक्ती-व्यक्तीनुसार वेगळेपणा, नवीनता, वैचारिक दृष्टिकोण, मासिक स्थिती, जीवनाची संपन्नता, जीवनविषयक दृष्टी या साऱ्यांचा एकत्रित परिणाम निबंधात दिसतो, डोकावतो, जाणवतो.

गुजगोष्टी, ललितनिबंध, लघुनिबंध हे निबंधाचे पोटप्रकार आहेत. निबंधाचा जन्मच मुळी काहीतरी सांगण्यासाठी, सुचविण्यासाठी, प्रेरणा देण्यासाठी, जाणीवजागृती करण्यासाठी, दिशा देण्यासाठी, मार्गदर्शन करण्यासाठी झालाय. सुरुवातीचे निबंध पांडित्यामुळे, भाषेमुळे, मांडणीमुळे बोजड वाटत. विष्णुशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गोपाळराव आगरकर, शि. म. परांजपे, न. चिं. केळकर, स्वातंत्र्यवीर सावरकर आणि श्री. व्यं. केतकर यांना मराठी साहित्यातील

निबंध लेखनाचे सप्तर्षी मानले जाते. निबंध लेखकाची भूमिका त्रयस्थाची, तटस्थाची हवी, तरच ठोस, तर्कशुद्ध विचारप्रवर्तक निबंध वाचकांच्या हृदयापर्यंत पोहोचू शकतो. अशा निबंधात तोटके-तोकडे, एकांडे विचार नसतात, तर अभ्यासपूर्ण, सर्वंकष, संतुलित, वाचकाला पटतील, स्वीकारावेसे वाटतील, आपलेसे वाटतील असे आशयघन नेटके, नेमके विचार असतात. विषय एकच असला तरी लिहिणाऱ्याच्या मनाची बैठक, अनुभूती, अनुभव, परिस्थिती, वातावरण, विचारशक्ती, आकलनक्षमता, व्यक्त करण्याची कुवत, रचना, पद्धती, मांडणी, शैली, भाषा, यांत विविधता असल्याने लिखाणात निराळेपणा, वेगळेपणा आढळतो.

विचारांची सुसूत्र, कल्पनात्मक गुंफण म्हणजे निबंध. ज्ञान, कौशल्य, कल्पकता, शैली आणि संयोजन यांची सुयोग्य जुळणी झाली की बांधेसूद निबंध तयार होतो. निबंध हा सहेतुक, कलात्मक लेखनप्रकार असून तो बुद्धीला, विचारांना, कल्पनांना चालना देणारा साहित्यप्रकार असतो. गुजगोष्ट, ललितनिबंध, लघुनिबंध असे उपप्रकार आहेत.

निबंधात पुढील गोष्टी महत्त्वाच्या आहेत.

१. विषयनिवड.

२. प्रारंभ, मध्य, शेवट.

३. मुद्दे.

४. मांडणी, रचना.

५. भाषा (अलंकार, सौष्ठव)

६. सारगर्भ विचार.

७. शैली.

८. सुसंगती, क्रम.

वाचा, विचार करा, पडताळून पहा, अनुभवा.

**नि–** निवडक्षमता, निश्चितता, निरीक्षणशक्ती.

**बं–** बंधन– (वेळ, मुद्दे, शब्द, वाक्यरचना, आकारमर्यादा)

**ध–** धनिकता– ज्ञान, अनुभव, विचार.

इंग्लिशमध्ये निबंधाला Essay म्हणतात. त्या दृष्टीने विचार करता निबंधात पुढील गोष्टींचा अंतर्भाव अपेक्षित आहे. निबंधाची वैशिष्ट्ये, गमके पुढीलप्रमाणे

आहेत.

**E**– Effective– परिणामकारक, भारून टाकणारा.

Essence– सार, आत्मा.

**S**– Speed, Selective Experience– गती, मोजके– निवडक अनुभव.

**S**– Systematic– नीटनेटका, पद्धतशीर.

Style– शैली, धाटणी. Stylish– शैलीदार.

**A**– Atractive– आकर्षक.

**Y**– Yippee – सहजोद्गार.

**निबंधलेखनाचे हेतू–**

१. सन्मित्राप्रमाणे हितगुज करणे.
२. सुख-दुःखे व्यक्त करणे.
३. आत्माविष्कार.
४. मुक्त चिंतनातून चालना देणे.
५. प्रेरणा, मार्गदर्शन.
६. जाणीवजागृती.
७. दोषदिग्दर्शन.
८. प्रबोधन, उद्बोधन.
९. ज्ञान.
१०. रंजन.
११. निखळ आनंद.
१२. अनुभूती.
१३. जवळीक साधणे.
१४. मतांचे खंडण-मंडण– मतप्रतिपादन.

स्वातंत्र्यापूर्वीच्या काळात जनजागृती, लोककल्याण आणि दिशा दाखवणे, इष्ट वळण लावणे या हेतूंनी क्रांतिकारकांनी, समाजसेवकांनी, देशभक्तांनी, विचारी ज्ञानवंतांनी आपल्या लेखणीला मनमुक्तपणे झरू दिले. रमत-गमत, रंगत-रेंगाळत जीवनातील संपन्नता आणि जगातला रसरशीतपणा याही गोष्टी

त्यांनी मार्मिक भाषेत, नेटक्या शब्दात टिपल्या. यानंतर भाषेच्या अभ्यासात आकलन-अभिव्यक्तीला महत्त्व प्राप्त झाले आणि पाठ्यपुस्तकात अंतर्भूत केलेले लेखनप्रकार म्हणजे बहुविध निबंधलेखन परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत अंतर्भूत झाले.

*

# निबंधाची पूर्वतयारी

कुठल्याही समारंभाची, कार्यक्रमाची यशस्विता परिपूर्ण अशा नियोजनावर अवलंबून असते, तसेच आदर्श निबंध लेखनासाठी सर्वंकष विचार करून केलेली पूर्वतयारी अत्यावश्यक असते. प्रवासाला जाण्यापूर्वी आपण पूर्वतयारी करतो आणि आयत्या वेळचा गोंधळ, निराशा, ताणतणाव, कटकट टाळतो. वर्षभराचा सातत्याने केलेला अभ्यास, प्रश्नपत्रिकांचा सराव ही परीक्षेत हमखास यश मिळविण्यासाठी केलेली जोरकस पूर्वतयारीच असते. पूर्वनियोजित तयारीमुळे पुढील फायदे होतात.

१. आत्मविश्वास वाढतो.

२. लेखनाला, विचारांना सुयोग्य दिशा मिळते.

३. वेळ वाचतो.

४. लिखाणाला वेग येतो.

५. भय न वाटता सहजता, सोपेपणा वाटतो.

६. सृजनातला आनंद मिळतो.

७. नेमकेपणा, नेटकेपणा येतो.

८. गोंधळ न वाटता स्थिरता येते.

९. मनाची तत्परता वाढते.

१०. विचारांना सुस्पष्टता येते.

११. विषयाची निवड चटकन आणि अचूक करता येते.

१२. आशयघनता आणि सारगर्भता वाढते.

१३. निबंधलेखनाचा बाऊ न वाटता ती सहजसाध्य कृती वाटायला लागते.

अशी ही फायदेशीर, किफायतशीर, आवश्यक पूर्वतयारी करावयाची कशी, हे पुढील बोलक्या आकृतीवरून तुम्हा मुलांना चटकन कळू शकेल, अचूकपणे हेरता ओळखता येईल.




एखादी कलाकुसरीची वस्तू तयार करताना सुरुवातीला छोट्यामोठ्या, विविध आकाराच्या, रंगांच्या वस्तू आपण गोळा करतो आणि मग कल्पकतेनं त्यांची आकर्षक मांडणी करून, कलात्मकतेची, कलाकुसरीची जोड देऊन त्या सर्वांचा सुरेख मेळ साधत एक नवी नयनवेधक वस्तू बनवितो. त्याप्रमाणे आपण अनेक गोष्टींचा संचय करतो, संग्रह करतो, टिपण करतो, नोंदी करतो, आस्वाद घेतो, परीक्षण-रसग्रहण करतो, माहिती संकलन करतो, अनुभव वेचतो आणि मग विषयाची निवड केली की मुद्दे आठवतो, पूर्वानुभव तपासून पाहत आडाखे

बांधतो, विचारांची सुसंगत गुंफण करतो आणि एक बांधेसूद, अर्थपूर्ण निबंध शब्दांकित होतो, साकारतो. आत्मविश्वास वाढविणारी, चालना देणारी, दिशा दाखवणारी आणि ऐनवेळी परीक्षेच्या मंडपात मदतीला धावणारी ही पूर्वतयारी म्हणूनच खास महत्त्वाची, अत्यावश्यक.

*जे जे वाचेन चांगले ।*
*ते ते टिपून ठेवीन ॥*
*जे जे दिसेल, पाहीन ।*
*आणि स्मृतीत राखीन ॥*
*जे जे श्रवणे ऐकेन ।*
*पारखुनि ते घेईन ॥*
*वाचनाने, श्रवणाने ।*
*ज्ञानकण मी वेचेन ॥*
*मननाने, चिंतनाने ।*
*सूत्र, सार साठवीन ॥*

अशी संचय वृत्ती हवी. प्रचार-प्रसार माध्यमे, दूरदर्शन, आकाशवाणी, वृत्तपत्रे यांच्याशी आपण जवळीक साधायला हवी. नीर-क्षीर विवेकी दृष्टीने योग्य ते निवडण्याची आणि वाईट ते त्यागण्याची संतुलित, विचारी, विवेकी, साक्षेपी वृत्ती हवी. अवतीभवतीच्या परिसरातून, वातावरणातून, संभाषणातून, व्यक्तिपरिचयातून, घटना-स्थल-प्रसंग यांच्या अनुभवातून आपण भ्रमरवृत्तीने नेमके, योग्य, अचूक ते उचलले पाहिजे, आठवणीत साठविले पाहिजे आणि वेळेवर आठवणीत स्मरणात ठेवून योग्य ठिकाणी संदर्भ दिले पाहिजेत, दाखले दिले पाहिजेत, शब्दबद्ध केले पाहिजे.

**वाचन–**

समर्थ रामदासांचा, 'दिसामाजी काहीतरी लिहीत जावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे' हा उपदेश शिरोधार्य मानून पाठ्यपुस्तकांखेरीज इतर खूप पुस्तकांचे वाचन समजून उमजून (अवांतर वाचन) करायला हवे. विचारपूर्वक, सोद्देश केलेल्या वाचनामुळे पुढील अनेक फायदे होतात.

१. ज्ञानकक्षा रुंदावते.

२. अनुभवविश्व समृद्ध होते.

३. व्यवहारज्ञान वाढते.

४. भाषाज्ञान- सहज, सोपी, आकर्षक भाषा नकळत आत्मसात होते.

५. शब्दज्ञान, शब्दसंपत्ती.

६. भाषाशैलीचे विविध नमुने नकळत माहिती होतात.

७. रचनाकौशल्य, लेखनतंत्र यांची ओळख.

८. जाणीवजागृती.

९. विचारांना दिशा मिळते, नवनवीन विचार सुचू लागतात.

१०. चिंतनशीलता वाढते.

११. आकलनक्षमता वाढते.

१२. अभिव्यक्तीला वाट गवसते.

१३. लेखणीला प्रेरणा मिळते.

श्रवण, वाचन, संभाषण, अवलोकन, मनन, चिंतन या सहा गोष्टींमुळे आपली लेखनकला हळूहळू विकसित होते. सरावाने आत्मविश्वास दुणावतो. पूर्वतयारीत नमूद केलेल्या कितीतरी गोष्टींचा संचय ही सहा कौशल्ये आत्मसात झाली की कळत-नकळत होतो. वाचनाने स्मरणशक्ती धारदार, बलदंड बनते. निबंधासाठी विषय निवडल्यावर अनुभवांचे वर्गीकरण होऊन आवश्यक मुद्द्यांची क्रमवार नोंद होते. त्याला अनुषंगिक असे विचार, कल्पना, वाक्ये, शब्द, प्रसंग (ऐकलेले, वाचलेले, अनुभवलेले, पाहिलेले) आठवू लागतात. त्यांचा क्रम, प्रत, संगती, मांडणी नकळत ठरते आणि जुळणीची, गुंफणीची प्रक्रिया सुरू होते. हे सारे वाचन, मनन, चिंतन, श्रवण, लेखन या साऱ्यांमुळे अनुभवसंपन्नता, बहुश्रुतता वाढते. यातूनच विचार, मुद्दे, रचना, मांडणी यांना घाटदार आकार प्राप्त होतो. हस्ताक्षर, भाषाशुद्धी, वेग या गोष्टी अभ्यासाने, सरावाने अंगी मुरतात, बाणतात.

*

## हा वसा घेऊ या–

१. अनुभवविश्व समृद्ध करू या. चिकित्सक बुद्धी, तर्क, वेचक, वेधक, डोळस दृष्टी, सजगता, सतर्कता, सावधानता, विवेकशीलता आणि वैचारिकता या साऱ्यांमुळे आपले अनुभवविश्व बनते, तयार होते. व्यक्तीनुसार ते बदलते असते, कमी-अधिक प्रतीचे ठरते. *(अनुभवविश्व समृद्धीसाठी हा तक्ता पुढील पानावर आहे.)*




अनुभवविश्व समृद्धीसाठी
ग्रंथवाचन
विविधकला आस्वादन कलाविष्कार
परिसर अभ्यास
व्यक्ती, मित्र परिचय
भेटीगाठी, मुलाखती
दैनंदिन विज्ञान
प्रवास, यात्रा
बाह्य समाज वातावरण
गिरिभ्रमण
विशिष्ट घटना प्रसंग
कीर्तन, प्रवचन, व्याख्यान
निसर्ग
प्रदर्शन
शेजारी आप्तस्वकीय
सभा, संमेलन चर्चा, मेळावे चर्चासत्र कृतीसत्र
प्रचार प्रसार माध्यमे
ग्रंथालय
पाठ्यपुस्तक
निरीक्षण परीक्षण समीक्षण

२. निवडलेल्या विषयाचा सर्वांगीण विचार करू या.




३. ज्ञानेंद्रिये परजू या.

एकाग्र श्रवण, सूक्ष्म निरीक्षण, डोळस दृष्टी, उत्कट जिज्ञासा, संवेदनशीलता, विचारक्षमता, जाणीव-जागृती, सावधानता, रसिकता, ग्रहणक्षमता, संग्रहवृत्ती या साऱ्यांच्या मुळाशी आपली (कमी-जास्त प्रमाणात) परजलेली ज्ञानेंद्रिये आहेत, हे लक्षात ठेवून वागू या. बुद्धी वाढावी म्हणून आणि न वापरल्याने तिला गंज चढू नये म्हणून आपण ज्ञानेंद्रिये सतत परजती, सक्षम ठेवायला हवीत.

कल्पनेची भरारी, अनुभवांची समृद्धी, विचारशक्तीला गती या साऱ्यातून संभवतो कलात्मक निबंधाचा आविष्कार. सहजसुंदर भाषा, नेमके विचार, नेटके शब्द, यातून साकारणारा आकर्षक, प्रभावी निबंध तुम्ही-आम्हीही लिहू शकू, म्हणूनच घ्यायला हवा वर सूत्ररूपाने नमूद केलेला, 'लेखनवसा निबंधाचा !'

निष्ठेने वसा घ्या, श्रद्धेने जोपासा; अभ्यासाने, सरावाने वसा वाढता ठेवा.

छान छान निबंध लिहून गुण मिळवा, शाबासकी मिळवा आणि मुख्य म्हणजे चांगले लिहिण्यातला निखळ आनंद लुटा, अनुभवा.

*

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
३४६५
२६५५०

# निबंध-विविधांगी प्रकार

**वर्णनात्मक निबंध**

ज्ञात असलेल्या माहितीची केवळ नोंद करणं म्हणजे वर्णन करणं नव्हे. वर्णन हुबेहूब हवं, आकर्षक हवं, चटकदार हवं. वाचणाऱ्याला ते पटायला, रुचायला हवं. ते असं कौशल्यपूर्ण, परिणामकारक हवं की वाचकाला परिणामकारक वाटून त्याच्या नजरेसमोर ते चित्र साक्षात उभं राहयला हवं. अनुभूती जाणवायला हवी. वस्तू, स्थळ, घटना, प्रसंग, व्यक्ती, प्रवास, प्रदेश, निसर्ग, परिसर यांपैकी कशाचंही वर्णन या प्रकारात मोडतं.

वर्णनात्मक निबंध लिहिताना—

१. प्रसन्न, रसाळ शैली असावी.

२. भाषा सहजसुंदर, नेमकी, प्रवाही असावी.

३. विषयाचा मागोवा घेत मुद्दे क्रमवार मांडले जावेत.

४. विषयानुसार निबंधाचा आकार-विस्तार निश्चित करावा.

५. वर्णनात पाल्हाळ नको, बटबटीतपणाही नको. वर्णन सूचक, नेमकं, रंजक असावं. अतिरंजित नसावं.

६. उत्कंठा वाढविणारा प्रारंभ.

अनुभूती देणारा मध्य.

मनात रेंगाळत राहणारा शेवट.

आणि उपमांची सुरेख पखरण, रसिकतेनं रेखाटलेलं चित्रण.
७. वर्णनात नेटकेपणा, अचूकता हवी.
शब्दांचा फापटपसारा नसावा.

---

## *कल्पनात्मक निबंध*

---

या प्रकारात एखादी कल्पना आपल्याला दिली जाते. त्यावरून अन्य कल्पनांचे तरंग आपल्या मनात उठतात. कल्पनेचा स्वैरविलास करायला यात खूप वाव असतो. कल्पनांची भरारी, कल्पनेचं वैविध्य हेच अशा निबंधांचं खास वैशिष्ट्य. कल्पना स्वतंत्र असल्या तरी त्या मूळ विषयाशी सुसंगत हव्यात. कल्पना या गोंधळात टाकणाऱ्या, विपर्यास करणाऱ्या किंवा अतिरंजित, अशक्य वाटणाऱ्या, न पटणाऱ्या असता कामा नयेत.

(१) कल्पनांची साखळी गुंफताना तारतम्य हवं, सहजता हवी.

(२) कल्पना अवाजवी, अवास्तव असू नये.

(३) कल्पना आणि विचार यांचा गोफ काळजीपूर्वक विणलेला असला पाहिजे.

(४) कल्पना पोषक असाव्यात, वातावरणनिर्मितीसाठी पूरक असाव्यात.

(५) कल्पनेचा आवाका लक्षात घेऊन विस्तार करावा.

(६) अलंकारिक भाषा, शैलीचा डौल, रमणीय शब्द आणि छोटी– समर्पक वाक्यरचना या साऱ्यांचा ताळमेळ जुळत-जुळवत निबंध साकारावा.

(७) कल्पनेच्या प्रतीनुसार क्रम ठरावा, परिच्छेद पाडावेत.

(८) लिखाण सुसूत्र असावं.

(९) शेवटी निष्कर्ष दिला जावा. शेवट आकर्षक असावा.

(१०) सुभाषितं-सुविचार यांची योग्य जागी योग्य प्रमाणात पखरण केली जावी.

## विचारात्मक निबंध

निबंध कुठल्याही प्रकारचा असो, त्याची मूळ बैठक विचारांवर असते. विचारात्मक निबंधात मात्र प्रामुख्यानं विचारांचं आधिक्य असतं. विचारांचं सुसूत्र, सुसंगत विवेचन यात अपेक्षित असतं. विचार क्रमवार मांडताना विवेचन ओघानं येतंच. कधी विचार हे एकतर्फी, एकांगी दृष्टीने मांडलेले असतात, तर कधी दोन्ही बाजूंनी, अनेक अंगांनी विवेचन करून साधक-बाधक चर्चा करत विचार मांडले जातात. लाभ-हानी, चांगले-वाईट दोन्ही पदर उलगडून दाखवले जातात. कधी लेखक आपले विचार आग्रहीपणे वाचकाच्या गळी उतरवण्याचा प्रयत्न करतो, तर कधी निर्णय वाचकावर सोपवतो. वैचारिक निबंध लिहिताना विषयाचं सखोल ज्ञान अपेक्षित असतं. अपुऱ्या माहितीने लिहिलेला निबंध परिणामकारक ठरू शकत नाही. सुयोग्य दाखले, उदाहरणे देऊन लेखकाला आपलं मत प्रभावीपणे मांडावं लागतं. अशा प्रकारचा निबंध लिहिताना—

(१) दिलेल्या विषयाबद्दल प्रास्ताविकात विचार प्रथम प्रतिपादावेत.

(२) दोन बाजू असतील, तर दोन्ही बाजूंचे विचार वेगवेगळे, स्वतंत्र मांडून मग त्यावर आपलं भाष्य करावं. जे विचार पटणार नाहीत, ते सकारण खोडून काढावेत.

(३) समर्पक उदाहरणे, प्रसंग, दाखले देऊन विवेचन खुलवावे.

(४) लेखकानं स्वतःचं मत मांडून त्याला पुष्टी देणारे इतरांचे विचार संदर्भ म्हणून नमूद करावेत.

(५) निबंधात काल्पनिक, अवास्तव गोष्टी असू नयेत. निखळ विचार सूत्ररूपाने मांडावेत.

(६) विचारपूर्वक परिच्छेद पाडावेत. संदर्भ सुस्पष्ट असावेत, अचूक असावेत.

(७) भाषा नेहमीपेक्षा अधिक कमावलेली, भारदस्त असावी. मात्र ती बोजड नसावी.

(८) शेवट विचारप्रवर्तक असतात.

(९) विचार ठोस असावेत. पण काठिण्य पातळीवरील नसावेत.

(१०) संपूर्ण विषय काळजीपूर्वक हाताळावा.

## आत्मकथनात्मक निबंध (आत्मनिवेदन)

आत्मकथन हा सुद्धा तसा वर्णन, कल्पना, विचार या साऱ्यांचं एक सुरेख मिश्रण असलेला निबंध आहे. निवेदन, आत्मवृत्त, कैफियत, मनोगत, गाऱ्हाणे इत्यादी शब्द बऱ्याच वेळा निबंध विषयात सूचक म्हणून समाविष्ट असतात. या निबंध प्रकारात कल्पनाविलासाला बराच वाव असतो. चेतन-अचेतन, सजीव-निर्जीव यांचे दुःख, व्यथा-वेदना, भावभावना त्यांच्याशी एकात्म होत, जाणून घेत, कल्पनेने शब्दांकित करण्याचा प्रयत्न केला जातो. विशिष्ट वस्तू आपल्याशी बोलतीय अशी कल्पना, मनाची धारणा करून तिच्या तोंडून तिची कहाणी, व्यथा-वेदना, प्रतिक्रिया, इच्छा-अपेक्षा व्यक्त होत आहे, असा भास निर्माण केला जातो. म्हणून अथपासून इतिपर्यंत प्रत्येक शब्द तिच्याच मुखातून आलाय असा योजला जातो. म्हणूनच आत्मकथन प्रथमपुरुषी असतं. बोलण्याच्या ओघात समाजातले, माणसातले दोषही हळुवारपणे दाखवले जातात. नकळत शिकवण दिली जाते.

आत्मकथनपर निबंध लिहिताना पुढील गोष्टी अवश्यमेव लक्षात ठेवाव्यात.

(१) जीवनातील विविध टप्पे, महत्त्वाची वळणे, स्थित्यंतरे अधिक ठळकपणे मांडली जावीत.

(२) निवेदन चटकदार, आकर्षक असावं.

(३) सुयोग्य प्रसंगांची निवड करून हे प्रसंग नजरेसमोर प्रभावीपणे तरळावेत, साकारावेत म्हणून प्रसंगात सुसंगती ठेवून ते अधिक वेचक, वेधक व्हावेत म्हणून भाषा रसाळ असावी.

(४) गाऱ्हाणं, मनोगत, कैफियत लिहिताना त्या वस्तूच्या मनातील सल, खंत, बोच तसेच आंतरिक सुप्तइच्छा व्यक्त व्हावी. दुःखाबरोबर सुखही सुस्पष्टपणे व्यक्त व्हावं.

(५) जिव्हाळा, कळकळ, आपुलकी निर्माण होईल, अशी अकृत्रिम, साधी-सोपी भाषा असावी.

(६) प्राणी, पक्षी, फुले, झाडे, नदी, पर्वत, जमीन, व्यक्ती, निर्जीव वस्तू असे विविध विषय यात मोडतात. आजची स्थिती– पूर्वीची स्थिती– सुखद

आठवणी. पुन्हा एकदा आजची उपेक्षेची-दुरवस्थेची स्थिती आणि अंधारलेलं भविष्य– खुपणारे प्रश्न असा क्रम निवेदनात असावा. क्रमाक्रमानं झालेली वाटचाल सांगताना आलेले विविधांगी अनुभव बेमालूमपणे निवेदनाच्या ओघात गुंफावेत. विकास सांगता सांगता पतन– शेवटही सांगावा.

(७) आजच्या स्थितीबद्दलचं भाष्य नेटकं असावं, शक्यतो संतुलित आणि आशादायी सूर असावा.

(८) भाषा प्रवाही, कल्पनात्मक आणि भावपूर्ण असावी. छोटी आणि सुटसुटीत वाक्यरचना असावी.

(९) निवेदन चपखल शब्दांत आणि आटोपशीर आकारात सामावलेलं असावं.

(१०) बोलण्याच्या, भावप्रकटीकरणाच्या ओघात अखेरची इच्छाही व्यक्त व्हावी.

*

# यशाची पंचसूत्री

**१. विषयाची अचूक निवड**

निबंध लिहिताना प्रत्येकाने आपल्या ज्ञानाचा आवाका, विचारांची झेप, प्रतिभा, कल्पकता, क्षमता, कुवत, धाटणी, मानसिक बैठक, लिखाणाची पद्धती, अनुभूती या साऱ्यांचा मागोवा घेत, सर्वंकष विचार करत विषयाची निवड करावी. निवडीचे हे कौशल्य अभ्यास, पूर्वानुभव आणि सराव या तिन्हींमुळे प्राप्त होते.

**२. विषयानुषंगिक अनुरूप मुद्दे**

सखोलतेने, एकाग्रतेने आणि मनापासून केलेल्या पूर्वतयारीमुळे आणि अनुभवविश्व-संपन्नतेमुळे मुद्दे आठवू लागतात.

**३. विचारांना चालना**

सूक्ष्म अवलोकन, ग्रहण, स्मरण– या साऱ्यांतून ठेवलेल्या तपशीलवार नोंदी, कल्पकता, निर्णयक्षमता या साऱ्यांमुळे विचारांना निश्चित दिशा लाभून गती मिळते, सुयोग्य चालना मिळते. वैचारिक समृद्धी, बहुश्रुतता, अनुभवसंपन्नता यांच्यामुळे चालना मिळते.

४. सहजसोपी, सुंदर, आकर्षक, प्रवाही अर्थपूर्ण भाषा. नेमके, नेटके शब्द आणि सुबोध, सुबद्ध रचना, मांडणी.

५. प्रसन्न, मार्मिक, रसाळ शैली.

**या पाच पायऱ्याही आपण लक्षात घ्यायला हव्यात.**

(१) सूक्ष्म अवलोकन.

(२) मनन चिंतन.

(३) आकलन.

(४) समीक्षण-परीक्षण.

(५) अभिव्यक्ती.

(सुस्पष्ट, नेमकी, नेटकी, अचूक)

वरील पाच पायऱ्या निर्धारपूर्वक चढल्यावर अभिव्यक्तीच्या वेळी सुरुवातीची पंचसूत्री ध्यानात घ्यायला हवी. अभ्यासून कृतीत उतरवायला हवी, तरच निबंधात प्रत्यक्षाभिव्यक्तीत सुस्पष्ट, आकर्षक, सारगर्भ-विचार-भाव प्रकटीकरण होऊन तो उत्कट आत्माविष्कार, सहजोद्गार वाटेल.

केवळ अवलोकनार्थ—




(१) विशिष्ट लेखनपद्धती म्हणजे शैली




(२) भाषाज्ञानाची खरी कसोटी म्हणजे निबंध लेखन.

*

# भाग - २

# वानगीदाखल

## *माझी मायबोली*

'न ऋण जन्मदेचे फिटे' हे जसं खरं आहे, तसंच शतदा जन्मूनही मायबोलीचं, मायभूमीचं ऋणही आपण फेडू शकत नाही, हेही चिरंतन सत्य आहे. म्हणून हे ऋण मानायचं, जपायचं आणि स्वभाषेबद्दल अभिमान बाळगत, तिचे पांग फेडण्यासाठी, तिची सेवा करण्यासाठी यत्नशील राह्यचं हे तुम्ही-आम्ही ध्यानात घ्यायला हवं. स्वदेश, स्वधर्म, स्वकीय आणि स्वभाषा ह्या चार गोष्टी वर्णनातीत आहेत. त्या आमची स्फूर्तिस्थानं आहेत. त्यांच्याचमुळे आमचं शरीर-मन परिपुष्ट होतं. त्यांच्या आधारे आमचं जीवन उजळून निघतं, यशस्वी होतं.

'मराठी असे आमुची मायबोली' असं अभिमानानं म्हणत,

हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू ।<br>
वसे आमुच्या हीच हृद मंदिरी ॥

ही मायबोलीविषयीची कवीच्या मनातली श्रद्धा तुम्ही-आम्हीही जपायला हवी. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरांनी, मोठ्या आत्मविश्वासाने ज्या बोलीबद्दल सहजोद्‌गार काढले

'माझा मऱ्हाटाची बोल कौतुके ।
परि तो अमृतातेही पैजा जिंके ॥
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।

ती मराठी 'माझी मायबोली' आहे, याचा मला सार्थ अभिमान आहे. लहानपणी भाषाज्ञान होण्यापूर्वी मायबोलीतील सहजोद्‌गार, शब्द माझ्या कानावर पडले, हृदयात ठसले, कानी घुमत राहिले. आईकडून बोली भाषेचं विचारपाथेय, संस्कारपाथेय घेऊनच मी परिपुष्ट झालो. माझ्या मनातील भावभावना, कल्पना, संवेदना, ऊर्मी मी मराठीत-मायबोलीत समर्थपणे, सहजतेने, प्रभावीपणे व्यक्त करू शकतो. पुढे कितीही भाषांचा अभ्यास केला, नवनवीन भाषा अवगत झाल्या, आत्मसात झाल्या, तरीही आपल्या हृदयाची भाषा म्हणजे आपली मायबोली. तिचा आपल्याला स्वप्नातही विसर पडता कामा नये. म्हणून आपल्या जाणिवेत, नेणिवेत, दुःख, हर्ष, आश्चर्य, व्यथा-वेदना, इच्छा-आकांक्षा, मनोगत सहजतेने व्यक्त होताना मायबोलीच प्रकटते.

आईची माया, पित्याची वत्सलता, भावंडांचे प्रेम, मित्रांचा स्नेह आणि देशबांधवांची व्यथा-वेदना हे सारं मी मायबोलीतूनच जाणलं, अनुभवलं आहे. बाह्य जगात वावरताना तिचाच मला आधार आहे, दिलासा आहे. माझं व्यक्तिमत्त्व घडवताना तिचीच साथ-सोबत, तिचंच मार्गदर्शन मला लाभलं आहे. मी आजवर हट्ट केले ते माझ्या मराठीत. राग, लोभ, क्रोध, आपुलकी हे सारं व्यक्त केलं याच भाषेत. मनामनांना सांधणारी जवळीक, आपुलकी उत्पन्न करणारी माझी मायबोली मला म्हणूनच जन्मदात्रीइतकीच प्रिय आहे.

मातृभाषेतून ज्ञानग्रहण ही क्रिया अधिक सहज-सुलभ असते. पण आज खोट्या प्रतिष्ठेपायी, फॅशनच्या मागे लागून आपण आपल्या मायबोलीची उपेक्षा-अवहेलना करतो आणि परकी भाषा, साहेबाची भाषा— इंग्रजी भाषा माध्यम म्हणून स्वीकारतो. आजकाल बऱ्याच पालकांनाही परकी भाषा ही मुलांच्या विकासासाठी गरजेची वाटते, आवश्यक वाटते आणि ते आपल्या पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मोठ्या कौतुकानं घालतात. बरीचशी मुलं अपयशी ठरतात, ती परकी भाषेच्या माध्यमातून शिकण्याच्या सोसापायी ! उच्च अध्ययनाच्या निमित्तानं आम्हाला इंग्रजी भाषेचा पांगुळगाडा वापरावा लागतो. खरं तर खुल्या अभिव्यक्तीसाठी संभाषण-लेखनासाठी, वाचनातून ज्ञान

मिळवण्यासाठी तुम्हा-आम्हाला मायबोलीचाच आधार असतो. आपली मायबोली विचारवंत, ज्ञानवंत, गुणवंत, साहित्यिक, भाषातज्ज्ञ यांच्या सेवेमुळे, कार्यकर्तृत्वामुळे समृद्ध होते.

आई-बाबातला गोडवा ममी-पपा संस्कृतीत नाही. आकलन-अभिव्यक्ती यासाठी मायबोलीच माझ्या मदतीला धावते. मी अन्य भाषा जरूर शिकेन, त्या त्या भाषांमधलं चांगलं ते ते सारं स्वीकारीनही, पण माझी मायबोली समृद्ध करण्याचा मी मनापासून प्रयत्न करेन. जगाच्या पाठीवर कुठेही असलो, तरीही तिचा विसर पडू न देता वाचन, मनन, चिंतन, लेखन, संभाषण या साऱ्यांसाठी मायबोलीचाच आधार घेईन. शेवटी मी हेच म्हणेन,

साधुसंतांनी, ज्ञानवंतांनी, विचारवंतांनी समृद्ध केलेली माझी मायबोली मराठी तिचा स्वप्नातही विसर मी पडू देणार नाही. मराठी माणसानं आपल्या भाषेचा अभ्यास करून ती जोपासली, वाढवली पाहिजे. 'मराठी भाषेनं मराठी मनाचा कस घेऊनच वाढलं पाहिजे, तर भाषा वाढेल, उत्कर्ष पावेल' हे स्वर्गीय यशवंतराव चव्हाणांचे उद्‌गार तुम्ही-आम्ही लक्षात ठेवून वागायला हवं. वामनपंडित, मोरोपंत, जगन्नाथराय, ज्ञानेश्वर, रामदास, जनाई, बहिणाई, नाटककार गडकरी, खाडिलकर, कोल्हटकर, कादंबरीकार ना. सी. फडके, वि. स. खांडेकर, कवी माधव ज्यूलियन, बा. भ. बोरकर, केशवसुत, कुसुमाग्रज, प्र. के. अत्रे, ग. दि. माडगूळकर या आणि अशा हजारो साहित्यकारांनी मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी मोलाची सेवा केली आहे. मायबोलीबद्दलची आस्था, आपुलकी मनामनांत असायला हवी.

*मायबोली ही मराठी ।*
*ज्ञानसमृद्धीची खाण ॥*
*तिची कृपा माझ्या गाठी ।*
*मनी आपुलकी जाण ॥*
*शब्द शब्द रत्नावली ।*
*त्यांना अमृताची गोडी ॥*
*जिची साथ सर्वकाली ।*
*मज बोली ही आवडी ॥*

## *शब्दांचं सामर्थ्य*

'आजच्या गतिशील, ताणतणावांच्या, भाऊगर्दीच्या विज्ञानयुगात माणूस जणू यंत्र बनलाय ! संवेदना बोथटलेल्या, माणूसपण हरवलेल्या आणि स्वच्या कक्षेत फिरणाऱ्या समाजात वावरताना गोड शब्दांचा भाव जणू लाख रुपये तोळा झालाय.' भाषणाच्या ओघात वक्त्याने उच्चारलेले वरील शब्द माझ्याही कानांवर आदळले. या शब्दांनी माझ्या विचारांना जणू खो देऊन उठवलं. मी शब्दांचा– त्यांच्या सामर्थ्याचा विचार करायला लागलो. आज निबंध लिहिताना पुन्हा एकवार विचारांची उजळणी सुरू झाली.

'शब्द हे शस्त्र दुधारी आहे, जपून वापरा' कानमंत्र आठवला आणि शब्द हे धारदार, तेजस्वी असतात हे प्रकर्षानं जाणवलं. शब्द घायाळ करणारे, शब्द मधाळ, शब्द टोचणारे खोचक-बोचक, शब्द प्रेरक उद्बोधक– शब्द धीराचे, शब्द व्यथा-वेदनांचे, शब्द चेतवणारे, शांतवणारे, रिझवणारे, रक्त सळसळवणारे– शब्दांचे अनेक प्रकार आठवायला लागले.

फ्रेंच राज्यक्रांती झाली शब्दांच्या सामर्थ्यावर. क्रान्तीचा उठाव झाला, जनजागरण लोकजागरण झाले, तेही शब्दांच्या बळावर ! वाऱ्यावर विरून जातात तेही शब्दच आणि हृदयावर कोरले जातात, शिल्प बनून राहतात तेही शब्दच. मनामनांना साद घालून जागे करणे ही किमया शब्दांचीच. माणसं जोडण्याची कलाही शब्दांचीच. शब्दांमुळे ज्ञानाचा वारसा दिला-घेतला जातो.

शब्दांचं सामर्थ्य प्राचीन काळापासून विचारवंतांनी ओळखलं आहे. मान्य केलं आहे. संत तुकारामांनी शब्दांचं सामर्थ्य, त्यांचा महिमा सांगताना, 'शब्दचि आमुच्या जिवाचे जीवन' असे म्हटले आहे. शब्दांचं सामर्थ्य सांगताना केशवसुत म्हणतात,

*पद्यपंक्तीची तरफ आमुच्या करी विधीने दिली असे*
*टेकुनि ती जनता-शीर्षावरी जग उलथुनिया देऊ कसे*

समाजातील रूढी, अन्याय, अत्याचार यांवर विचारवंतांनी घणाघाती शब्दांचे आसूड मारले आणि विचारजागृती केली. सावरकरांचे शब्द जणू धगधगते अंगार, बंदुकीतून सुटलेल्या गोळीप्रमाणे वेध घेणारे, काळजाचा ठाव

घेणारे ! 'सावधान' हा एक शब्द पण त्याने नारायणाचे जीवन पार बदलवून टाकले आणि समर्थ रामदास घडले.

'आज माझा शब्द आभाळ झालाय' कवीची ऊर्मी शब्दांतून व्यक्त झालेली पाहिली की, त्या शब्दांतून व्यक्त होणारी शक्तीही प्रकर्षाने जाणवायला लागते. न पाहता येणारं मन शब्दांच्या सामर्थ्यामुळेच दिसतं, कळतं, जाणवतं. शब्दांचं सामर्थ्य व्यक्ती-व्यक्तीनुसार बदलतं आहे. मरगळ झटकून टाकणं, आवेश उत्पन्न करणं, दिलासा देणं, समजावणं यासाठी शब्द वापरले जातात, त्या त्या वेळी त्यांचं सामर्थ्य हेतूप्रमाणे बदलत जातं. जाता जाता एवढंच म्हणावंसं वाटतं,

*शब्दांचे सामर्थ्य कसे किती वर्णावे ।*
*गूढ, अतर्क्य वर्णिता शब्द तोकडे पडावे ॥*

---

## *निर्माल्यातलं फूल बोलू लागलं*

रंग उडालेला, अंगाला दुर्गंधी सुटलेली, काया सुकलेली, सौंदर्याची सारी लेणी हातून निसटलेली, सारा नक्षा उतरलेला– ओळखलंस मला ? नाही– तेही खरंच आहे म्हणा ! ए, परवा तूच मला हौसेनं भगवान श्रीकृष्णाच्या सुंदर मस्तकी वाहिलं होतंस, खरं ना ! किती ऐटीत, मस्तीत विराजमान झालो होतो मी ! जो तो नमस्कार करत होता– जणू काही मलाच ! असं वाटून मी धन्य झालो. पण–

माझं बालपण मला आठवायला लागलं. गुलाबाच्या भल्या मोठ्या ताटव्यातला खास काश्मिरी गुलाब ! कुशल माळ्यानं सारं कौशल्य पणाला लावून माझ्या जन्मदात्याला– झाडाला जगवलं, तगवलं, कलेकलेनं वाढवलं. झाड झपाट्यानं वाढलं. बघता बघता मी आणि माझ्यासारखी अनेक फुलं छोट्या कळीरूपात झाडावर झुलू, नाचू, डोलू लागली. आम्ही वेगळ्या रंगानं त्या ताटव्यात उठून दिसू लागलो. माझं कळी रूप खुलू लागलं, उमलू लागलं. माझ्या पाकळ्या घट्ट, टोकदार होत्या. बघता बघता मी गेंदेदार फूल बनलो. आकर्षक रंग, भरगच्च पाकळ्या, विलोभनीय आकार आणि प्रसन्न करणारा सुगंध ! मी

न्यारा बनलो, मला स्वर्ग हाती आल्यासारखं वाटलं. मोठ्यानं म्हणावं, मी राजा ! मी गुलाब सम्राट ! माझा मालक स्वप्न रंगवत होता. मला प्रदर्शनात मांडून त्याला पारितोषिक पटकावयाचं होतं, पण—

पुन्हा एकदा पण आडवा आला. तू सगळ्यांचा डोळा चुकवून खुडलंस, पिशवीतून घरी आणलंस. तू अचानक मला तोडलंस. मी बेसावध होतो. तरीही काटा टोचून मी तुला प्रतिकार करावयाचा खुळा प्रयत्न केला. मला ओरडून सांगावंसं वाटलं तू केलेल्या चोरीबद्दल ! पण तोंडातून शब्दही बाहेर पडला नाही. इच्छा नसूनही मी तुझ्या घरी आलो.

तुमचं देवघर मला खूप आवडलं. भगवान श्रीकृष्णांची चंदनीमूर्ती पाहिली आणि सारा राग गळून पडला, दुःखाचा विसर पडला. तुझ्या आजीनं पूजा करून तुला प्रसाद दिला. प्रसाद खाण्यापूर्वी तू मला अलगद उचललंस, भक्तिभावानं भगवानांच्या मस्तकी ठेवलंस. तुझ्यामुळे मी देवापर्यंत पोहोचलो. माझा आनंद दुणावला. मी प्रसन्नपणे अधिक हसलो, पूर्ण विकसित झालो. पण—

हे सुख फार काळ टिकलं नाही. क्षणाचं सुख संपलं. दुःखाचं ताट जणू पुढे आलं. आजीच्या साग्रसंगीत पूजेच्या वेळी मला बाजूला होऊन दुसऱ्यासाठी जागा करून द्यावी लागली. मी निर्माल्य बनलो. नंतर रवानगी झाली तडक कचऱ्यात ! ते रामायण घडलं तुमच्या सखू मोलकरणीमुळेच ! तिनं मला निर्माल्याच्या टोपलीत न टाकता कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकून दिलं.

ज्याचा अभिमान केला, रुबाब केला ते माझं रूप, रंग, गंध सारं मला सोडून गेलं. वाट्याला आलं उपेक्षित जीवन ! दुसऱ्याला देण्यासारखं, सुखविण्यासारखं आता काही उरलं नाही बघ ! असलं जीवन जगावंसं नाही वाटत मला ! मनात एक प्रश्न आहे. संपणं हेच नशिबी आहे.

---

## *जगात आरसा नसता तर*

ही जर-तरची भाषा मोठी कोड्यात टाकणारी असते. पण खरं सांगू ! 'अतिपरिचयात् अवज्ञा' या न्यायानं एखाद्या उपयुक्त गोष्टीची किंमत

आपल्याला अतिजवळीकेमुळे दिसत-जाणवत नाही. त्याकडे लक्ष वेधण्यासाठी, कल्पनेला भरारू देण्यासाठी, विचारांना चालना देण्यासाठी ही जर-तरची भाषा थोडा वेळ चावीसारखी उपयोग पडते. खरंच घरातच नव्हे, तर अवघ्या जगात आरसा नसता तर ! ताईची फजिती पाहताना मी खूपच खूष होतो. आरसा नाही म्हणजे पदोपदी अडणार आमच्या तायडीचं ! नटण्यामुरडण्याची तिला भलती हौस ! सकाळी कॉलेजात जाण्यापूर्वी तब्बल दोन तास आरसा समोर ठेवत सौंदर्यसाधना चालू असते तिची ! घरातला मोठा थोरला असूनही दुसरा आरसा लागतोच तिला ! पुन्हा पुन्हा आरशात काय पाहते कोण जाणे ! हा आरसाच जर नसता तर ! 'सांग दर्पणा कशी मी दिसते' हे तिनं कुणाला विचारलं असतं मग ? सगळा जामानिमा झकास जमलाय अशी समाधानाची पावती आरशाकडून मिळाली की, मगच बाईसाहेब कॉलेजला जाण्यासाठी घर सोडतात. म्हणजे आरसा नसता तर या मुलींनी काय केलं असतं ?

म्हणजे आम्ही मुलेही भांग पाडताना, टाय बांधताना आणि हो, दाढी करताना आरशात पाहतोच की ! आरसा नसता तर आम्हालाही बऱ्याच अडचणी आल्या असत्या. त्यामुळे मित्राप्रमाणे आपल्याला मदत करणारा, सेवेशी श्रुत होणारा, आपण कसे दिसतो हे सांगणारा आरसा नसता तर नक्कीच नसती आफत आली असती. रुबाबात उणेपणा नक्कीच राहिला असता. केशकर्तनालयात आरसा नसता, तर नाभिक जसे केस कापेल तसं निमूटपणे मान्य करावं लागलं असतं.

रस्त्यांवरून भरधाव वाहणारी वाहनं सुरळीतपणे धावू शकतात ती त्यांच्या मदतनीस आरशांमुळेच ! आरसा नसता तर मागून, बाजूनं येणाऱ्या वाहनांचा अंदाज कसा बांधता आला असता ! वाहनचालकांना अनेक अडचणींना तोंड देत चाचपडत, अडत-अडखळत वाहनं चालवावी लागली असती. अपघातांचं प्रमाण जास्तीच वाढलं असतं.

शास्त्रीय प्रयोगशाळेत जी अनेक साधनं आरशाच्या मदतीनं बनवली जातात, जे प्रयोग केले जातात— हे सारं आरशाविना होऊ शकलं नसतं. शोभादर्शकाचा आनंद आम्ही कसा लुटू शकलो असतो ? समुद्रात खोलवर जाणाऱ्या पाणबुड्या— त्यांना आसपासच्या सर्व गोष्टींचं प्रतिबिंब आरशात पाहयला मिळतं. आरशाअभावी शत्रूच्या हालचाली टिपता आल्या नसत्या.

शिंप्याकडे जा 'नो आरसा.' नाट्यगृहे, कापड दुकानं, नाट्यगृहातील मेकअप रूम, शाळा, कॉलेज, प्रदर्शन, स्वच्छतागृहे कुठेच आरसा नाही. आरसे सुशोभनासाठी-सजावटीसाठी नाहीत. रूप पाहण्यासाठी, सौंदर्यसाधनेसाठी, अंदाज घेण्यासाठी आरसे दिमतीला नाहीत म्हणजे साराच घोटाळा. पण आरसे नसते तर कचेऱ्यांतून काम करणाऱ्या युवतींना कामातून सुटका घेता आली नसती. आरशाअभावी खूपच समस्या निर्माण झाल्या असत्या आणि कटकटी वाढून डोकेदुखी वाढली असती !

## *मोठेपणातील दुःखं*

'ही मोठी माणसं आम्हाला धाकात, बंधनात ठेवतात. स्वातंत्र्यावर गदा आणतात.' अशा चिडीनं मला एकदा वाटलं, नको हे लहानपण, हवं लवकर मोठेपण !. कारण मोठं झालं की सारे गुन्हे, साऱ्या चुका माफ ! हम करेसो कायदा आणि मनमानी वागणं– मज्जाच मज्जा ! पण 'काट्यावाचून गुलाब नाही', 'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण' हे वाचलं मात्र, विचारचक्र सुरू झालं. परवाचीच गोष्ट. खरं तर चूक राजूची– माझ्या छोट्या भावाची होती. पण त्याच्यापेक्षा मोठा पडलो ! सारा राग माझ्यावरच निघाला. मी मोठा असल्यानं सारी चूक माझ्याच माथी मारली गेली. मोठेपणातलं दुःख मी त्या दिवशी प्रकर्षानं अनुभवलं.

काही माणसं जन्मतःच मोठी असतात. काही स्वकष्टानं, यत्नबळानं मोठेपण मिळवतात; तर काहींच्यावर नसतं मोठेपण लादलं जातं. काही केवळ गाठी पैसा आहे, श्रीमंती आहे म्हणून मोठे मानले जातात. हे मोठेपण एकदा आलं, चिकटलं की मग मात्र यातनांना, दुःखांना सुरुवात होते. मोठेपणाचा डगला चढला की, डोक्यावर जणू सतत टांगती तलवार असते. राष्ट्राचे प्रमुख हे तर जणू दुःखांच्या गराड्यातच सारखे वावरत असतात. स्वर्गीय इंदिराजी, स्वर्गीय राजीवजी यांच्या वाट्याला आलेली अनेक दुःखं त्यांच्या मोठेपणानंच निर्माण झालेली होती. मोठेपणातील दुःखं 'जावे त्याच्या वंशा' तेव्हाच कळू-समजू-जाणवू शकतील.

मोठेपणाच्या दडपणामुळे ओझ्यामुळे बाल्य हरवतं, सुख संपतं, ताणतणाव वाढून मनःस्वास्थ्य नष्ट होतं, स्वातंत्र्य गमवावं लागतं. समाजाच्या निंदेला, दोषारोपांना-टीकेला तोंड द्यावं लागतं. केवळ मोठेपणामुळे दुःख, समस्या, संघर्ष, वैमनस्य, विद्रोह हे सारं नष्टचर्य वाट्याला येतं. सामान्य माणसाला मिळणारी छोटी-साधी सुखंसुद्धा मोठेपणाच्या पायी विसरावी लागतात, गुंडाळून ठेवावी लागतात.

हे मोठेपण काटेरी वाटायला लागतं, पण ते एकदा माथी बसलं की झुगारूनही टाकता येत नाही. थोर शास्त्रज्ञ, संस्थाचालक, नेता, समाजसेवक, उद्योजक, निष्णात डॉक्टर, उच्चपदस्थ व्यक्ती यांना बऱ्याच वेळा स्वसुखावर, घरादारांवर पाणी सोडावं लागतं. अनेक समस्यांना तोंड द्यावं लागतं, कटू अनुभवांना सामोरं जावं लागतं, अनेक यातना सोसाव्या लागतात, अनेक दुःखं पचवावी लागतात.

संत ज्ञानेश्वर, स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील, महर्षी अण्णा कर्वे, उद्योजक शंतनुराव किर्लोस्कर, लालबहादूर शास्त्री, महात्मा गांधी, बाबासाहेब आंबेडकर या आणि अशा अनेक मोठ्या व्यक्तींना खूपच दुःख सोसावं लागलं आहे. तरीही जगाच्या कल्याणासाठी त्यांनी हे सारं हसतमुखानं सोसलं, मोठेपणात दुःखं दडलेली आहेत, असे म्हणत घाबरून त्यांनी मोठेपणाचा त्याग केला नाही. मोठेपणातील दुःखं आपण सामान्यांनी ओळखून मोठ्यांचं असामान्यत्व मान्य करायला हवं.

## *आदर्श विद्यार्थी : माझ्या कल्पना*

यंदा स्नेहसंमेलनाच्या वेळी आदर्श विद्यार्थी म्हणून विनय गोडबोले घोषित झाला. प्रचंड जल्लोषात त्याचा सत्कार झाला आणि माझ्या दोस्ताची झालेली ही निवड पाहून माझा आनंद शतगुणित झाला. शाळेतल्या दोन हजार विद्यार्थ्यांत एकमेव हिरा, एकमेव आदर्श तो ठरला. का— कशामुळे? मनात विचारचक्र सुरू झालं. मनात आलेले विचार, कल्पना निकष मानून मी सभोवती पडताळा

पाहू लागलो. माझ्या कल्पनेतला आदर्श विद्यार्थीही विनयच ठरला. पण मनात आलं, शाळेत आदर्श विद्यार्थी हाताच्या बोटावर मोजण्याइतके असून चालणार नाही. ते संख्येनं उदंड वाढले पाहिजेत. माझ्या कल्पना तुमच्याशी पडताळून पहा पाहू.

आदर्शवाद हा नेहमी चांगला असतो. म्हणून प्रत्येकानं सर्वार्थानं आदर्श व्हायचा प्रयत्न करायला हवा. विद्येची उपासना करणारा, ज्ञानाची लालसा बाळगणारा आणि सातत्यानं धडपडणारा, प्रयत्नशील राहणारा– तो आदर्श विद्यार्थी. त्याचं मन शुद्ध, सात्त्विक, प्रेमळ हवं. आचरण निर्मळ पवित्र हवं. त्याच्या वाणीत जिव्हाळा हवा, ऋजुता हवी, गोडवा हवा. स्वभावानं तो दिलदार, रसिक हवा. वृत्तीने शांत, सालस, क्षमाशील, विनम्र हवा.

गुरुजनांबद्दल त्याच्या मनात श्रद्धा हवी, नितान्त आदर हवा. विनम्रता, आज्ञापालन, स्वावलंबन आणि सेवाभावी वृत्ती या गुणांमुळे तो घरी-दारी सर्वत्र प्रिय ठरतो.

आदर्श विद्यार्थी आपलं चरित्र आणि चारित्र्य निर्मल राखण्याचा प्रयत्न करतो. त्याचं जीवन नियमित-नेमस्त असते. व्यायाम, अभ्यास, खेळ, आहार-विहार, आचार साऱ्यांत तो नियमितता राखतो. तो हौसेने साऱ्या उपक्रमांत भाग घेतो. स्वयंसेवक बनून अनेक लहान-मोठ्या जबाबदाऱ्या तो स्वीकारतो. आवडीच्या छंदात रमतो, आळसात वेळ न घालवता रिकामपणीही उद्योगात दंग राहतो. सर्वांशी मिळून-मिसळून वागणं, सर्वांना मदतीचा हात देणं, सतत काम करत राहणं, आनंदी राहून बिनतक्रार कर्तव्य करत राहणं असे कितीतरी गुणविशेष आदर्श विद्यार्थ्यात प्रकर्षानं दिसायला, जाणवायला पाहिजेत.

अशा अनेक गुणांनी युक्त असेल तोच विद्यार्थी आदर्श विद्यार्थी म्हणून मान्यता पावू शकतो. प्रशंसनीय ठरून सन्मानित होऊ शकतो. अशी गुणात्मक वाढ असलेले विद्यार्थी संख्येनंसुद्धा वाढायला हवेत. कारण या मंगल देशाला घडवणारे भावी शिल्पकार तेच ठरणार आहेत. माझ्या कल्पनांनी सुद्धा विनय गोडबोलेच्या बाजूनंच कौल दिला.

## प्रतिज्ञा : कशी ? कशासाठी ?

शाळा सुरू झाल्याची सूचक घंटा घणघणली. चिवचिव, गलका, आरडाओरडा थांबण्याचा क्षण आला. ध्वनिक्षेपकावरून प्रतिज्ञा सांगितली जात होती. वर्गावर्गातले विद्यार्थी प्रतिज्ञा घेत होते. काहीजण गांभीर्यानं, एकाग्रतेनं, धीरगंभीर आवाजात तर बाकीचे अनेकजण रोजचा परिपाठ म्हणून यांत्रिकपणे घेत होते. प्रतिज्ञेचा शेवटचा शब्द जणू वाऱ्यावर विरला. मराठीचा तास सुरू झाला. पहिलंच वाक्य बाईंनी उच्चारलं, 'प्रतिज्ञा ओठातून नव्हे, पोटातून यायला हवी. प्रतिज्ञा कशी ? कशासाठी ? विचार करा पाहू.' त्या दिवशी बाईंनी याचीच चर्चा केली. प्रतिज्ञेत लपलेला अर्थ उलगडून दाखवला. ऐकता ऐकता आता जाणवलं की आम्हा विद्यार्थ्यांचं खूप चुकतं. प्रतिज्ञा ही खरं तर जीव ओतून घ्यायला हवी. हृदयातून, पोटातून यायला हवी. नकळत विचारांना चालना मिळाली, दिशा मिळाली.

प्रतिज्ञा घेणं महत्त्वाचं नसून ती पाळणं अधिक महत्त्वाचं आहे. ही छोटी पण अर्थपूर्ण प्रतिज्ञा प्रथम समजून घ्यायला हवी. प्रतिज्ञा ही एक वृत्ती आहे, आंतरिक अनुभूती आहे, एक चिरंतन टिकणारा संस्कार आहे. प्रेरणा देणारी, जाणीव जागृती करणारी ही प्रतिज्ञा कशासाठी घ्यायची ? त्यातून काय साधावयाचं ?

विचार सुरू झाल्यावर अनेक उद्दिष्टं नजरेसमोर तरळली. आदरभाव, त्याग, राष्ट्रीय एकात्मता, राष्ट्रविषयक अभिमान, श्रद्धा, निष्ठा, राष्ट्र, धर्म, संस्कृती-परंपरा यांच्याविषयीची ओढ वाढावी, अस्मिता जागी राहावी यासाठी नेमानं प्रतिज्ञा घ्यायला हवी. विद्यार्थ्यांवर सुसंस्कार व्हावेत म्हणून प्रतिज्ञा. त्यांना आपल्या कर्तव्यांची जाणीव व्हावी, सहकारिता, बंधुता, एकता या भावनावृत्ती जोपासल्या जाव्यात, परार्थ दृष्टी वाढावी म्हणून प्रतिज्ञेचं महत्त्व.

नेमानं प्रतिज्ञा घेतल्यानं एकमेकांत आपलेपणा, आत्मीयता, प्रेम वाढेल, विद्यार्थ्यांचे मन विशाल होऊन व्यापक दृष्टिकोण तयार होईल. आपल्या संस्कृतीची ओळख करून घ्यावीशी वाटेल. भारतीय संस्कृतीतील मानाचा तुरा म्हणजे गुरुशिष्य परंपरा. आई-वडील, गुरू, देश, ज्ञान, स्वामी, भाषा, समाज या साऱ्यांबद्दल मनात निष्ठा उत्पन्न व्हायला त्यामुळे मदत होईल.

'प्राण जाय पर वचन न जाए'ही भावना एकदा मुलांमध्ये पक्की रुजवली की, जे वचन आपण प्रतिज्ञेतून धीरगंभीरतेने देतो ते पाळण्याची जबाबदारी आपल्याला कळत नकळत उमगायला लागते.

अशी ही अत्यंत मौलिक प्रतिज्ञा रोज नेमानं घ्यायला हवी. गांभीर्यानं, शांतपणे, अचूक आणि धीरगंभीर-सुस्पष्ट शब्दांत ती मनापासून घ्यायला हवी. प्रतिज्ञा ही लादलेली कृती न वाटता मनापासून स्वीकारलेलं व्रत व्हायला हवं. तरच एक विशिष्ट वृत्ती तयार होऊन आजचा प्रत्येक विद्यार्थी भविष्यात एक जबाबदार नागरिक बनू शकेल. विद्यार्थ्यांचे मन, त्यांचं जीवन, त्यांची वैचारिक जडणघडण नकळत घडू, विकसू शकेल. म्हणून सुसंस्कार पेरणारी, जाणीव देणारी ही प्रतिज्ञा प्रत्येकानं घ्यायला हवी.

## *रिकामा फ्लॅट बोलू लागला तर. . .*

'जमाखर्च स्वातंत्र्याचा मांडणार केव्हा ?
जाब उंच प्रासादांचा मागणार केव्हा ?'

खरंच ! आज सर्वत्र किती भ्रष्टाचार बोकाळलेला दिसतोय ! स्वातंत्र्य मिळवण्यामागची सारी उद्दिष्टं, उदात्त मूल्यं आज लोप पावलेली आहेत. गरीब अधिकाधिक गरीब होत आहेत. आणि श्रीमंत ? त्यांची श्रीमंती तर त्यांच्या गगनाला भिडू पाहणाऱ्या उत्तुंग प्रासादांप्रमाणे उत्तरोत्तर वाढतच आहे. ही आर्थिक दरी भरून निघणार तरी कशी ?

अरे हो ! माझ्या या बडबडीच्या नादात मी तुम्हाला माझी ओळख करून द्यायची विसरूनच गेलो. खरंतर, माझं बोलणं ऐकून तुम्हाला भ्रष्टाचाराला विटलेला, महागाईला कंटाळलेला बापुडा सामान्य मनुष्यच बोलत असेल असं वाटलं, तर त्यात नवल नाही. आता मीच तुम्हाला माझी ओळख करून देतो. मी एक फ्लॅट. अहो, असं बावचळून जाऊ नका. दिवसभर कष्ट करून दमलेले जीव ज्याच्या आसऱ्याला येतात, ते मी घर ! पण माझ्यात आणि तुमच्या घरात फरक आहे. कारण मी आज अगदी एकाकी आहे. वास्तविक मला तुम्ही माणसं माझ्या

अंगाखांद्यावर खेळत असलात म्हणजे जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटतं, पण माझ्याकडून तो आनंद लुटण्याचा अधिकार हिरावून घेण्यात आलाय. मला कडी-कुलपात बंदिस्त करण्यात आलंय. बरं, आम्हाला रिकामं ठेवण्याची कारणं तरी काय असावीत ? माझ्या एका मित्राला तर त्याचं 'भूतबंगला' असं नामकरण करून वाळीत टाकण्यात आलं आहे. हे ऐकून मला हसावं का रडावं तेच कळेना.

माझा मालक एक बडा कारखानदार आहे. नाना हिकमती लढवून त्यानं बक्कळ पैसा मिळवलाय. या पैसा मिळवण्याच्या मार्गात त्याला एकच अडथळा आहे, तो म्हणजे 'इन्कमटॅक्स्'. आता हा इन्कमटॅक्स चुकवायचा म्हणजे काहीतरी खर्च दाखवायला हवा. त्या उद्देशातूनच माझी निर्मिती झाली. समाजात एकीकडे लोकांना रस्त्यावरही राहावयास जागा नसताना असे शेकडो फ्लॅट रिकामे पडले आहेत. या सामाजिक विषमतेमुळेच देशाच्या उन्नतीचा मार्ग बंद होतो, याची जाणीव नाही. ही शोकांतिका आहे.

तुम्ही माणसं म्हणे आता २१ व्या शतकाकडे वाटचाल करीत आहात. ही वाटचाल करताना सर्वसामान्य माणूस स्वप्न पाहत आहे, ते सुखाचं, समृद्धीचं ! पण ती अखेर स्वप्नेच ठरणार ! याला कारण लोकसंख्येचा विस्फोट ! प्रचंड लोकसंख्यावाढीमुळे खेड्यात उपाशी मरणारे मजूर पोट भरण्यासाठी शहराकडे वळतात आणि मग जागेची तीव्र टंचाई भासू लागते. तरीदेखील माझ्यासारखे रिकामे फ्लॅट रिकामेच राहतात.

माझ्या समोरच्या फूटपाथवरील बेघर कुटुंबाला पाहयलं की, माझं मन विषण्ण होतं. तो फूटपाथ हे त्यांचं घर आणि आभाळ हेच छप्पर ! आमच्यात अंतर असं ते किती ? फार तर १०/१२ फुटांचं. पण आमच्यात एक अतिखोल अशी आर्थिक दरी आहे. त्यामुळेच आम्ही एकमेकांच्या सहवासास मुकलो आहोत. नाहीतर त्या फूटपाथवर राहणारी ती मुलं माझ्या अंगाखांद्यावर बागडली असती आणि मला असा जीवघेणा एकटेपणा सोसावा लागला नसता.

भारत सरकार निराश्रित आणि बेघर लोकांसाठी निरनिराळ्या योजना राबवते. पण त्यांचे कितपत फायदे खऱ्या निराश्रितांपर्यंत पोहोचतात. मिळालेल्या संधीचा फायदा उठवून धनिक लोक आपली 'इन्व्हेसमेंट' करून घेतात आणि मग माझ्यासारखे अनेक रिकामे फ्लॅट तयार होतात. खरे निराश्रित आणि बेघर मात्र 'कुणी घर देता का घर? असं नटश्रेष्ठ गणपतराव बेलवलांसारखं

केविलवाणेपणे म्हणत राहतात.

ही विषमतेची दरी भरून काढण्यासाठी लोकांत सामाजिक बांधिलकी निर्माण होण्याची गरज आहे. 'मी आणि माझं' या चक्रव्यूहाभोवती फिरत न राहता आपल्या आजूबाजूला असलेल्या परिस्थितीचा प्रत्येकानं चाकोरीबाहेर येऊन विचार केला पाहिजे.

खरंतर ही भारतमाता सर्वांना सारखीच. पण समाजव्यवस्थेतील दोषांमुळे तिची वाटणी समान होऊ शकलेली नाही. जेव्हा ही असमानता दूर होईल. गरिबी आणि श्रीमंतीमधील सीमारेषा नष्ट होतील आणि त्यायोगे 'माणसे' माझ्यापाशी राहायला येतील, तेव्हा माझ्या जीवनअस्तित्वाला खराखुरा अर्थ प्राप्त होईल. मी कृतकृत्य होईन.

## *सुसंस्कार– काळाची गरज*

आपलं जीवन हा एक मूल्यवान हिरा आहे. या हिऱ्याला जसजसे पैलू पाडत जावं, तसतसा तो अधिकाधिक तेजस्वी दिसू लागतो. विनोद, व्यायाम, ज्ञान, नम्रता यांबरोबरच सुसंस्कार हा एक उत्तम पैलू आहे.

लहान मुलांचं मन हे संस्कारक्षम असतं. त्यांच्या आसपासच्या व्यक्तींच्या कृतीतून त्यांच्यावर नकळत संस्कार होत असतात. पण हे संस्कार वाईटही असू शकतात. त्यामुळे मुलांवर उत्तम संस्कार हे प्रयत्नपूर्वक बिंबवावे लागतात.

पूर्वीच्या काळी गुरुकुल पद्धतीनं मुलांना शिक्षण दिले जाई. तेव्हा गुरू आपल्या कृतीच्या आधारे आपल्या शिष्यांवर सुसंस्कार घडवत असत. स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळात तर नेत्यांच्या पुढाकारामुळे, जनजागृतीमुळेही सर्व देश एका विशिष्ट ध्येयामुळे भारला गेला होता. त्या वेळच्या पिढीवर ध्येयानं प्रेरित होऊन, आपल्या प्राणांची पर्वा न करता, हाती घेतलेलं काम तडीस नेण्यासाठी प्रयत्न करण्याचे संस्कार, हे सभोवतालच्या प्रत्येक कृतीमधून आपोआप होत होते. आश्वासनांपेक्षा कृतीवर त्या काळी भर दिला जात होता. आजूबाजूच्या लोकांना अंगात घालायला पुरेसे कपडे नाहीत, हे पाहिल्यावर गांधीजींनी

जन्मभर केवळ पंचावर राहण्याची प्रतिज्ञा केली. नुसती प्रतिज्ञा करून ते थांबले नाहीत, तर ती त्यांनी कृतीतही आणली.

हिमालयाच्या उंचीचं व्यक्तिमत्त्व असलेल्या या महापुरुषांची जागा आता स्वार्थी, सत्तेसाठी व खुर्चीसाठी हपापलेल्या ढोंगी राजकारण्यांनी घेतली आहे. या लोकांच्या कृती आणि उक्तीमध्ये खूप मोठी तफावत आहे. लाच, भ्रष्टाचार यांचा भस्मासुर सगळीकडे बोकाळला आहे. हल्ली सर्व माणसे पैसा व प्रतिष्ठा यांच्या मागे धावत असतात. या हव्यासापायी घराघरांत दूरदर्शन संच, केबल यांसारखी मुलांच्या मनावर अनेकदा विपरीत संस्कार करणारी व अभ्यासात अडथळा आणणारी साधनं येतात. यासाठी आवश्यक असणारा पैसा काही लोक वाममार्गानंही मिळवितात. यामुळे आपलं जीवन आदर्शहीन बनत आहे. अशा प्रतिकूल परिस्थितीत मुलांवर सुसंस्कार होणार तरी कसे ?

पूर्वी एकत्र कुटुंबपद्धतीमुळे आजी-आजोबांचा सहवास नातवंडांना लाभायचा. कानांवर आजीच्या भूपाळ्या, आरत्या व आजोबांच्या तोंडचे श्लोक पडायचे. संस्कार करणारी पहिली व्यक्ती म्हणजे आई ही सतत मुलांजवळ असल्यामुळे त्यांच्या मनाला आपोआप चांगला आकार दिला जाई. पण सध्याच्या काळात विभक्त कुटुंबपद्धती अन् आई-बाबांची नोकरी यामुळे या संस्कारक्षम वयात मुलांना आवश्यक असलेला मानसिक आधार मिळत नाही. ही वडीलधारी मंडळी कामावर गेल्यावर मुलांना सांभाळायला ठेवलेल्या नोकरांच्या तोंडातील शिव्याच त्यांच्या तोंडात बसतात. अशी ही संस्कारहीन मुलं तरुणपणी घरात कुणाचाही दरारा नसल्यानं चैनीत दिवस घालवून व्यसनांना जवळ करू बघतात.

घरोघरी संध्याकाळी कानावर पडणारी 'शुभं करोती', 'मनाचे श्लोक' यांऐवजी आता सिनेमांची गाणी ऐकायला मिळतात. याचा परिणाम म्हणजे एखादं नुकतंच बोलायला लागलेलं मूल देखील 'इलु इलु' म्हणून नाचायला लागतं व घरातील मंडळीही त्याचं टाळ्या वाजवून कौतुक करतात, प्रोत्साहन देतात ( !)

आजच्या काळात त्यामुळेच, पराभव हसत हसत स्वीकारणं, विजयाचा आनंद व हर्ष संयमानं व्यक्त करणं, द्वेष-मत्सरापासून दूर राहणं, अंगीकृत कार्यावर निष्ठा ठेवून ते तडीस नेणं, घाम गाळून कमावलेला एकच 'छदाम'

आयत्या मिळालेल्या घबाडापेक्षा मौल्यवान आहे हे ठसविणं, आजूबाजूच्या गोष्टींतून व कृतीतून चांगल्या गोष्टी टिपणं, असे संस्कार जाणीवपूर्वक आपल्या मुलांवर सर्वांनी केल्यास अंधारात असणारा भारताचा भविष्यकाळ नक्कीच उज्ज्वल होईल.

## *एकविसाव्या शतकातील भारत*

माणूस आणि पशू यांतील ठळक फरक म्हणजे माणूस उद्याचा विचार करू शकतो आणि पशू तो करू शकत नाही. आज सर्व भारतीय एकविसाव्या शतकातील भारताचा विचार करताना दिसतात याला कारण माणसाची ही स्वाभाविक प्रवृत्तीच आहे.

एकविसाव्या शतकातील भारताचा विचार करताना आपल्याला भारताची वैशिष्ट्यं लक्षात घेतली पाहिजेत. विविधता हे भारताचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. विविध प्रकारची फळं, फुलं, भौगोलिक विविधता असलेला हा भारत निसर्गसौंदर्यानंही नटलेला आहे. या सर्वांमधून समान वैशिष्ट्य म्हणजे भारत हा कृषिप्रधान देश आहे. या देशातील बहुतांश लोक खेड्यांत राहतात. अफाट जनसंख्या असलेल्या या विशाल देशाला अतिप्राचीन महान संस्कृती लाभलेली आहे.

आजच्या भारताकडे एक दृष्टिक्षेप टाकला असता आपल्याला असं दिसतं की भारत आपला औद्योगिक विकास झपाट्यानं करत आहे. आधुनिक ज्ञानाच्या साहाय्यानं उद्योग, संरक्षण, वाहतूक याबाबतीत भारताने प्रगती केलेली आहे. आज भारताने विकसनशील देशांच्या मालिकेत अग्रस्थान पटकावलं आहे. एकीकडे ही प्रगती होत असतानाच दुसरीकडे आपल्याला आढळतं की झपाट्यानं वाढणारी लोकसंख्या ही एक गंभीर समस्या बनलेली आहे. साक्षरतेचं प्रमाण अगदी कमी आहे. दारिद्र्य, बेकारी या प्रश्नांनी उग्र स्वरूप धारण केलं आहे. औद्योगिक विकासाचा पर्यावरणावर विपरीत परिणाम झालेला आहे. राजकीय परिस्थिती बिकट आहे. नैतिक मूल्यांची घसरण झालेली आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर आपण एकविसाव्या शतकातील भारताचा विचार करणार आहोत. स्वर्गीय राजीव गांधींचं एकविसाव्या शतकातील भारताविषयीचं स्वप्न 'संगणकमय भारत' असं होतं. त्यांच्याप्रमाणेच इतर थोर व्यक्तींनीदेखील भारताच्या उज्ज्वल भवितव्याविषयी स्वप्नं पाहिली. खरोखरच या शतकातील भारताकडून असलेल्या अपेक्षा पूर्ण होतील का? ह्यासंबंधी विचार करताना आपण साक्षरता, औद्योगिक प्रगती, राजकीय परिस्थिती, लोकसंख्या आणि पर्यावरण या अंगांनी विचार करू या. भारताचा औद्योगिक विकास असाच झपाट्यानं होत राहिला, तर भारत उद्योगधंद्यांच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल. घराघरांतून कॉम्प्युटर येतील. पण हा कॉम्प्युटर सर्वसामान्यांची दुःखं सांगू शकेल का? आता आहे तेवढी माणुसकी जपली जाईल का? भारताच्या साक्षरतेत या शतकात काही वाढ होईल का? नव्हे, ही वाढ होणं आवश्यकच आहे. यासाठी निरनिराळी शैक्षणिक साधनं उपलब्ध असणं आवश्यकच आहे. झपाट्यानं होणाऱ्या औद्योगिक विकासात पर्यावरणाचा समतोल राखला जाईल का? हा देश खरोखरच सुजलाम् सुफलाम् राहील का?

राजकीय परिस्थिती आता आहे तशीच अस्थिर असेल का? भारताच्या इतिहासात असं दिसतं की शतकाच्या अंती राजकीय परिस्थितीत स्थित्यंतर झालं आहे. मग नॉस्ट्रेडॅमसच्या भविष्याप्रमाणे विसाव्या शतकाच्या शेवटी आणि एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीला राजकीय परिस्थिती बदलू शकेल. लोकसंख्या वाढ अशीच होत राहिली, तर एकविसाव्या शतकात भारताची लोकसंख्या १ अब्ज होण्याची शक्यता आहे. मग या प्रचंड लोकसंख्यावाढीमुळे अनेक गंभीर समस्या उत्पन्न होतील. जनतेचे राहणीमान खालावेल. सामान्य माणूस अधिकच दरिद्री होईल, म्हणूनच वाढत्या लोकसंख्येला आळा घातला गेला पाहिजे. आपल्या महान संस्कृतीची जपणूक होणे आवश्यक आहे. ही महान संस्कृती २१ व्या शतकात जपली जाईल का? आज मराठी ही मातृभाषा आहे. पण कदाचित या एकविसाव्या शतकातील यंत्रमय जीवनात हीच मराठी भाषा शिकवण्यासाठी परदेशातून लोक भारतात येतील. सध्या झालेलं रुपयाचं अवमूल्यन या शतकात थांबेल का? ही बिकट आर्थिक परिस्थिती बदलण्यासाठी अधिक कष्ट करून देशाचा विकास साधला पाहिजे.

या विषयावर खूप काही लिहिता येण्याजोगं आहे. पण मी मात्र एवढंच म्हणेन की, आपल्याला जर एकविसाव्या शतकातील भारताला समर्थ, स्वावलंबी बनवायचं असेल तर त्यासाठी आतापासूनच कामाला लागलं पाहिजे. म्हणतात ना,

*'कल करे सो आज कर ।*
*आज करे सो अब ।'*

---

## *लोकशाहीत वृत्तपत्रांचं स्थान*

असंच एका सकाळी वृत्तपत्र चाळत होतो. पहिल्याच पानावर बातमी होती. 'ज्यामुळे वृत्तपत्रांवर भयंकर बंधनं पडणार होती, असं सरकारनं संसदेत मांडलेलं विधेयक वृत्तपत्रांच्याच जोरदार विरोधाने आणि लढ्यामुळे रद्द झालं.' वाचून मन विचारांच्या सागरात बुडून गेलं. खरंच किती धडपड केली होती सर्व वृत्तपत्रांनी ! परंतु सरकारच्या मनमानी वर्तनाला अखेर वृत्तपत्रांनीच खीळ घातली ! विचार करता करता विचारांची नौका लोकशाही शासनपद्धतीवर येऊन थडकली. लोकशाही राज्यव्यवस्थेत या वृत्तपत्रांचं काय महत्त्व ? त्यांना येथे कोणतं स्थान प्राप्त झालं आहे ? त्यांचा उपयोग काय ?

खरं म्हणजे, लोकशाही म्हणजे लोकांचं, लोकांनी, लोकांच्या हितासाठी चालविलेलं राज्य ! देशातील सर्व लोकांनी सुखानं राहावं, सगळीकडे आनंद नांदावा हाच लोकशाहीचा हेतू नाही का ? लोकशाही म्हणजे लोककल्याण होय. परंतु यदाकदाचित सरकार या लोककल्याणावर गदा आणत असेल, तर मात्र जनतेनं प्रतिकार केलाच पाहिजे आणि जनतेनं लढा द्यावा, तो लढा सहजसाध्यपणे घडवून आणणारा 'हुकमी एक्का' म्हणजे वर्तमानपत्रं !

एखाद्या राज्यात सरकारचं किंवा सरकारी यंत्रणेचं राज्याच्या कारभारावर नीट लक्ष नसेल, नीट पकड नसेल तर वृत्तपत्रांच्या साह्याने जनता सरकारला जागे करू शकते. त्यांचा आवाज वर्तमानपत्रांद्वारे सरळ सरकारी यंत्रणेपर्यंत जाऊन पोहोचतो. वर्तमानपत्रातील लेखांनी जशी जनता सरकारवर कडकडून

का ? नाही ना ! मग मला का फेकलं ? शेगावचे थोर संत गजानन महाराजांनीही आपला नैवेद्य हा भाकरीचाच ठेवलेला आहे. कारण भाकरी ही एकता व बलाचे सामर्थ्य आहे. तसेच ते जगातील सर्व लोकांना परवडणारे धान्य आहे. हाच महाराजांचा त्यामागील दृष्टिकोन होता.

. . . सांगायचा उद्देश एवढाच की, जे श्रीमंत लोकांनी केलं, ते तुम्ही करू नका. देशातील एकता ही वाढीस लागली पाहिजे. जगातील सर्व लोक सुखी झाले पाहिजेत. देवाला चालला आहेस ना ? मग एकच मागणं माग की सर्वांना भाकरीची किंमत कळू दे."

एवढंच बोलून ती गप्प बसली. तेव्हा माझ्या मनात विचार आला—

*पोटासाठी भटकत जरी दूरदेशी फिरेन*
*मी राजाच्या सदनी अथवा दूर रानी शिरेन ।*

## *मी पाऊलवाट बोलतेय !*

तशी मी ग्रामीण, खेडवळ. शहरांतून डांबरी रस्त्यांवरून वावरणाऱ्या पोषाखी माणसांना माझी महती ती काय कळणार ? तरी पण डांबरी रस्त्याच्या उग्र व तिरसटपणाला कंटाळून काही माणसं जेव्हा खेडेगावाकडे वळतात तेव्हा त्यांची नि माझी तात्पुरती का होईना पण गट्टी जमते ! हिरव्यागार शिवारांतून, रानावनांतून, कड्याकपारीतून, माळरानावरून त्यांना माझी सोबत होते. डोंगरउतरणीकडून किंवा निसरड्या नदीकाठावरून जाताना माझ्या खोडसाळपणाचाही त्यांना अनुभव येतो. गुरामागं बागडणाऱ्या गुराख्यांची अन् माझी कायमस्वरूपी गट्टी पाहून त्यांना आमचा हेवा वाटतो. एखादा जमदग्नी किंवा दुर्वास जर माझ्या वाटेला गेला तर त्याला मी अन् माझ्या सख्या जाळ्यात अडकवून कायमची अद्दल घडवतो. आणि मग हे महाशय माझ्यापासून चार हात दूरच राहतात.

तशी मी खूपच भावनाप्रधान आहे. चुकलेल्या एखाद्या कोकराला किंवा वाट चुकलेल्या रडणाऱ्या एखाद्या बालकास मी अलगद त्याच्या घरी नेऊन

पोचवते. माझ्या अत्यंत हळव्या मनावर कित्येक पाऊलखुणा उमटलेल्या असतात. त्या पाहून अनेक दुरावलेले जीव परत एकमेकांना भेटतात आणि पाषाणहृदयी डांबरी रस्त्याचा क्रूरपणा त्यांना उमगतो. अनेक वेडेपीर माझा तासन्तास मागोवा घेत राहतात. कोणी जंगलात पोहोचतात तर कोणी एखाद्या अगम्य टेकडीवर, शिखरावर जाऊन बसतात.

मग नंतर कोणी तेथील निसर्गाचं वर्णन करत बसतात, तर कोणी कविता आळवतात. एखादा कलाकार आपल्या कुंचल्यानं माझी हुबेहूब छबी कागदावर साकार करतात. काही वैज्ञानिक माझ्या सोबतीने तासन्तास पक्षिनिरीक्षण करतात आणि त्यांचे मधुर संगीत कानात साठवून ठेवतात. काही धाडसी वीर माझ्या अंगावरील पाऊलखुणांचा अभ्यास करून वाघ-सिंहासारख्या जंगली श्वापदांनाही जेरीस आणतात.

एक ना दोन, किती सांगाव्यात तुम्हाला कथा !

---

## *महाबळेश्वर : एक रमणीय स्थळ*

भारतात रमणीय, आल्हाददायक अशी अनेक पर्यटन स्थळे आहेत. पण ती सगळीच सामान्य माणसांच्या खिशाला परवडणारी नसतात. अन् दूरही असतात. तसा मी पुण्याचा ! महाराष्ट्रात असे एक पर्यटनस्थळ आहे की, तेथे जाणे तुमच्या-आमच्यासारख्या सामान्याला परवडणारे आहे व तेथे जाण्यास वेळ तो कितीसा लागतो ? अवघे चार तास ! आपण काही तासांतच निसर्गाच्या सान्निध्यात जातो आणि ते ठिकाण म्हणजे महाबळेश्वर ! मी या ठिकाणाची रमणीयता पहिल्यांदा अनुभवली ती शाळेच्या सहलीत.

महाबळेश्वर सह्याद्रीचा जणू राजमुकुटच ! महाबळेश्वर हे नुसते थंड हवेचे ठिकाण नसून निसर्गसौंदर्याने नटलेले पर्यटन केंद्र आहे. महाबळेश्वरच्या एका बाजूस वाई तर दुसऱ्या बाजूस अजगराप्रमाणे पसरलेला अंबोली घाट आहे. महाबळेश्वरच्या एका अंगास इतिहासप्रसिद्ध प्रतापगड आहे. मी जेव्हा सनराईज पॉईंटवरून सूर्योदयाचे नयनरम्य दृश्य पाहत होतो त्या वेळेस माझ्या

डोळ्यासमोरून उद्धव गिरी यांच्या सकाळ कवितेतील 'आली लाजत आज सकाळ, मेंदीभरल्या चरणी बांधून, सोनफुलांचे चाळ' ही काव्यपंक्ती तरळून गेली. सह्याद्रीच्या असंख्य रांगांमधून एक लालभडक गोळा अगणित रंगांची उधळण करीत हळूहळू वर येत असतो. ते दृश्य पाहताना मन कधी हरपते तेच कळत नाही, तर बॉंबे पॉईंटवरून सूर्यास्ताचा देखावा इतका नयनरम्य दिसतो की तो अस्ताला जाणारा सूर्य व आकाशात अंधुकपणे चमकणाऱ्या चांदण्या पाहून असे वाटते की, 'आली होती भरती आता अस्तसमुद्राला त्या लाटांतून काय सांडल्या या मौक्तिकमाला !'

या महाबळेश्वरवर निसर्गाची कृपादृष्टी आहे. तेथील वातावरण माणसाला रोज नवे चैतन्य देणारे आहे. येथे उन्हाळ्यातसुद्धा हवेत एक प्रकारचा थंडावा असतो. थंडीत जेव्हा धुके खाली उतरते त्या वेळेला असे वाटते की, हे धुकं आपल्या कानांत काहीतरी सांगतंय, आपल्याशी गुजगोष्टी करतंय. परंतु पावसाळ्यात मात्र निसर्ग रुद्रावतार धारण करतो. महाबळेश्वरात प्रचंड पाऊस पडतो. अंबोलीच्या पाताळ गाठू पाहणाऱ्या दरीत पडणाऱ्या धबधब्यांचा आवाज कानात घुमतो. वारा सह्याद्रीच्या दरीत घुमत-घोंघावत स्वैर संचार करतो. त्या वेळी असे वाटते की जणू निसर्गमाता मनुष्याच्या अहंपणाला टप्पलच मारत आहे. पण जेव्हा पावसाळा संपतो तेव्हा महाबळेश्वरच्या प्रदेशाने हिरवागार शालू नेसलेला असतो. जाई, जुई, अनंत, गुलाब अशा विविध फुलांनी बहरलेली झाडे वाऱ्याच्या झुळकेबरोबर हळुवारपणे डुलत असतात. ही सर्व निसर्गाची किमया पाहून असे मनात येते की, मानवाने जरी विज्ञानयुगात प्रगती केली असली तरी निसर्गासमोर मानव हा अगदी क्षुद्र आहे.

आपण अशा एखाद्या रमणीय ठिकाणी जाऊन येतो. त्या वेळी आपल्या रोजच्या धकाधकीच्या जीवनातील मरगळ, खिन्नता निघून जाते. आपल्या जीवनाला एक वेगळी गती मिळते. नवे चैतन्य मिळते. आपण जर कधी एकटे असलो किंवा आपल्याला एकाकीपणाची जाणीव होत असली, तर अशा एखाद्या रमणीय स्थळाच्या सहलीच्या सुखद आठवणी आपल्याबरोबर राहून आपल्याला अखंड साथ देतात.

## 'आला श्रावण श्रावण !'

*'श्रावण मासी हर्ष मानसी*
*हिरवळ दाटे चोहीकडे*
*क्षणात येते सरसर शिरवे*
*क्षणात फिरुनी ऊन पडे !'*

ही बालकवींची छोटीशी काव्यपंक्ती सबंध श्रावणातील वातावरणाचे दृश्य आपल्या डोळ्यांसमोरून तरळत नेते.

तसेच 'नेमेचि येतो मग पावसाळा' असे आपण म्हणत असलो, तरी नित्यनेमाने आपण श्रावणातल्या पावसाची आतुरतेने वाट पाहत असतोच. कारण त्यापूर्वी ग्रीष्माच्या भव्य कढईत आपल्या देहाची अगदी लाही लाही उडालेली असते. त्यामुळे 'श्रावण आणि श्रावणातला पाऊस' हा हवाहवासा वाटणारा पाहुणा ठरतो.

मोठ्या प्रेमाने होणाऱ्या त्याच्या स्वागताला दुसरेही एक कारण आहे आणि ते म्हणजे या श्रावणातल्या पावसावर माणसाचे जीवन खऱ्या अर्थाने अवलंबून असते.

या श्रावणाच्या पूर्वी सारी धरित्री अगदी तापून निघालेली असते. जमिनीला पडलेल्या भेगा तिच्या मनाची विदीर्णता व्यक्त करत असतात. पृथ्वीपुत्र मानवाचीही तगमग चालू असते. झाडे, पाने पाण्यासाठी आसुसलेली असतात. दिवसाकाठी सर्वांचे नेत्र पाच-दहा वेळा तरी आकाशाकडे वळत असतात पण लबाड मेघ मात्र मानवाला हुलकावणी देत असतात.

पण अशा या अवस्थेत एखाद्या दिवशी अचानक नभांगणातील रागरंग बदलून श्रावण टपोऱ्या निळ्या रत्नांसंगे सृष्टीत आगमन करतो आणि साऱ्या सृष्टीत कमालीचा फरक घडवून आणू लागतो.

श्रावणातील कोवळ्या उन्हाने हळूहळू सर्वांचे मन उल्हसित व्हायला लागते. श्रावणात मध्येच कुबेराघरच्या निळ्या रत्नांसारखा रत्नांचा पाऊस सुरू होतो, तर थोड्याच वेळात त्याच्याच घरच्या दिव्य सोन्याचा सोनेरी, पिवळा प्रकाश पृथ्वीला आहे त्याच्यापेक्षा जास्त तेजस्वी करू पाहतो. अशा प्रकारे निळ्या

रत्नांच्या स्नानाने आणि सोन्याच्या कोवळ्या सोनेरी प्रकाशाने पृथ्वी पुन्हा एकदा चकाकून निघते, तेजस्वी होऊ लागते. आणि मग मरायला टेकलेल्या वेली, वृक्ष, पाने, फुले या पुन्हा एकदा जिवंत होऊन त्यांना नवी कोवळी पालवी फुटू लागते आणि मानवाच्या गोठलेल्या आसवांना नवनवीन पंख येऊ लागतात.

सगळीकडे तेजस्वी, उल्हसित वातावरण पाहिले की सहजच कवीच्या मनात,

*'आला आषाढ श्रावण*
*आल्या पावसाच्या सरी,*
*किती चातकचोचीने*
*प्यावा वर्षाऋतु तरी !'*

ह्या काव्यात्मक ओळी फेर धरू लागतात.

आणि पावसात नाचणाऱ्या बालगोपाळांचा मोठ्यांना हेवा वाटू लागतो. मग ते पण आपल्या प्रौढपणाचे बुरखे बाजूला ठेवून मुलांबरोबर श्रावणातला पाऊस मनसोक्त अनुभवतात. तृषार्त धरतीमाताही श्रावणातल्या पावसाने तृप्त होते, निवते. आणि तिच्या समाधानाचा परिमल सर्वत्र दरवळतो. त्या मृद्‌गंधानेच मानव श्रावणाचे आणि त्याच्या पावसाचे हेवा वाटावेसे पूजन करतो.

## वेळेचा सदुपयोग

वेळ एक अमूल्य वस्तू. ही दुर्मिळ वस्तू अतिशय हिशोबीपणे, काटकसरीने, विचारपूर्वक वापरायला हवी. इंग्लिशमध्ये एके ठिकाणी म्हटले आहे, 'Time is money. Time and tide wait for none' वेळ आणि भरती कुणासाठीही थांबत नाही. घड्याळ टिक् टिक् करत सांगत राहते, 'आला क्षण, गेला क्षण !' हा पुढे पुढे धावणारा काळ कुणासाठी थांबत नाही. हिंदीत म्हटले आहे, 'क्षण को क्षुद्र न समझो भाई, क्षण जगका निर्माता है ।' प्रत्येक क्षणाला एक वेगळंच महत्त्व आहे. असा हा दुर्मिळ असलेला, लाखमोलाचा क्षण सोनक्षण मानून जपायला हवा. क्षण देवो भव म्हणत क्षणाची उपासना-आराधना करायला हवी.

येता-जाता आपल्या कानांवर शब्द आदळतात, 'वेळ झाला नाही', 'वेळ मिळत नाही', 'वेळच सापडला नाही हो !' तसे पाहिले तर प्रत्येकाचा दिवस चोवीस तासांचाच असतो. प्रत्येकाच्या वाट्याला सारखेच तास येतात. पण बरेच जण आळसात, चैनीत, गप्पा-टप्पात, वादावादीत, आरामात आपला किमती वेळ वाया दवडतात. 'समय गँवाया खाते-सोते' अशी अनेकांची स्थिती असते. जीवनात यशस्वी होण्यासाठी सर्वांत गरज असते, ती वेळेचा सदुपयोग करण्याची !

जीवनात जे यशवान, कीर्तिमान होतात, ते वेळेचा विनियोग यथायोग्य रीतीने करतात. वेळेचा आदर ठेवतात. प्रत्येक काम वेळेनुसार हातावेगळे करतात. ज्ञान, पैसा, मानसन्मान, कौशल्य या साऱ्यांच्या प्राप्तीसाठी वेळेचा सदुपयोग अत्यावश्यक आहे. 'वेळ नाही' असे रडगाणे, तुणतुणं आळशी, बेपर्वा, उदासीन माणूस वाजवत असतो. पण विचारी, जिद्दी, काहीतरी वेगळे, अधिक चांगले करू इच्छिणारा माणूस आपल्या वेळेच्या बाबतीत काटेकोर असतो, जागरूक असतो. त्याच्या वेळाची वाटणी त्याने विचारपूर्वक केलेली असते. त्यानुसार आखणी करून तो नियमित, निश्चित वेळात काम पुरं करण्यासाठी धडपडत असतो. प्रत्येक गोष्ट वेळेवर, वेळेनुसार करण्याची ज्याला सवय जडते· तो निश्चिंत असतो.

गेलेला क्षण दुरून वाकुल्या दाखवत राहतो. त्याने हुलकावणी दिली की आपले मात्र पार धाबे दणाणते.

*गेला क्षण नजरेआड होतो ।*
*नवा क्षण नकळत सामोरा येतो ॥*

जुना क्षण मागे फिरत नाही आणि नवा क्षण बघता बघता हुलकावणी देत हातावर तुरी देत सूंबाल्या करतो. इकडे तिकडे जाऊन चकाट्या पिटत बसण्यापेक्षा क्षणाचं मोल ओळखून आपण वागायला हवं, वेळेचं गणित ज्याला नीट सोडवता येईल तो नेहमी प्रगतिपथावरच राहील. सतत उद्योगात रमणारी व्यक्ती तिचे (वेळेच्या वेळापत्रकानुसार) दैनंदिन कार्य वेळेचा सदुपयोग करता करता पुढे सरकत असते. वेळेचा सदुपयोग म्हणून छंद जोपासले पाहिजेत. अवांतर वाचनाचा भरपूर सराव करायला हवा. कलासाधना, कलानंद हे अधिकाधिक प्रमाणात प्राप्त व्हावेत, म्हणून वेळेचा सदुपयोग कसा होईल, याचा

ध्यास घ्यायला हवा. वेळेच्या बाबतीत तुम्ही-आम्ही जागरूक असायला हवे. स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक यांनी तुरुंगातल्या दिवसांचा-वेळेचा सदुपयोग केला. 'उभा जन्म देशसेवेसाठी' असं म्हणत कालक्रमण करणारे देशभक्त, चोवीस तास संशोधनात रमलेले शास्त्रज्ञ, ज्ञानसाधना करणारे ज्ञानोपासक हे सारे— अमूल्य वेळ सत्कर्मात घालवतात. सदुपयोग करून आयुष्याचे सोने करतात. 'क्षण देवो भव' हा कानमंत्र म्हणूनच सदैव तुम्ही-आम्ही जपायला हवा.

वेळेचा सदुपयोग म्हणजे जीवनात सर्व आघाड्यांवर यश मिळवण्यासाठी जपलेला मूलमंत्रच होय.

## *व्रतवैकल्ये आणि आम्ही*

नव्याचे वारे प्यायलेले नवीन पिढीचे युवक जुन्याकडे उपेक्षेने, हेटाळणीच्या वृत्तीने पाहत, 'जुने जाऊ द्या मरणालागुनि' असे बेधडक म्हणत सुटतात. मूर्वीची व्रतवैकल्ये त्यांना टाकाऊ वाटतात, हास्यास्पद वाटतात आणि व्रतवैकल्ये, उपासना म्हणजे म्हातारपणी करण्याच्या खुळ्या गोष्टी अशी गैरसमजूत ते करून घेतात. पण असे मानणे सर्वस्वी चुकीचे आहे. जुन्या पिढ्यांनी नेमधर्म, व्रतवैकल्ये विचारपूर्वक, एका विशिष्ट हेतूनेच आखलेली, स्वीकारलेली आणि निष्ठापूर्वक पाळलेली होती हे आपण खोलात जाऊन पाहिल्यास आढळून येईल.

नेमनियम हे आवडीने पाळलेले, मनाने स्वीकारलेले असते. व्रतवैकल्याच्या मुळाशी एक शिस्त आहे, वागण्याचे वळण, अनुसरलेली विशिष्ट पद्धती आहे. एक निश्चय, निर्धार करून टामपणे अडचणींवर मात करून ही व्रतवैकल्ये समर्पणाच्या, त्यागाच्या उदात्त भूमिकेतून आपण म्हणूनच पूर्वीच्या लोकांप्रमाणे पाळायला हवीत.

स्वातंत्र्यवीर सावरकरांनी देशसेवेचे स्वीकारलेले व्रत, 'बुद्ध्याची वाण धरिले करि हे सतीचे' किंवा 'की घेतले व्रत न हे अम्ही अंधतेने' अशी खंबीर जाण त्यामागे होती. जुन्या अनेक व्रतवैकल्यांमागे त्यागभावना, समर्पणवृत्ती, विनम्रता-कृतज्ञता, सत्कर्म करण्याची ऊर्मी इत्यादी अनेक उद्दिष्टे होती. तुळशीला

पाणी घालणे, तुळस-वड यांना प्रदक्षिणा घालणे, एकभुक्त असणे, उपवास करणे, लक्ष बेल वाहणे, आवडीची वस्तू सोडणे, भुकेल्याला जेवू घालणे, अशी कितीतरी व्रतवैकल्ये जुन्याकाळी केली जात. आज आम्ही विद्यार्थ्यांनी हा वसा डोळसपणे, विचारपूर्वक नव्या काळाला अनुसरून पण घेतला पाहिजे.

श्रावणमास हा तर व्रतवैकल्यांचा लाडका महिना. प्रसन्नता, समृद्धी, आनंद यांनी भरलेला-भारलेला हा जादुई मास. आम्ही विद्यार्थ्यांनी, आजच्या पिढीने पुढील व्रतवैकल्ये मनाने स्वीकारून जिद्दीने पाळायला हवीत.

(१) रोज पहाटे नेमाने उठून मोकळ्या-ताज्या हवेत फिरायला जाणे. यामुळे निसर्गाच्या सान्निध्यात रमता येते, फिरण्याचा व्यायाम शरीर स्वास्थ्यासाठी उत्तम असतो.

(२) मी रोज नेमाने गीतेतला एक श्लोक आणि मनाचा एक श्लोक— अर्थ लक्षात घेऊन पाठ करेन. विचारांना-बुद्धीला चालना मिळणे आणि उत्तम संस्कार होणे या दृष्टीने हा नेम लाभदायक आहे.

(३) नासधूस टाळून अन्न, पाणी, कपडा, ऊर्जा, शक्ती, सामाजिक संपत्ती यांची बचत करेन.

(४) मी झाडे लावीन. त्यांची निगा राखून जोपासना करेन.

(५) घर-परिसर-शाळा यांची स्वच्छता राखेन.

(६) रोज नेमाने सत्कर्म करेन.

(७) गरिबांना मदत करेन. सेवातत्पर राहीन.

(८) घरी-दारी शिस्तीचे पालन करीन. वडीलधाऱ्यांशी नम्रतेने वागेन. सर्वांशी प्रेमाने वागेन.

(९) मी स्वावलंबनाचा वसा घेईन.

(१०) मी देशसेवेचे व्रत अंगिकारेन.

नवीनतेची आस बाळगून, नवीन दृष्टिकोन ठेवून नव्याची तुतारी आम्ही निष्ठापूर्वक स्वप्राणाने फुंकायला हवी. 'प्रतिक्षणी नवीच दे रुची' ही मोरोपंतांची उक्ती लक्षात घेत आम्ही नवी व्रतवैकल्ये शोधायला, स्वीकारायला हवीत, नेमस्तपणे पाळायला हवीत. तरच आपण प्रगती साधू शकू, विकास करू शकू आणि निर्मळ, निखळ आनंद मिळवू शकू.

*

३०६६० निबंध

# अभ्यासासाठी

## *जय स्वावलंबन*

स्वावलंबन म्हणजे कोणत्याही गोष्टीसाठी दुसऱ्या व्यक्तीवर अवलंबून न राहणे. अर्थातच स्वतःची कामे स्वतः करणे. आपण दुसऱ्यावर अवलंबून राहिल्याने आपली कामे नीटनेटकी तसेच वेळच्या वेळी होत नाहीत, तर काही कामे तर कधीच पूर्ण होत नाहीत. कधी पूर्ण झाली तरी त्यामध्ये गोंधळ झाल्याने पुन्हा तेच काम आपल्यालाच पूर्ण करावे लागते. काही वेळा दुसऱ्याने केलेले काम आपल्याला पसंत पडत नाही.

आपल्या अंगी जिद्द व चिकाटी हे दोन गुण असतील, तर आपण पूर्णपणे स्वावलंबी होऊ शकतो. आपली कामे आपण पूर्ण केली तर आपला वेळ वाचतोच पण शक्ती पण वाचते. आपण जाणूनबुजून परावलंबी राहणे हे योग्य नाही. पण काही काही बाबतीत मात्र आपल्याला दुसऱ्यावर अवलंबूनच राहावे लागते. त्याशिवाय या जीवनातील आपल्या गरजा पूर्ण होत नाहीत. उदा॰ आपल्याला वस्त्राची गरज भागवण्यासाठी शिंप्याकडे जावेच लागते. तसेच अन्न व निवारा या गरजा भागविण्यासाठी शेतकरी व गवंडी यांची नितांत आवश्यकता भासते. पण जीवनात फक्त आपण आपली कामे स्वतःच करत

बसलो तर आपली इतर कामे राहून जातील. उदा॰ आपण स्वावलंबनाचे पाठ गिरवत बसलो, तर अभ्यास व खेळ राहून जातील.

पण असा अतिरेक न करता मिळेल तितका जास्तीत जास्त वेळ स्वतःची कामे उरकण्यात घालवला तर सर्व जमू शकेल. उगाच रेंगाळत न राहता सर्व भराभर उरकून स्वतःची कामे करता आली पाहिजेत. 'केल्याने होत आहे रे. आधी केलेचि पाहिजे'. वेळ मिळत नाही, ही सबब मग विरून जाते.

स्वावलंबनाने माणसाच्या जीवनाला एक वेगळीच शिस्त लागते. तसेच आपण नीटनेटके राहतो. स्वावलंबनाने माणसाचा स्वतःबद्दलचा आत्मविश्वास तर वाढतोच, पण आपले कौशल्यही वाढते. आपले दुसऱ्यावाचून कधीही कोणत्याही कारणासाठी अडून राहत नाही.

आपल्याला थोडे तरी स्वावलंबी होता आले पाहिजे. समजा, आई-वडील बाहेरगावी गेले असता किंवा कोणी घरात नसताना आपल्याला न्याहरीसाठी अन्न शिजवता आले पाहिजे. त्याबरोबरच कपडे धुणे, शर्टाचे बटण लावणे, बिछाना अंथरणे, आपले सामान नीटनेटके ठेवणे, भांडी घासणे ही कामे आपल्याला करता आली पाहिजेत.

आपण स्वावलंबी होणे म्हणजे फक्त आपलीच कामे करणे असे नव्हे, तर इतरांना मदत केली पाहिजे. काम करण्याची सवय असल्यास हेही जमू शकते.

स्वावलंबन हे माणसाच्या जीवनातील एक महत्त्वाचे अंगच आहे, म्हणूनच 'जय स्वावलंबन !'

## *एका शेतकऱ्याचं मनोगत*

"राम राम पाव्हणं. नवीनच आल्ता व्हय या गावास्नी ? कारन की म्या. . . नाय, नाय तुम्ही मागल्या वर्सी येऊन गेल्ता की ! म्या चांगला वलुखतो तुम्हास्नी. काय वलखलंत की नाय मला ? अहो, म्या हाय म्या ! गावात ऱ्हानारा येक शेतकरी ! बरुबर, तुम्ही कसं वलखनार मला ! तुम्ही तर त्या पल्याडल्या शहरातलं न्हागरिक नव्हं का ! चार वंगूळं वरच राहत्याती ! मग मला कसं

वलखणार !

खरं म्हंजी तुम्ही मला वलखायला पाहिजं व्हतं. कारन तुम्हीच नव्हं का तुमच्या त्या पुस्तकांमंदी शिकता की, शेतकरी ह्यो समद्या समाजाचा कसला तो बिंदू का काय, हां क्येंद्रबिंदू हाये. असं तुम्ही म्हन्ता. तुम्ही त्या बुकातून शिकता की, ह्यो शेतकरी फकस्त क्येंद्रबिंदू हाय. त्याला पन, लै हालअपेष्टा सोसाया लागताती. त्यो दारिद्र्यात निस्ता खितपत पडलेला अस्तो. त्ये सावकार, जमीनदार त्याच्यावर लै जुल्म, जबरदस्ती करत्यात. नव्हं का ? पर तुम्ही निस्तं पुस्तकामंदी शिकता. खरं कोन्ही पाह्यलंय का वं की, ह्यो शेतकरी कोन हाय ? त्याला काय काय लागतं ? त्याच्या गर्जा काय हैती ? कोन्ही बघितलंय का वं ? कोन्ही नाय ! उलट, तुम्ही, तुम्हास्नी माहीत आस्तं की ह्यो शेतकरी लै दळभद्री हाय, तऱ्ही तुम्ही त्याच्यावर जुल्म-जबरदिस्ती चालूच ठेवता !

मी म्हनतोय की, ही जुल्म-जबरदिस्ती, ह्ये दारिद्र्य आमच्यावर कोनी लादलं ! आम्हास्नी ऐसं खितपत कोनी पाडिलं ? ह्यो शहरी लोकांन्ही न्हाई तर आनी कोनी ? आम्ही पडलो आडाणी, असिक्षित ! या जातिव्यवस्थेनं आमचं आयुष्य बरबाद ज्हालं ! ही जातिव्यवस्था कोनी तैयार केली वं ? तुम्ही नाय तर आनी कोनी ? ह्या सावकारी, जम्हीनदाऱ्हीमुळं आम्हास्नी जिणं हराम झालं. त्यांच्या कर्जानी आमचं सम्दं कुळबीळं नायनाट होवू लागिलं. आमची घरंदारं हडप केली, जमीन गिळली. बायकामुलीस्नी कलंक लावला. ह्ये जम्हीदाऱ्ह कोन व्हते वो ? शाऱ्हातलंच ना ? सुसिक्षित । आणि तिकडनं कोनी साधुसंन्याशी बन्हून आलं आनि आम्हास्नी त्यी कसली श्रद्धा म्हन्तात ना, हां अंधश्रद्धा, त्याचत्या जाळ्यामंधी फशिवलं, मायेच्या खोल किचडात, चिकलांत पुरं गाडून टाकलं ! पर मी म्हन्तो, काय फायदा झाला हो ह्यांचा आम्हास्नी ऐसं पिळून ? तावूनसुलाखून निघालो आम्ही ! नंतर कोनी म्हनलं, देसाला सवातंत्र्य मिळालं. कोन विंग्रज परत गेले, देसात सवताचं सरकार आलं. पन, पन आमच्यावर काही म्हंजी काही फरक पलडा नाय. आमचा कदी यांनी ईच्च्यारच क्येला न्हाय ! कंधी म्हन्जे कंधी आम्हास्नी समजून, उमजून घ्येतलं न्हाय !

त्याचंच का काय भोग त्यास्नी आता भोगावं लागतं हायेत. शऱ्हात आता लै परदुषन वाढतं हाये म्हने. याचा लै इपरित परिनाम त्यांच्यावर व्हनार हाय ! पर आम्हास्नी कंदीबी वाटायचं न्हाय की, त्यांचं लै वाईट व्हावं. आम्ही त्यास्नी

दुवाच देत न्हाऊ. तुम्ही कंदीबी गावात या, तुमचं स्वागतच व्हईल. पर तुमच्यामधला पाप्याचा मईंद कोन्ही असंल, तर त्याचं आता इथं काहीबी चालनार न्हाय. तो आमच्यावर आता कंदीबी राज्य, दादागिरी, सावकारी करू श्यकनार न्हाय. कारन, कारन आता आम्हीबी तुमच्यासारखं ईकसित व्हत आहोत. आताच्या गावातल्या नव्या पिढीस्नी ह्ये समजलं हाय की, आपल्याच हातामंधी देसाचा ईकास हाय. तवा ती पिढी आता सिक्शन घ्येत हाये. माझी भाष्या ऐकून तुम्हास्नी ह्ये खोटंनाटं वाटत असलं. पर तसं न्हाय. मी पल्डो लै म्हातारा. पर आताची पिढी तसली न्हाय. ती शिकनार, लै म्होठी व्हनार अन् आमचा राज्यकारभार चांगला चालवनार. ह्यात म्हात्मा ज्योतीराव फुल्ये, बाबासाह्येब आंबेडकर यांच्यासारखा महान म्हानसांचा लै मोठा हात हाये. त्येंनी ऐसं क्येलं नसतं, तर आम्ही ह्ये दिवस पाहिलं नसतं. आमचे तरुन पुत्र लै धडपडी करून सरकारकडून मदत घ्येत हैत. त्यांनी गावागावांत शाळा काढल्या, ईविध सहकारी संस्था काढल्या, साखरकारखाने लावले अन् परत्येकाला नोकरीला लावलं. परत्येक घरन् घर सुधारित आहे, सुसिक्षित व्हत आहे. म्याबी नुकत्याच स्थापन झालेल्या वुरुदाधांच्या साळंत म्हाझं नाव घ्यातलं हाये.

म्हनून म्हनत व्हतो की, आता परत्येक गाववाल्याला सवताचं वेगळं असं जीवन लाभलं हाये. आनि म्हनूनच तुम्ही मला वलखायला पाहिजं व्हंतं. पन जाऊदे, पुन्हा परत गावात या बरं का. पन जेव्हाही याल ना तेव्हा ह्ये गाव परतेकवेळी तुम्हास्नी बदललेलं दिसंल. विकसित होत असलेलं सुंदर, सुसिक्षित, हरभरं... !

---

## *माझी मायबोली*

'मराठी असे आमुची मायबोली, जरी भिन्न धर्मानुयायी असू,' असे माधव ज्यूलियन यांनी म्हटलेच आहे.

महाराष्ट्रात राहणाऱ्या बहुसंख्य लोकांची मातृभाषा मराठी आहे. माता, मायभूमी आणि मातृभाषा या तीनही गोष्टी प्रत्येकाला अभिमानास्पद असतात.

आपण पहिले बोबडे बोल आपल्या मातृभाषेतूनच व्यक्त करतो. आपण पुढील आयुष्यात जरी अनेक भाषांत ज्ञानी झालो, तरी सुद्धा आपल्या अंतःकोषात आपल्या मायबोलीलाच स्थान असते. आपल्या तोंडातून आनंदाच्या क्षणी, दुःखाच्या क्षणी किंवा भीतीच्या क्षणी बोल निघतात ते मायबोलीतूनच.

माझ्या मायबोलीला अमर्याद अशी परंपरा लाभली आहे. मराठीतील पहिला शिलालेख बेळगाव मधील 'श्रवणबेळगोळ' येथील 'गोमटेश्वराच्या' पायथ्याशी आढळतो. मराठीतील आद्यग्रंथ म्हणून 'ज्ञानेश्वरी'चा उल्लेख केला जातो. माझी मायबोली मराठी ही फार भाग्यवान आहे. तिला लाभलेला पहिला सुपुत्र म्हणजे 'ज्ञानदेव'. १३व्या शतकात सांगितले आहे की, 'माझी मराठीची बोलु कौतुके परि अमृततेही पैजा जिंके.' ज्ञानेश्वरांनंतर अनेक संतांनी, पंडित-कवींनी आणि शाहिरांनी मराठी भाषेचे साहित्यभांडार अखंड केले आहे.

तेव्हापासून सुरू झालेली ही माझ्या मायबोलीच्या साहित्याची परंपरा आजवर अखंड चालू आहे. आजही मराठी साहित्य भारतीय साहित्यात मानाचे पान मिरवत आहे. माझ्या मायबोलीतील अनेक उत्कृष्ट साहित्याचा इतर भाषांत अनुवाद होतो. माझी मायबोली कथा, काव्य, नाटक, विनोद, आत्मचरित्र या विविध अंगांनी फुलून गेली आहे. एवढे मोठे साहित्य कोणत्याच भाषेत नाही यात काय शंका !

आज माझ्या मायबोलीला राज्यभाषेचा मान लाभला आहे. मराठी ही महाराष्ट्राची राज्यभाषा आहे. सर्व व्यवहार मराठीतच चालावेत असा नियम आहे. कारण– पूर्वी इंग्रजांनी आपल्या भाषेवर हल्ला चढवून काही लोकांना इंग्रजीची आवड निर्माण करून दिली. जे इंग्रजीच्या मागे लागले आहेत त्यांना पाहून असे वाटते की, सर्वांनी गर्वाने म्हटले पाहिजे,

"हिचे पुत्र आम्ही हिचे पांग फेडू, वसे आमुच्या हृद्‌मंदिरी"

## *नको विषमता हवी समता*

'आम्ही सारे भारतीय एक आहोत. सारे भारतीय माझे बांधव आहेत.' अशी प्रतिज्ञा आम्ही रोज घेतो. आमच्या पाठ्यपुस्तकात ही सुरुवातीला छापलेली

आहे, पण प्रत्यक्षात चित्र काय दिसते. आम्ही खरोखरीच प्रतिज्ञेप्रमाणे वागतो ? किंवा खरेच ती आचरणात आणण्याचे प्रयत्न तरी करतो का ?

'सारी माणसे ही एकाच ईश्वराची लेकरे आहेत' असे आपण सतत म्हणत असतो आणि तरीही आपण सतत आपापसात झगडत असतो. माणसांमधील या संघर्षाला कधी धर्म कारणीभूत ठरत असतो. कधी धन, कधी जात तर कधी भाषा. देवाने माणसाला बुद्धी दिली आहे. पण अशा वेळी तो माणूस आपली बुद्धी गहाण टाकत असावा. अन्यथा आपल्यातील काही लोकांना अस्पृश्य लेखून त्याने त्यांना हजारो वर्षे आपल्यापासून दूर ठेवले असते का ? त्यांची सावली देखील अपवित्र, अपशकुनी मानली जाते. त्यांना गावकुसाबाहेर ठेवले जाते. साधे पाणी देखील त्यांना मिळणे मुश्कील होत असे. मग शिक्षण कुठले ? मुळातच अज्ञान, अंधश्रद्धा यांनी या अभागी जीवांचे जीवन पोखरलेले असते आणि यात भर म्हणून स्वतःला उच्च समजणारे लोक त्यांच्यावर सतत अन्याय करीत असतात. ज्यांच्यावर अन्याय होतो ती माणसे, जी अन्याय करतात ती पण माणसेच !

ज्या थोर महात्म्यांनी हे विदारक सत्य जाणले, त्यांनी विषमतेची ही दरी बुजवण्याचा अथक प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी सर्वांना मानव धर्माची साद घातली. ज्ञानेश्वरांच्या काळी चातुर्वर्ण्याचे स्तोम माजले होते. स्वार्थी माणसांनी आपल्याभोवती रूढींचे अडथळे उभारले होते. ज्ञानेश्वरांनी ते दूर केले. सर्व जातीजमातीच्या लोकांना त्यांनी पंढरीच्या वारीत सामील करून घेतले. त्यात गोरा कुंभार होता, नरहरी सोनार होता, नंद खाटिक होता, बंका महार होता कारण ज्ञानदेव एकच जाणत होते की मी माणूस आणि तीही सारी माणसेच.

*'ती माझी, मी त्यांचा*
*एकच ओघ आम्हातून वाहे ॥'*

ज्ञानेश्वरांचे हे कार्य एकनाथांनी पुढे चालू ठेवले. तापलेल्या वाळवंटात उन्हाचे चटके असह्य होऊन रडणाऱ्या अस्पृश्य बाळाला त्यांनी उचलून प्रेमभराने उराशी कवटाळले. वडिलांच्या श्राद्धाला त्यांनी हरिजनांना स्वतःच्या पंक्तीला बसवून जेवू घातले आणि त्यांच्या आग्रहाखातर नाथ त्यांच्याकडे जाऊन जेवलेही. माणसाने माणसामाणसांत भेद करणे योग्य नाही, हे त्यांनी स्वतःच्या आचरणाने दाखवले. पण नाथ गेले आणि ही मंडळी पुन्हा अनाथ

झाली !

आजही हजारो आदिवासींना वेठबिगारीचे जीवन जगावे लागते. त्यांना गुराहूनही अधिक राबवले जाते. त्यांच्या श्रमांची किंमत केली जात नाही. त्यांच्या स्त्रियांच्या शीलाची बूज राखली जात नाही. त्यांचा असा छळवाद करणारे हे सारे लोक स्वतःला माणूस म्हणवून घेण्यास योग्य आहेत काय ? माणसे माणसांना गुलामांप्रमाणे वागवतात, तेव्हा त्यांच्यातील मानव हा मानव राहिलेला नसतो. तो दानव झालेला असतो. अशा तऱ्हेची आसुरी वागणूक अनेक देशांतून आजही आढळते. कुठे काळा-गोरा, कुठे स्पृश्य-अस्पृश्य अशा वेगवेगळ्या रूपांत ती आढळते. प्रत्येकाकडून समतेचे पालन झाले, तर अशी विषमता अस्तित्वात राहणार नाही.

आजच्या या विज्ञानयुगात हळूहळू का होईना, समतेची पुनश्च चाहूल लागत आहे, ही एक समाधनाची बाब आहे. रक्तदान, नेत्रदान, मूत्रपिंडदान इत्यादी दान प्रकारांतून ही चाहूल व्यक्त होते. कुष्ठरोगी व अपंग यांच्याविषयी आज सर्वत्र दिसणारी ममत्वाची भावना हीदेखील मानवताधर्माची द्योतक म्हणावी लागेल.

या विज्ञानयुगात माणसाने आपल्या बुद्धीच्या जोरावर अंतराळातील अडसरही दूर केले. मग हे मनातील भ्रामक कल्पनेचे अडसर तोडायला त्याला कितीसा अवसर लागेल ? पण त्यासाठी प्रत्येकाने मनोमन निश्चय मात्र केला पाहिजे. जेव्हा असे घडेल तेव्हा सर्व अपप्रवृत्तीचे निर्मूलन होईल आणि 'हे विश्वची माझे घर' या भावनेने तो चराचरसृष्टीशी जवळीक साधेल आणि मग सर्वत्र समतेची उज्ज्वल पताका डौलाने फडकताना दिसेल.

## *दानात दान*

भारतीय संस्कृतीत दानाची थोरवी सांगणाऱ्या अनेक कथा विख्यात आहेत. त्यांपैकी एक गोष्ट सोनेरी मुंगसाची. पांडवांच्या राजसूय यज्ञात त्याने दर्शन दिले, तेव्हा त्याचे अर्धे अंग सोन्याचे होते. ज्या गरीब कुटुंबात त्या मुंगसाचे अर्धे अंग सोन्याचे झाले होते. तेथील दान श्रेष्ठ होते हेच सांगणारी ही दानाची कथा. 'तुझ्या

घासातील अर्धा घास दुसऱ्याला दे' ही भारतीय संस्कृतीची शिकवण.

या दानाची कसोटी तरी केवढी मोठी! 'दानपरीक्षा च दुर्भिक्षे'– दानशूरपणाची खरी परीक्षा केव्हा तर दुष्काळाच्या वेळी. स्वतःजवळ सुकाळ असताना दान करण्यात विशेष काय? पण आपल्याजवळील सर्वस्वाचे दान करणे, हीच दातृत्वाची खरी कसोटी. दान कसे करावे, हे भारतीय संस्कृती आपल्याला वैशिष्ट्यपूर्ण तऱ्हेने शिकवते. 'इदं न मम'– जे द्यावयाचे त्यात आसक्ती नसावी, त्यात आपले मन गुंतलेले नसावे; परंतु त्यात आपल्या हृदयाचा ओलावा असावा. म्हणून कोणालाही दक्षिणा देताना ती ओली करण्याची पद्धत रूढ झाली आहे.

या दानाचे प्रकार तरी किती? अन्नदान हे तर महादान. भारतीय संस्कृतीत प्रत्येक आनंदाच्या, दुःखाच्या क्षणाशी दानाची सांगड घातली आहे. त्याबरोबरच धनदान, सुवर्णदान, वस्त्रदान या दानांच्या अनेकानेक परी भारतीयांच्या रक्तामांसांत भिनलेल्या आहेत. अश्वमेध यज्ञ करून जिंकलेली सर्व संपत्ती दान करणारा सम्राट हर्षवर्धन भारतीय संस्कृतीचा एक मानदंड होय. स्वतःची तुला करून तितक्याच भाराचे सुवर्ण, रूपे, मोहरा दान करणारे राजे-महाराजे, धनिक भारताच्या इतिहासात जागोजागी पाहावयास मिळतात.

आजच्या या विज्ञानयुगात देखील या दानपरंपरेत खंड पडलेला नाही. उलट तिच्या कक्षा अधिकाधिक रुंदावल्या आहेत. आचार्य विनोबा भावे सांगतात, 'दान! हिंदू मनाला सहज सुचणारी कल्पना, हिंदू मनाला चटकन समजणारी भावना आणि हिंदू मनाला लगेच पटणारी सूचना आहे. प्राचीन काळापासून भारतीय मनाने आपल्या भोवताली काय पाहिले? रानावनात राहणाऱ्या ऋषीमुनींना त्यांच्या परिसरातील निसर्गाने काय शिकवले? तर सूर्य प्रकाशदान करतो, मेघ आत्मदान करतात, सरिता जीवनदान करते. माणसा, तुझ्याजवळ जे आहे ते तू इतरांना दे. तुझ्याजवळ जमीन आहे, तर भू-हीनाला भूदान कर. जमीन नाही, तर श्रमदान कर. रक्तदान कर. रक्तदान हे तर श्रेष्ठ दान. त्यामुळे कित्येक रोग्यांचे प्राण वाचू शकतात. नेत्रदानाची स्फूर्ती आम्ही दधिचींच्या अस्थिदानातून घेतली. नेत्रदान केले तर कित्येक दृष्टिहीनांचे भाग्य उजळून येईल. मृत्यूपूर्वी आपले अमोल मूत्रपिंड दान करा. म्हणून आजच आपल्या मृत्यूनंतर आपले नेत्र दान करण्याचा संकल्प करा."

खरोखर दान केल्याने आपल्याला जे सुख मिळते त्याची गोडी काही अपूर्व असते.

## *एकविसाव्या शतकातील शाळा*

सध्याचे युग हे विज्ञानयुग आहे. . . सुखसंपन्न तसेच महाभयंकर अशा एकविसाव्या शतकाकडे घेऊन जाणारे. विविध शास्त्रीय शोधांनी एकविसाव्या शतकाची चाहूल लागते. बहुविध अशा तांत्रिक उपकरणांची निर्मिती होत आहे. त्यामुळे मानवाचे जीवन अधिक प्रगत आणि सुलभ होत आहे. निरनिराळ्या प्रकारचे कॅलक्युलेटर्स, कॉम्प्युटर्स मानवाच्या सेवेस हजर आहेत. या आधुनिक जगांच्या पार्श्वभूमीवर एकविसाव्या शतकातील शाळा कशी असेल, याची कल्पना करणेच कठीण आहे. एकदा मी असाच या आगामी शतकातील शाळेसंबंधी विचार करीत समुद्रकाठी बसलो होतो. समुद्रामध्ये लाटांच्या भिंती उसळत होत्या. माझ्या मनामध्ये विचारांचे तरंग उमटू लागले. मी स्वतः या शाळेमध्ये गेल्याचा भास मला झाला.

मी या शाळेमध्ये गेलो, तर मला जिकडे-तिकडे 'रोबो'च दिसले. शिपायांची सर्व कामे ते करीत होते. शाळेची घंटा म्हणजे एक इलेक्ट्रॉनिक्सची बेल होती. शाळेची वेळ झाली तशी मला हवेत छोटी छोटी विमाने दिसू लागली. या विमानांमधून शाळेतील विद्यार्थी येत होते. वर्गाचे दार स्वयंचलित होते. एखादा विद्यार्थी दारापुढे उभा राहिला की, ते दार आपोआप उघडत होते. प्रत्येक विद्यार्थ्याच्या बाकावर एक एक कॉम्प्युटर होता. मुलांना शिकवायलासुद्धा एक कॉम्प्युटर होता. या शाळेमध्ये पाढे शिकवण्याऐवजी कॉम्प्युटर 'ऑपरेट' कसा करायचा याचे प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जात होते. ज्या विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर येत नव्हता, त्यांची सर्वांत खालची तुकडी होती. त्यांना बुद्दु समजत होते. इंग्रजी, हिंदी यांसारख्या भाषांऐवजी कॉम्प्युटरच्या पास्कल, कोबॉल यांसारख्या भाषा तेथे शिकवत होते. कार्यानुभवाऐवजी, समाजसेवेऐवजी तेथे इलेक्ट्रॉनिक्स हा विषय सक्तीचा होता. मुलांना सुट्टीमध्ये कॉम्प्युटरबरोबर

बुद्धिबळ खेळण्याची व्यवस्था केली होती. मुलांच्या निरनिराळ्या परीक्षा कॉम्प्युटरच घेत होते. त्यामुळे निकाल लगेच जाहीर होत असे.

अशी सर्व सुखसोयींनी संपन्न आणि अत्याधुनिक शाळा पाहून मी खरोखरच थक्क झालो. परंतु शस्त्रवाद वाढला की, वीरवृत्तीची पायमल्ली होते हे मानवाने लक्षात ठेवावे. कॉम्प्युटरच्या युगात वावरणारा मानव अधिकाधिक ऐदी आणि आळशी बनत आहे. त्याच्या बुद्धीला गंज चढला आहे. साध्या बेरजा आणि वजाबाक्या करताना त्याला कॅलक्युलेटर लागतो. एकविसाव्या शतकातील शाळा ही शाळा असेल. ज्ञानमंदिर नसेल. शाळेंमध्ये जे संस्कार केले जातात, ते संस्कार या शाळेमध्ये केले जाणार नाहीत. त्यामुळे या शाळेतील विद्यार्थी सुशिक्षित असतील, पण सुसंस्कृत नसतील. विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील नाते संपुष्टात येईल. तसेच प्रत्येक गोष्टीला अंत असतो. कॉम्प्युटरचा तसेच इतर साधनांचा उपयोग हा कधी ना कधी तरी कमी होणार आहे. तेव्हा मानवाला पुन्हा आपल्या जुन्या गोष्टींची गरज भासेल. त्यामुळे 'जुनं ते सोनं' हे लक्षात घेऊन मानवाने जुन्या गोष्टींचा त्याग न करता प्रगती केली, तर खरोखरच मानवाला अढळ स्थान प्राप्त होईल.

## *तुकयाची अभंगवाणी*

ज्ञानदेवांनी ज्या भागवतधर्माचा पाया रचला, त्याचा कळस म्हणजे तुकोबा. तुकाराम हा एक सामान्य प्रापंचिक माणूस होता. परंतु त्यांनी लिहिलेल्या अभंगवाणीमुळे ते एक साक्षात्कारी संत बनले. त्यांचे वास्तव्य देहू गावचे ! तेथेच त्यांनी आपले अभंग रचले. त्यांच्या अनेक अभंगांची एकत्रित 'तुकारामबावांची गाथा' प्रसिद्ध आहे.

तुकारामांनी स्वतः प्रपंच सांभाळून अध्यात्मावर त्याचप्रमाणे प्रापंचिक बाबींवर वैशिष्ट्यपूर्ण अभंग लिहिले. 'अभंगवाणी प्रसिद्ध तुकयाची ।' असा त्यांचा लौकिक आहे. त्यांनी त्यांचे अभंग सामान्य बोलीभाषेत लिहिल्यामुळे ते अभंग सर्वांच्याच हृदयाचा ठाव घेतात. त्यांच्या अभंगांतून उत्कट भक्तीचा भाव,

भावना, आर्तता, सामाजिक अनाचाराचा विरोध व्यक्त होतो. ह्या विठ्ठलभक्ताने त्यांच्या अभंगांतून लोकांना शिकवण दिली, समाजातील दोष दाखवले आणि अभंगाच्या माध्यमातून भागवतधर्माचा प्रसार केला. हेच त्यांच्या अभंगवाणीचे सामर्थ्य होय.

त्यांच्या अभंगांना कोणता असा एकच विषय नाही, तर त्यांचे अभंग सर्व विषयांना स्पर्श करतात. ज्याप्रमाणे तुकोबा सज्जनांचे गुण वर्णतात, त्याचप्रमाणे ते दुर्जनांचे दुर्गुण समाजासमोर आणतात. दुर्जनांचे वर्णन करताना त्यांच्या मनात इतकी चीड निर्माण होते की, वेळप्रसंगी ते दुर्जनांबद्दल अपशब्दही लिहितात. कधी तुकाराम शब्दांची महती सांगतात तर कधी मनाचा मोठेपणा वर्णन करतात. 'आवा चालली पंढरपुरा' यासारख्या अभंगातून संसाराच्या मोहात गुरफटलेल्या स्त्रीची व्यक्तिरेखा विनोदी पद्धतीने रसिकांपुढे मांडतात. तुकारामांची अभंगवाणी प्रभावी व सामान्य जनांस रुचेल अशी आहे.

तुकारामांच्या अभंगवाणीमुळे अभंग हा नवा रचनाप्रकार मराठी वाङ्मयात आला व रूढ झाला. अभंगांमध्ये उत्कट व आचरणात आणावा, असा मथितार्थ दडला आहे. आजही तुकारामांचे अभंग भजनातून गायले व ऐकले जातात. आज जेव्हा सामाजिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे, तेव्हा 'तुकयाची अभंगवाणी' निश्चितच समाजाला योग्य मार्ग दाखवेल.

## *भिंतीवरी कालनिर्णय असावे*

'नवीन घर बांधण्याचा घेतला निर्णय, पंचांग बघण्यासाठी हाती घेतले कालनिर्णय.'

मित्रहो ! खरंच कालनिर्णय एक असामान्य कॅलेंडर. घरोघरी प्रत्येक घराच्या भिंतीवर कालनिर्णय हे असतेच ! नोव्हेंबर महिन्यात दिवाळी झाली की नवीन वर्षाचे कालनिर्णय घरोघरी जायला सुरुवात होते. या कालनिर्णयाचे प्रकाशक जयंत साळगांवकर हे आहेत. ह्या कालनिर्णयाचे प्रकाशन मुंबईत दादर येथे होते. कालनिर्णय हे तीन भाषांमध्ये प्रसिद्ध होत होते. गुजराथी, मराठी, हिंदी;

परंतु आता ते इंग्रजीमधूनही प्रसिद्ध होत आहे.

कालनिर्णयाच्या प्रत्येक महिन्याच्या पानावर त्या दिवसाचा उपवास किंवा असलेला सण हा लिहिलेला असतो. महान क्रांतिकारकांच्या जयंत्या व पुण्यतिथ्या लिहिलेल्या असतात. संकष्टीच्या दिवशीचा चंद्रोदय सुद्धा लिहिलेला असतो. तसेच प्रत्येक पानावर एक अभंगही छापलेला असतो. प्रत्येक पानावर त्या महिन्याचा मागचा महिना, पुढचा महिना छोट्या जागेत छापलेला असतो. तसेच महिन्याच्या पानाची मागची बाजू उल्लेखनीय आहे. त्या पानावर त्या महिन्याचे प्रत्येक राशीचे भविष्य छापलेले असते. त्या महिन्याचे पंचांग छापून त्यात प्रत्येक दिवसाचे पंचांग असते. तसेच मोठमोठ्या लेखकांचे निरनिराळ्या विषयांवरचे लेख छापलेले असतात. तसेच आरोग्याबद्दल घ्यावयाची काळजी व रोगांवरील निदान हे सुद्धा असते. बस-स्थानकावरून तसेच रेल्वे-स्थानकावरून येणाऱ्या व जाणाऱ्या गाड्यांचे वेळापत्रकसुद्धा छापलेले असते.

'कालनिर्णय' हे भारतातील सर्वाधिक खपाचे, मराठी तसेच इतर तीन भाषांतील प्रकाशन आहे. प्रत्येक भाषेत सुमारे पाच लाख कालनिर्णये विकली जातात. १९९२ च्या 'लिम्का बुक ऑफ रेकॉर्डस्' ह्या 'गिनिज बुक रेकॉर्डस्' च्या धर्तीवर प्रसिद्ध होणाऱ्या पुस्तकात 'कालनिर्णय' हे सर्वाधिक खपाचे असल्याचे नमूद केले आहे.

असे हे भारतातील सर्वाधिक खपाचे प्रकाशन, 'कालनिर्णय'. घरातल्या, कचेरीतल्या, रेल्वे-स्थानकावरील, दुकानाच्या, बँकेच्या, ठिकठिकाणच्या भिंतींवर मोठ्या डौलाने, दिमाखाने विराजमान व्हायला हवंय ! येणाऱ्या-जाणाऱ्याच्या मदतीसाठी सदैव सिद्ध असलेलं !

## *माझी मायबोली*

प्रत्येक माणसाच्या जीवनात माता, मायभूमी आणि मायबोलीला अनन्यसाधारण असे महत्त्व आहे. आपण आपले पहिले बोल बोलतो ते आपल्या मायबोलीतूनच.

"चामुंडाये करवियले । गंगराये सुत्ताले करवियले ॥"

हा माझ्या मातृभाषेतील अर्थात माझ्या मायबोली मराठीतील पहिला शिलालेख. कर्नाटकातील श्रवणबेळगोळ येथील इंद्रगिरी पर्वतावर असलेल्या बाहुबलीच्या प्रचंड मूर्तीच्या पायथ्याशी ही ओळ सापडते. अशा प्रकारे माझ्या मायबोलीचा जन्म १००० वर्षांपूर्वीच झाला. ह्या मराठीची थोरवी अनेक संत-महंतांनी गायली आहे. इतकेच नव्हे, तर खुद्द ज्यांची भाषा इंग्रजी आहे ते फादर स्टिफन्सन म्हणतात,

"जैसी पुष्पांमाजी पुष्प मोगरी
कि परिमलांमाजी कस्तुरी ।
तैसी भाषांमाजी साजिरी मराठिया ॥"

खरोखर परिभाषिकांनी सुद्धा स्तुती करावी, इतकी माझी मायबोली थोर आहे. हिला लाभलेल्या पहिल्याच पुत्राला, ज्ञानेश्वराला, हिचा किती अभिमान. त्याने हिला ज्ञानेश्वरीसारखे तेजस्वी रत्न अर्पण करून अमृताचे वैभव प्राप्त करून दिले. ते म्हणतात,

"माझा मऱ्हाटाचि बोलू कवतुके, अमृतातेंहि पैजा जिंके."

आणि मग कालानुसार संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम ह्यांनी हिच्या साहित्यसंपत्तीत भरच टाकली.

ह्या माझ्या मायबोलीला प्रथम फारच कष्ट सोसावे लागले. संस्कृत भाषेमुळे सर्व ज्ञानाला मर्यादितपण आले होते. त्या काळातील तथाकथित ब्राह्मणांकडून ती एक क्षुद्र भाषा समजली जात होती. परंतु तरीही एकनाथांनी त्यांना खडसावून विचारले,

"संस्कृत भाषा देवे केली । प्राकृत काय चोरे केली ?"

अनेक संतांनी जनजागृती करण्यासाठी माझ्या या मायबोलीचा उपयोग केला. माझी मायबोली ही समजण्यास अत्यंत सोपी आहे. ह्या भाषेतून काव्यरचना करताना कधीही कोणाला शब्दांची उणीव भासली नाही. अनेक प्रकारचे अलंकार, वृत्ते, छंद, म्हणी यांच्यामुळे ह्या भाषेला अधिक खुलवता येते. ह्या माझ्या मायबोलीचा इतिहास कधीही न संपणारा आहे.

इतका थोर वारसा लाभला असूनही अजून हिचे महत्त्व माझ्या बांधवांना पटलेले नाही. एखादा माणूस इंग्रजीत बोलला, तर आपण त्याला मराठी बोलणाऱ्या माणसापेक्षा अधिक विद्वान ठरवतो. इतकेच नव्हे तर आजही अनेक

पालक आपल्या मुलाला इंग्रजी माध्यमातील शाळेत घालण्यातच जास्त शहाणपण समजतात. आपल्या थोर मायबोलीकडे दुर्लक्ष करणारे असे करंटे पाहिले की, तळपायाची आग मस्तकात जाते.

त्यांना खडसवून सांगावेसे वाटते की, हे जग इकडचे तिकडे झाले तरी,
"आम्ही सुखसंवाद करू ते मराठीतच,
दुःखविलाप करू तेही मराठीतच आणि,
प्रतिभाविलास करू तेही मराठीतच."

## *माझे ध्येय*

'युद्धस्य कथा रम्या' युद्धकथा कितीही वाचल्या, तरी माझी काही तृप्ती होत नाही. नुकत्याच संपलेल्या दिवाळीच्या सुट्टीत असेच मी एक दुसऱ्या महायुद्धावरील पुस्तक वाचून काढले. युद्धातील जपानमधील हिरोशिमा व नागासाकीवर टाकलेले हायड्रोजन बॉंब व झालेला हाहाकार वाचून मन थक्क झाले. त्या बॉंब वर्षावामुळे खरं तर नुसत्या सहस्रावधी लोकांचे प्राण गेले, एवढेच नाही, तर संपूर्ण जपान देशच अर्धमेला झाला होता. देशांची व लोकांची झालेली दुर्दशा वाचताना सुद्धा अंगावर काटे उभे राहिले. लेखकाने शेवटी आवर्जून उल्लेख केला तो जपानमधील लोकांचा व त्यांच्या ध्येयपूर्तीचा. विनाशाच्या खाईला लागलेला हा देश खरोखरच ३-४ दशकांत जगातील एक सर्वांत प्रगत देश म्हणून गणला जाऊ लागला. तो ध्येयवेड्या लोकांच्या बळावर !

'ध्येयवेड' या शब्दाने माझ्या मनात घर केले. खरेच, डोळ्यांसमोर ध्येय असेल, तर काय होऊ शकत नाही ? छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे ध्येय ठेवले व त्या ध्येयासाठी जीवनाचा एकेक क्षण वेचला व त्याच ध्येयासाठी प्राण वेचले. स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वी असेच लो. टिळक, म. गांधी, स्वातंत्र्यवीर सावरकर, भगतसिंग अशा अनेकांनी मातृभूमीची गुलामगिरीतून सुटका करण्याचे ध्येय ठेवले होते. त्यामुळेच 'फासाचा दोर आम्ही फुलांच्या हाराप्रमाणे आनंदाने

गळ्यात अडकवू' असे टिळक म्हणाले तर, 'तुजवीण जनन ते मरण' असे सावरकरांना वाटले.

खाणे, पिणे, झोपणे व दिवस घालवणे यासाठी मानवी जन्म नाही. काहीतरी ध्येय डोळ्यांसमोर ठेवून त्यासाठी धडपडणे, प्रसंगी प्राण पणाला लागले तरी चालेल. ठरवलेले ध्येय गाठणे हेच खरे जीवन, असे समजून वेडी झालेली माणसे ह्या जगामध्ये अनेक आहेत. प्रत्येकाची क्षेत्रे भिन्न होती. स्त्रियांना शिक्षण देण्याचे ध्येय अण्णा कर्व्यांनी ठेवले. अपंगांना स्वावलंबी बनवणे हे ध्येय बाबा आमट्यांनी ठेवले, तर अनाथ दीनदुबळ्यांच्या जीवनात प्रकाश आणण्यासाठी मदर तेरेसा आजही थकलेल्या शरीराने भ्रमण करतात. अनेक विस्मयजनक शोधामागे ध्येयवेडे शास्त्रज्ञच होते ना. मग तो न्यूटन असो एडिसन असो अथवा भारतातील डॉ. जयंत नारळीकर असोत.

ऑलिंपिकमध्ये सुवर्णपदके पटकवणारा कार्ल लुईस वा जगातील अत्युच्च शिखर सर करणारा तेनसिंग असो. हे सर्वजण झगडले ते ठरवलेले ध्येय मिळवण्यासाठी. आपल्या देशातील सध्याच्या स्थितीचे मूळ कारण शैक्षणिक मागासलेपणा असे मला वाटते. अजूनही ४०% जनता निरक्षर आहे व त्यामुळेच आपली प्रगती खुंटली आहे.

पदवी घेतल्यानंतर लोकांना साक्षर करण्यासाठी झटण्याचे ध्येय मी ठेवले आहे. माझ्या डोळ्यांसमोर आदर्श आहेत ते जपानी लोक व त्यांचा देश. माझ्याही मातृभूमीला वैभवाचे दिवस यावेत, असे माझे स्वप्न आहे व ते स्वप्न पुरे करणे हे माझे ध्येय आहे.

## *निरोपाचा क्षण*

आजचे युग हे धावपळीचे आहे. या जगात आपल्याला कोणा ना कोणाकडून निरोप घ्यायचाच असतो. निरोप घेणे किंवा देणे हा काही बाहुला-बाहुलीचा खेळ नव्हे. ज्या निरोपाने आपल्या आठवणी, आनंदाचे क्षण उचंबळून येतात आणि डोळ्यांतून अमृतासारखे थेंब पडतात तो निरोप.

निरोपाच्या क्षणांमध्येही विविध छटा आहेत. त्यांपैकी म्हणजेच भावनाप्रधान होणे, विमनस्क होणे आणि आनंदी होणे. मुलगी माहेर सोडून जातानाचा क्षण तर खूपच भावनाप्रधान असतो. माहेर सोडण्याची हुरहूर तर सासरी अनोळखी माणसांच्या सहवासात राह्यला जाण्यामुळे गोंधळलेल्या स्थितीत असते. निरोप घेताना तिचा कंठ दाटून आलेला असतो. तसेच भावा-बहिणींच्या मायेच्या कोषातून अलग होणार या कल्पनेने ती अतिशय दुःखी झालेली असते. हा सर्व क्षण अबोल असला तरी अंतःकरणाचे स्पंदन चालूच असते.

विद्याधर पुंडलिक तर म्हणतात की, आपला कोणताही क्षण अखेरचा असतो. परदेशगमनाच्या वेळेचा निरोप तर अक्षरशः मनाच्या अनेक कोपऱ्यांतून वेगवेगळ्या विचारांच्या आवर्तनाने स्पंदायमान होऊन भावनांच्या गराड्यात गुरफुटून गेलेला असतो. त्या व्यक्तीच्या आई-वडिलांची मनःस्थिती अशी होते की, मुलगा आपल्याला विसरणार तर नाही व दुःखाने त्यांचे अंतःकरण भरून येते. पत्नी असेल तर तिला दुःख व्यक्त करण्यास शब्दच सुचत नाहीत. मुलाला आपल्या आई-वडिलांचा सहवास अंतरणार म्हणून दुःख होत असते. शालेय जीवनात तर शेवटचे वर्ष असताना आपल्या शाळेबद्दल आपले प्रेम अधिकच वाढते. आपल्याला आपले शिक्षक व आपल्या सहकारी मुलांचा निरोप घ्यावा, असे वाटत नाही.

आपल्या जिव्हाळ्याची व्यक्ती भेटल्यावर जसा आनंद होतो, तसा निरोपाच्या वेळी विरह होणार म्हणून दुःख होते. म्हणूनच म्हटले जाते की,

*येता विरह काळ*
*होते मन दुःखित*
*निरोप घेता घेता*
*उरतो प्रेमाचा सुवास.*

म्हणजे विरहातच खरे प्रेम कळते. निरोपामुळे आपला आनंदही शतगुणित होतो. हे सर्व विवेचन झाल्यावर मी माझ्या लेखाचा निरोप घेतो तो माझा आनंद शतगुणित करूनच !

## *मी केलेले वृक्षारोपण*

आम्ही गेल्या वर्षी लोणावळा व खंडाळा येथे सहलीला गेलो होतो. लोणावळ्याहून खंडाळ्याला पायीं जाता जाता खूप मजा आली. जाताना आम्ही गाणी गात होतो, खात होतो तरीपण ऊन खूपच होते. आम्हाला कोठेतरी सावलीत बसून जेवण घ्यायचे होते. त्याप्रमाणे आम्ही एका आम्रवृक्षाच्या छायेत बसलो, जेवण केले. आम्हाला फारच आनंद वाटला. ज्या झाडाने आम्हाला सावली दिली, त्याला धन्यवाद द्यावेसे वाटले.

मी मनात विचार केला, वृक्ष हे किती उपकारक आहेत !

*रविश्चन्द्रो घना वृक्षा नदी गावश्च सज्जनाः ।*
*एते परोपकाराय लोके देवेन निर्मिताः ॥*

असे सुभाषितात म्हटलेले आठवले. वृक्ष स्वतः उन्हात उभे राहतात व दुसऱ्याला सावली देतात. त्यांची पाने, फुले व फळे आपण वापरतो. वृक्षाचे खोड सुद्धा आपण ज्वलनासाठी वापरतो. आपल्या स्वार्थासाठी लोक जंगलतोड करतात. सुदैवाने आता सरकारने त्यावर निर्बंध घातले आहेत. काही वनस्पतींपासून औषधे तयार करतात. उदा. डिंक, आवळा इ. एवढे सर्व उपयोग वृक्षांचे असताना आपण त्यांचे संगोपन का करू नये ?

हा विचार माझ्या मनात आला आणि मी लगेच आमच्या घराभोवती मोकळी जागा होती ती साफ करून तेथे आंबा, नारळ व निंब अशा ३-४ झाडांची रोपे लावली. तसेच शोभेसाठी अशोकाची झाडे सुद्धा लावली. एक-दोन वर्षांत ती चांगलीच वाढू लागली आहेत. अर्थातच त्याला खतपाणी घालणे हे माझे काम. सुट्टीत मी त्यांच्याकडे आवर्जून लक्ष देतो.

हे वृक्ष माझे सोबती बनले आहेत. आता खूप मोठे झाल्यावर मी त्यांचे योग्य संगोपन करीनच. आम्रवृक्षाचे पल्लव मंगलप्रसंगी उपयोगी पडतात. नारळसुद्धा पूजा इ. धार्मिक कार्यात उपयुक्त आहे. मर्यादित प्रमाणातच आम्ही त्याचा वापर करू. निंब वृक्ष छायेसाठी आहेत. मी लावलेल्या वृक्षावर लवकरच पक्षी घरटे बांधतील. आताच तेथे सुलक्षणी भारद्वाज येतो. सर्व पक्ष्यांचे ते निवासस्थान आहे. थोड्याच दिवसांत आम्रवृक्ष अजून डेरेदार होईल आणि

जाणारे-येणारे लोक तेथे विश्रांती घेतील. कच्च्या कैऱ्या मुले खातील. त्यांना त्या तोडण्यात केवढा आनंद मिळेल. शुभकार्यात आंब्याच्या पानांचे तोरण लावले जाईल. ह्या सर्व गोष्टी माझा मित्रच जणू असलेला आम्रवृक्ष करू शकेल. म्हणून त्या झाडाचा मला सदैव गौरव वाटत राहील. खरोखर आयुष्यात एक वृक्ष लावणे व तो सांभाळणे ह्यात केवढा आनंद आहे.

तसेच नारळाच्या वृक्षाला फळे उशिरा येतील तर येऊ देत, पण तो सुद्धा माझ्या आवडीचा वृक्ष आहे. आमचे निंब वृक्ष वेगाने वाढत आहेत. त्याची सावली व उन्हाळ्यात येणारे वारे ह्या कारणासाठी मला निंब आवडतोच. अशोक वृक्ष आमच्या प्रवेशद्वारापाशी दोन्ही बाजूला येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करण्यास उभा आहे.

अलीकडे मी वृक्षांबद्दल खूपच विचार करू लागलो आहे. झाडाला एक नवीन फांदी उगवली की मला आनंद वाटतो. वृक्षांचे सुद्धा मानवाप्रमाणेच आहे. ते काही छोटे, तर काही उंच; काही मृदू तर  काही कठीणच काही गोड तर काही कडू. काही वृक्ष नदीकाठी उभे राहून आपले प्रतिबिंब पाण्यात पाहतात, तर काही वृक्ष नदीला आपली फुले अर्पून नदीची पूजाच करीत असतात. वृक्ष हे निसर्गतःच सुंदर असतात. कवी लोक त्यावर काव्य रचतात. आम्हाला 'बाभळी' कविता शिकताना बाभळीच्या न लावलेल्या झाडाची आठवण झाली.

जंगलात अनेक वृक्ष आपोआप येतात. ते सुद्धा उपयुक्त असतात, तर आपण लावलेली झाडे तर निश्चितच उपयोगी ठरतात.

आपण ज्या घरात राहतो ते सुद्धा बांधताना लाकडाचा उपयोग केलेला असतो. आपल्याला गोड गोड फलाहार देणारे वृक्ष, रामाला वनवासात वस्त्र पुरवणारे वृक्ष आणि घरे बांधणारे वृक्ष म्हणजेच अन्न, वस्त्र व निवारा देणारे आहेत. माझ्या मित्रांना सुद्धा मी वृक्षांचे महत्त्व सांगत असतो. त्यांनाही वृक्षारोपणासाठी प्रवृत्त करतो. सरकारनेही वनसंवर्धनाचे कार्य हाती घेतलेच आहे. वृक्ष कमी झाले तर जंगल अस्तित्वात राहणार नाही, म्हणजे सर्व सौंदर्यच नष्ट होईल. पर्जन्याची वृष्टी कमी होईल, म्हणून प्रत्येकानेच एक-एक वृक्ष लावावा, असे मला वाटते. मी लावलेले वृक्ष म्हणजे माझे साकार झालेले स्वप्नच आहे.

*'वृक्षाः सत्पुरुषाः खलु'* ।

## मनाचे श्लोक, एक संस्कार

'केल्याने होत आहे रे आधी केलेची पाहिजे.'

खरं म्हणजे निबंध लिहायला जमत नव्हते. पण रामदासांचा हा श्लोक वाचला आणि मला वाटले, आपल्याला निबंध लिहायला जमेल. आणि जमला की हो मला निबंध लिहायला.

रामदासांनी आपल्या मनाच्या श्लोकांत, दासबोधात सामान्य जनांना अतिशय उत्तम उपदेश व मार्गदर्शन केले आहे. पण त्यात मनाचे श्लोक अत्यंत सोप्या भाषेत व उत्तम संस्कार करणारे असे आहेत. आता हाच श्लोक पहा ना 'सदाचार हा थोर सांडू नये तो । जगी तोचि तो मानवी धन्य होतो ।' म्हणजे सदाचारासारखी श्रेष्ठ गोष्ट सोडून चालणार नाही. जो सदाचारी असेल तोच आयुष्यात यशस्वी होतो. आता हा दुसरा श्लोक बघा. 'मना श्रेष्ठ धारिष्ट जीवी धरावे' म्हणजे आवश्यक तेथे धाडस केलेच पाहिजे. भित्रे राहून चालणार नाही, पण धाडस केलेस तरी उद्धट होऊ नकोस, हे सांगण्यासाठी ते सांगतात, 'स्वये सर्वदा नम्र वाचे वदावे । मना सर्व लोकांसी रे निववावे' एखाद्या दुःखी माणसाला धीर देताना रामदास स्वामी म्हणतात, अरे विचार कर 'जगी सर्वसुखी असा कोण आहे । विचारे मना तूचि शोधुनी पाहे ।'

तापट व मत्सरी माणसांना रामदास स्वामी म्हणतात, संतापाने फक्त दुःखच वाट्याला येते. 'नको रे मना क्रोध हा खेदकारी । नको रे मना मत्सरू दंभ मारू'

'जयानि संगे समाधान भंगे अहंता अकस्मात येऊनी लागे' मित्र कसा असावा, हे रामदासांनी ह्या श्लोकात सांगितले आहे. आपण जसे काम करू तसे फळ मिळते. अभ्यास केला नाही, तर पास कसे होणार आणि मग नापास झाल्यावर रडून काय उपयोग ? 'मना त्वाचि रे पूर्व संचित केले तया सारखे भोगण प्राप्त झाले' अविद्या गुणे मानवा उमजेना 'श्रमे चूकले हीत ते आकळेना ।' विद्या नसेल, ज्ञान नसेल तर आपलं खरं हित कशात आहे, हे कळत नाही. त्याला चांगले-वाईट काय तेही कळत नाही. म्हणून प्रत्येकाने विद्यावान म्हणजे ज्ञान मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

रामदासांचे '२०५ मनाचे श्लोक' म्हणजे मराठीतील गीता होय. सोप्या,

स्वरचित व ओजस्वी अशा भाषेत श्रीसमर्थांनी केलेला हा उपदेश म्हणजे ज्ञान, कर्म व भक्ती यांचा त्रिवेणी संगम आहे. मनाच्या श्लोकांचे पठण, मनन व चिंतन करून कोणीही त्याप्रमाणे आचरण करावे व या त्रिवेणीत स्नान करून पुनीत व्हावे व चिरंतन सुखाची, समाधानाची प्राप्ती करून घ्यावी.

समाजातील सर्व थरांतील लहान-थोर सर्वांना, प्रापंचिकांना, तसेच निःस्पृहांना सुद्धा 'मनाचे श्लोक' हे मनाचा शोक दूर करण्यास साहाय्य करतील, यात मुळीच संशय नाही.

*॥ जय जय रघुवीर समर्थ ॥*

## *"चिमणीपासुनी शिकून घेई !"*

जगात माणूस परिपूर्णतेचा आणि श्रेष्ठत्वाचा टेंभा मिरवतो. पण पशुपक्षीही असे काही कर्तृत्व करीत असतात की, ते पाहून माणूसही चकित होतो आणि त्याचा अहंकार गळून पडतो. अशा प्राण्यांपैकी, पक्ष्यांपैकी इवलीशी चिमणी ही एक आहे.

चिमणी आपले घरटे असे सुरेख बांधते की, ते पाहून माणसाचे गर्वहरण होते. ही गृहबांधणी तिला कुणी बरे शिकवली ? तिचे कोटर किती सुबक, सर्व सोयींनी युक्त आणि सुरक्षित असते. ते तृणकाड्या जमवून केलेले असते. ते घरटे बांधण्यासाठी ती स्वतःच तृणांकुर आणते व स्वतःच ते विणते. घरट्याला हवा तसा आकार देते आणि तिची अंडी व पिल्ले सुरक्षित राहतील अशी व्यवस्था त्यात केलेली असते. ती ते घरटे अशा रीतीने झाडाला टांगते की ते लोंबकळणारे घरटे कधीही सुटून पडत नाही. वाऱ्यावादळात टिकाव धरून राहते. पावसाच्या पाण्याचा आणि उन्हाच्या माऱ्याच्या शिरकाव त्यात होत नाही. असे हे विलक्षण घरटेच चिमणीच्या उपजत ज्ञानाची ग्वाही देते.

चिमणी हा एक कष्टाळू पक्षी. आकाराने इवलाला, कोणाला त्रास न देणारा, कष्ट करून खाणारा ! धान्याचा एकेक कण चिमणी चोचीतून आणते व आपल्या पिल्लांना भरवते. आपणही स्वतःचा उदरनिर्वाह करते. ती परावलंबी नाही,

स्वावलंबी आहे. वडिलार्जित इस्टेटीवर ती जगत नाही, तर स्वकष्टाने जगते. कष्टार्जितावरच जगण्याचे व्रत तिने घेतले आहे. माणसांपेक्षा या बाबतीत चिमणी श्रेष्ठ आहे. पण ती कधी त्याचा टेंभा मिरवीत नाही. अहंकार हा माणसाचा अवगुण आहे. त्यापासून ती पूर्णतः अलिप्त आहे.

आपली अंडी व पिल्ले यांची ती सतत काळजी घेत असते. तिचे वात्सल्य आदर्श आहे. या वात्सल्याच्या जोरावरच ती, तिची अंडी तसेच पिल्ले खाणाऱ्या दुष्ट, बलदंड सर्पावर तुटून पडते. प्राणपणाने झुंज देऊन आपल्या अंड्यांचे आणि पिल्लांचे रक्षण करते. चिमणी अबला असली तरी अपत्यप्रेमाने ती सबला होते आणि बलदंडांचेही पारिपत्य करते. माणसाने तिच्यापासून हा धडा घ्यावा, अशी करणी तिने केली आहे.

अशा प्रकारे या चिमणीपासून अनेक गोष्टी शिकण्यासारख्या आपणांस आढळून येतात. ती ठिकठिकाणी हिंडून आपल्या पिल्लांसाठी अन्न गोळा करते. या चिमणीच्या बाबतीत, 'मूर्ती लहान पण कीर्ती महान !' ही उक्तीच खरी ठरते.

कवितेतच सांगायचे तर,

*चिमणीपासुनि शिकुनि घेई ।*
*बाळा तू आनंद ॥*
*रडणे, कढणे सोडुनि देई ।*
*भलता सलता छंद ॥*
*मातीमध्ये जिकडे तिकडे ।*
*पडले सुंदर दाणे ॥*
*कसे वेचुनि घ्यावे त्याते ।*
*हीच खरोखर जाणे ॥*

## उंचीचे फायदे-तोटे

सकाळची वेळ होती. मी शांतपणे खोलीत अभ्यास करत होतो. इतक्यात आईची स्वयंपाकघरातून हाक ऐकू आली. मला वाटले, नेहमीचेच काम असणार. आणि ते खरेच होते. स्वयंपाकघरात जाऊन आईला फळीवरचा डबा काढून

दिला. मला वाटले, मी उगाच इतका उंच झालो. आईची सगळी कामे मलाच करावी लागतात. पण मग विचार केला माझ्या उंचीमुळे आईलाच मदत होते.

माझ्या उंचीचे मला काही फायदेसुद्धा होतात. रस्त्यावर जादूचे प्रयोग, डोंबाऱ्याचा खेळ चाललेला असतो. लोक गर्दी करून, टाचा उंच करून पाहायचा प्रयत्न करतात. मला मात्र काहीही कष्ट न घेता आरामात पाहायला मिळते. आम्ही मित्र मित्र कधी पोहायला गेलो तर बाकीचे माझे मित्र गटांगळ्या खातात. मी मात्र आरामात पाय टेकवून उभा राहतो. मी जेव्हा बास्केटबॉल खेळतो तेव्हा मी आपल्या संघात यावे, म्हणून दोन संघांचे कर्णधार आपापसात वाद घालत बसतात.

मला उंचीच्या फायद्यांप्रमाणेच तोटेसुद्धा सहन करावे लागतात. एक तोटा तर अगदी पहिलीपासून सहन करतोय, तो म्हणजे जागेचा. पहिलीपासून अगदी आत्तापर्यंत मी शेवटच्या बाकावर बसतोय. हा एक महत्त्वाचा तोटा झाला. आणखी महत्त्वाचा तोटा होतो तो बसमध्ये. पाचवीत असलो तरी आठवीत असून खोटं बोलतो, अशा संयशित नजरेने कंडक्टर माझ्याकडे पाहतो. हाफतिकीट देताना कुरकुर करतो. मी कधी सिनेमाला गेलो तरी मागून माणसे ओरडतात. एक म्हणतो इकडे डोकं कर, तर दुसरा म्हणतो तिकडे डोकं कर. मधल्यामधे माझं डोकं चक्रावून जातं.

म्हणूनच माझं तरी असं स्पष्ट मत आहे की, एखाद्या माणसानं अतिशय उंच होऊ नये व अतिशय बुटकंही राहू नये. कारण उंचीचे जसे फायदे तसेच तोटेही भरपूर आहेत.

## माझे जीवनगाणे

अनादि अनंत काळापासून चराचर सृष्टीमध्ये निसर्गसंगीत भरून राहिले आहे. झाडे, पाने, पशुपक्षी, झरा, नद्या, वारा, सागर, झरझरणाऱ्या श्रावणधारा, शीतल, सौम्य चंद्रमा, पौर्णिमेचे शीतल चांदणे, लाल सोनेरी रंगाची उधळण करणारा सूर्य. यातूनही परमेश्वराचा अनाहत नाद ऐकू येतो आणि थकलेले मन व

शरीर शांत व प्रफुल्लित बनते.

निसर्गचक्राप्रमाणे कंटाळवाण्या पावसाळ्यानंतरच अन्नधान्याची समृद्धी येते. रखरखीत उन्हाळ्यानंतरच पावसाच्या अमृतधारा बरसतात. याच गोष्टी मानवालाही खूप काही शिकवून जातात की, ' खूप दुःख सोसल्याशिवाय सुखाचा अमोल ठेवा मिळत नाही.'

रोजच्या या स्पर्धेच्या व धकाधकीच्या जीवनात ओढाताण होताना मन अगदी शिणून जाते. सकाळी उठल्यापासूनच आयुष्यात ह्या सुखदुःखाच्या-मानापमानाच्या क्षणांनी आपण उदास बनतो. जीवन जगण्याची उमेदही नष्ट होते पण त्याच वेळी मनाशी ठरविले की, 'हे दुःखाचे क्षण आत्ता संपतील आणि सुखाचे दिवस येतील' मग मनाला उभारी येते आणि आनंदाने गुणगुणावेसे वाटते 'झाले गेले विसरुनी जावे, पुढे पुढे चालावे'. कारण दुःखाचा डोंगर चढल्याशिवाय सुखाची हिरवळ सापडत नाही. काळ्या कोळशाच्या खाणीतच हिरे सापडतात.

गाण्यामुळे, संगीतामुळे श्रम, कष्ट यांचा भार हलका होतो आणि मनःशांती मिळते. छोट्या छोट्याशा गोष्टींतही आपण आनंद शोधला पाहिजे. एखाद्या हाडाच्या कवीला किंवा चित्रकाराला पोटापाण्यासाठी पोस्टातली किंवा रेल्वेतील नोकरी करावी लागते. खरं तर तो बेचैन, दुःखी असतो पण काही काळानंतर नावडत्या कामाचा ताण घालविण्यासाठी तो जास्तच जोमाने छान छान कविता, चित्रे काढून मन रमवितो व त्याचे जीवनही आनंदगाणेच बनते.

क्रांतिसिंह भगतसिंह, स्वातंत्र्यवीर सावरकर, लो. टिळक, म. गांधी, स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांचे अवघे जीवन जणू देशस्वातंत्र्याचे ध्येयगाणेच बनले होते. त्यामुळे मरणाला ते हसत हसत सामोरे गेले. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर यांना परमेश्वरप्राप्तीसाठी लोकनिंदा, छळ सहन करावा लागला. तेव्हा त्यांचे जीवनगाणे आजही अजरामर आहे. (आपण त्याला अभंग म्हणतो.)

आम्हा विद्यार्थ्यांचे सध्याचे ध्येय भरपूर अभ्यास करून उच्चशिक्षण घेऊन आई-वडिलांचे पांग फेडणे होय. त्यासाठी भरपूर अभ्यासच करणे. आम्हा मुलांना सुट्टीच्या दिवशी खेळायलाही मिळत नाही. कारण त्याही दिवशी जास्त अभ्यास, गृहपाठ असतोच. घरापासून शाळा लांब असल्याने वेळेवर शाळेत

पोचता येत नाही. बस मिळवण्यासाठी धडपडावे लागते. वेळेवर शाळेत पोचले तर आनंदच, नाहीतर अनुपस्थितीची भीती ! मिळून काय, या छोट्याशा गोष्टीतही सुखदुःख, आनंद, निराशा आहे. आत्ता मी बाबांएवढा मोठा होऊन यशस्वी होईन, हेच माझे जीवनगाणे !

आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे !

---

## *माझा आवडता महिना– श्रावण*

मानवी मनाला चैतन्याचा साज चढविणारा, चराचरातून तारुण्याचा प्रत्यय आणून देणारा श्रावण हा जणू मूर्तिमंत चैतन्यच आहे. विधात्याने मुक्तहस्ताने चराचरात सौंदर्याची बरसात केलेली असते. सर्वत्र हिरव्या रंगाचे प्रदर्शन असते. हिरव्या तृणांकुरांनी सृष्टीचे सर्वांग झाकून गेलेले असते. हरिततृणांचे मखमलीचे हिरवेगार गालिचेच जणू सर्वत्र अंथरलेले असतात. वृक्षवेलींवरचे पुष्पवैभव अजूनही शिल्लक असते. सुंदरतेचा हा जलसा पाहून मन आनंदाने बेहोष होते.

आकाशात ढगांची गर्दी उसळलेली असते. त्याची वाऱ्यावरची वरात पाहून मोठी मजा वाटते. जणू पाठशिवणीचा खेळच मांडलेला आहे. मध्येच थोडे ऊन पडते तर दुसऱ्या क्षणी पावसाची सर येते. मग 'ऊन पावसाची झुंज, म्हातारीची मुंज' म्हणून मुले आनंदाने उड्या मारतात. इंद्रधनुष्याचे लोभसवाणे दर्शन घडते. ते पाहताच आंग्ल कवी वर्डस्वर्थप्रमाणे,

I leapt up with joy, when I behold rainbow in the sky. असा अनुभव येतो. परमेश्वरी मायेची ही सप्तरंगी कमान मानवी जीवनात चैतन्याची उधळण करीत असते. अशा वेळी बालकवींची कविता सहजपणे ओठांवर अवतीर्ण होते,

*'श्रावणमासी हर्ष मानसी हिरवळ दाटे चोहिकडे,*
*क्षणात येते सरसर शिरवे क्षणात फिरुनी ऊन पडे ।*
*वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे*
*मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणी भासे ॥'*

इवल्या इवल्या गवतावर चिमुकली रानफुले आता हसू लागली आहेत. आपले चिमुकले तुरे झुलवत ती वाऱ्याबरोबर खेळताहेत, या रानफुलांवर रंगीबेरंगी फुलपाखरे स्वच्छंदपणे बागडत आहेत. रानवेलींबरोबर फुगड्या खेळत, खडकांवर लोळण घेत, हिरवळीवर लोटांगण घेत झरा आपला मार्ग काढत झुळुझुळु वाहतो. पाचूची हिरवी राने फुलवितो. पाण्याशेजारच्या दगडांवर नाजूकसे शेवाळ वाढू लागते. कधी त्यावर एखाद्या पांथस्थाचा पाय घसरून तो पाण्यात पडतो, हे पाहताना जो आनंद मिळतो तो काही औरच !

पोरासोरांना गोडाचा घडा आणणारा, माहेरवाशिणींना हिरवा चुडा चढविणारा, सासुरवाशिणींना माहेरच्या साडीचे खूळ लावणारा, प्रौढांना व्रतस्थ बनविणारा, वृद्धांना देवाशी गुजगोष्टी करू देणारा हा मास लहान-थोरांपासून प्राण्यांनाही प्रिय असतो.

चैत्रातील चटके नाहीसे करून, वैशाखाची वखवख सोडून, ज्येष्ठाची ज्येष्ठता मोडून, आषाढाचा आडमुठेपणा घालवून, श्रावण समतेची समृद्धी करतो. सागराला अत्यानंदाची भरती आणून, नारळी पौर्णिमेला भूमातेच्या चरणी अवखळपणे लोळण घ्यावयास लावतो. असा श्रावण विष्णूंनाही आवडतो, म्हणूनच त्यांनी वद्य अष्टमीला देवकीच्या पोटी श्रीकृष्णरूपाने जन्म घेऊन कंसाचे निर्दालन केले. श्रावणमासानेच राखी पाठवून बंधुप्रेम वाढीस लावले आहे. मरगळलेल्या मानवी मनाला श्रावण एक संजीवनीच आहे ! म्हणूनच या श्रावणाचे मला खास अप्रूप आहे. श्रावणाचे स्वागत दिलखुलासपणे करत मन गुणगुणायला लागते,

*आला श्रावण श्रावण*
*संगे घेऊन जलधारा ॥*
*नाना रंगांची उधळण ।*
*हृदी आनंद माइना ॥१ ॥*

# श्रमाचे मोल

'Work is worship' श्रम हीच पूजा. पवित्र, मंगल श्रद्धा असणाऱ्या व मनीषा सफल करणाऱ्या गोष्टींची मानव, दानव आणि देव पूजा बांधतात. श्रमपूजा ही कामधेनू नि कल्पवृक्ष आहे. श्रमातून व्यक्ती, समाज, देश व जग यांचे जीवन उन्नत आणि विकसित होते. श्रमातून आर्थिक दृष्ट्या उद्ध्वस्त जीवन संपन्न, सुजलाम् सुफलाम् करता येते. ज्याची जीवनइच्छा संपली आहे, निराशेने मन ग्रासले आहे, जीवन जगण्याचा उबग आला आहे; त्याने श्रमाची कास धरल्यास अल्पकाळातच त्याची जीवनकळा बदलते.

श्रम हा आधुनिक काळाचा महामंत्र आहे. हा मंत्र जो म्हणतो त्यालाच काही उणे नसते. त्याच्या सर्व इच्छा सफल होतात. समृद्ध आणि सफल जीवनाचा तो स्वामी होतो. जीवनात निरामय आनंदाचे झरे वाहू लागतात. तेव्हा त्याला,

*'आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिकडे*
*वरती खाली मोद भरे, वायुसंगे मोद फिरे'* ।

याची प्रचीती येते. घामाने डबडबलेले शरीर हाच खरा अलंकार आहे. कामामधून आणि घामामधून सोन्याचे रान पिकवीत श्रम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या श्रमातून भूदेवता फुलते, फळते आणि लाखोंची भूक शमविते. शेतकऱ्याच्या ऊर फाटेपर्यंतच्या श्रमातून वांझ जमीन लागवडयोग्य बनून तिच्यातून मोत्याचे दाणे देणारे पीक येते.

'Sound mind is in a sound body.' सशक्त, निरोगी मन निरोगी शरीरातच वसते. निरोगी शरीर आणि मन विपन्नावस्थेतही माणसाला अतीव आनंद देतात. निरोगी मन आणि शरीर श्रमातून निर्माण होते. धनाढ्य माणसाच्या शरीरात अनेक रोगांचे वसतिस्थान असेल तर त्याच्यापुढे हात जोडून उभ्या असलेल्या सुखांचा त्याला उपभोग घेता येत नाही. लक्ष्मी प्रसन्न असूनही तो असमाधानी असतो. लक्ष्मीपुत्र जेव्हा श्रमदेवतेचा पुजारी असतो तेव्हाच त्याचे जीवन आनंदाची फुलबाग बनते. रोगी मनात अनेक शंका-कुशंका नांदत असतात. शंकाकुशंकाने व्यक्तिव्यक्तीमधील संबंधाला खग्रास ग्रहण लागते. शंकाकुशंकेने आनंदावर विरजण पडते, म्हणून श्रमाची पूजा बांधलीच पाहिजे.

'रिकामं मन हा सैतानाचा अड्डा आहे.' रिकामी माणसं बद्‌विचारांची शिकार होतात व विघातक कामे करतात. समाजजीवन शांत व अस्थिर बनवितात. रिकामे हात अनेक उचापती करतात. यातूनच तस्करी, गँगवार यांचा उदय होतो. तेव्हा माझे असे ठाम मत आहे की, प्रत्येकाने आपले हात नेहमी कामात गुंतवावयास हवेत.

शारीरिक कष्टांना आपला समाज अप्रतिष्ठित मानतो, हीन समजतो. हलकीसलकी कामे करणाऱ्यांना तुच्छ लेखतो. भंगी स्वच्छतेचे काम करतो म्हणूनच आपला दुर्गंधीपासून बचाव होतो. कल्पना करा, भंगी लोकांनी आपले काम करावयाचे सोडून दिले तर आपला सर्व समाज दुर्गंधीच्या महासागरात गरारत राहील. कोणतेही काम करण्यापेक्षा काम न करण्याची प्रवृत्ती हीन आहे. श्रमांचे मूल्य सारखेच असते. श्रमदर्जा निरपेक्ष आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधींनी श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यासाठी हयातभर प्रयत्न केला. श्रमाबद्दल गांधीजींनी म्हटले आहे,

'Work is worship and duty is diety.' स्वर्गीय पंतप्रधान इंदिरा गांधींनी 'कठोर परिश्रमाशिवाय देशाला पर्याय नाही.' असा संदेश दिला.

खरोखरच श्रमाशिवाय समाजाची उन्नती साधणार नाही, प्रगती होणार नाही. 'श्रम देवो भव' म्हणून श्रमाची पूजा बांधायला हवी. श्रमाचा कानमंत्र देणाऱ्या या पंक्ती मनात ठसायला हव्यात, आचरणात उतरायला हव्यात.

*'तुझ्या कामामधून, तुझ्या घामामधून ।*
*उद्या पिकंल सोन्याचं रान ॥*
*चल उचल हत्यार, गड्या होऊन हुशार ।*
*तुला नव्या जगाची आण ॥*

## *आदर्श विद्यार्थी : माझ्या कल्पनेतला !*

परवा वर्गात गोंधळ केला म्हणून बाईंनी एका मुलाला चांगला फैलावर घेतला.

"का रे अं ? काय शहाणे समजता का स्वतःला ? का दहावीचं वर्ष आहे;

आपण शाळा सोडून चाललोय म्हणून बाकं मोडायला मोकळे आपण ? तुमच्या नंतर येणाऱ्यांना बसायला बाकं लागणार नाहीत ? आणि तूच परवा नाटकात काम केलंस नं ? मग ? तुमच्यासारखे असं करायला लागल्यावर बाकीच्यांनी काय करायचं ?"

विद्यार्थ्यांमध्ये बेशिस्तीचं प्रमाण वाढलंय. शिक्षकांना जुमानत नाहीत. घरी पालकाचं ऐकत नाहीत. अभ्यास करत नाहीत. अशी चर्चा खूप वेळा ऐकायला येते. त्यात तथ्य नाही असं नाही. पण या विद्यार्थ्यांपुढे काहीतरी आदर्श असल्याशिवाय तो विद्यार्थी आदर्श होणार नाही. मग ते आदर्श वरच्या इयत्तेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे असतील, शिक्षकांचे असतील.

'आदर्श विद्यार्थी' असं एक बक्षीस प्रत्येक शाळेत दिले जाते. त्याला कोणते निकष लावले जातात ते मला माहिती नाही. पण 'आदर्श'ची पुढील रूढ कल्पना बदलायला हवी. लवकर उठतो. अभ्यास करतो. स्वच्छ युनिफॉर्म घालून शाळेत जातो. वर्गात लक्ष देतो. शिक्षकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तर देतो. शाळेतून तडक घरी येतो. कपडे बदलून खायला बसतो. खेळायला गेल्यावर सातला घरात हजर असतो आणि शाळेत शिकवलेला अभ्यास त्या त्या ठरलेल्या दिवशी पूर्ण करतो. शिक्षक-पालकांविषयी आदर बाळगतो. कधी कधी काही स्पर्धांमध्ये भाग घेऊन बक्षीसं मिळवतो. अभ्यासातही मागे नसतो.

बक्षीस द्यायला हे पुरेसं असेलही कदाचित. पण माझ्या कल्पनेतला आदर्श विद्यार्थी याहून उजवा असेल. अभ्यास सांभाळून तो हव्या त्या आवडीच्या क्षेत्रामध्ये रमेल, धडपड करत राहील. ग्रंथालयामध्ये तासन्तास रंगून जाईल. प्रयोगशाळेत शिक्षकांच्या मदतीने नवनवीन प्रयोग करेल. सहली काढेल. मित्रांना घेऊन खूप खूप भटकेल. पक्ष्यांचा, प्राण्यांचा अभ्यास करेल. आकाशाला न्याहाळेल आणि कविता वाचून हळवाही होईल.

वक्तृत्व आणि नाटक एवढ्यानंच व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो असं नाही. बॅडमिंटन आणि टे-टे खेळतो म्हणजे आपण कुणीतरी थोर असतो असंही नाही. क्रिकेट आणि फूटबॉलमध्ये पारंगत आहोत पण तेवढे दोनच खेळ जगामध्ये नाहीत.

म्हणून त्याने गाणे शिकायला हवे. वाद्यं वाजवायला हवीत. नाटक, दर्जेदार सिनेमे आणि व्याख्यानांना आवर्जून जायला हवे. रोज अभ्यास केलाच पाहिजे

असे नाही. पण वृत्तपत्र मात्र वाचायलाच हवे. नियमित व्यायाम हवा; मन प्रसन्न राहण्यासाठी त्याला हवे तर त्याने परवचा म्हणावा, स्तोत्र, प्रार्थना म्हणावी, ध्यान करावे किंवा पाच मिनिटे स्वस्थ शांत बसावे आणि रात्री टी. व्ही. सुद्धा पाहावा.

त्याला जे आवडेल त्याचा संग्रह करावा. मग ते स्टॅम्प्स असतील, चित्रे असतील; काड्यापेट्या असतील; दगड असतील किंवा वृत्तपत्रातील कात्रणे असतील. चित्रे काढेल, शिल्पकाम करेल; हातांने निरनिराळ्या कलाकुसरीच्या वस्तू बनवेल. मग भले त्या बिघडल्या तरी काही हरकत नाही.

आदर्श विद्यार्थी शालेय जीवनात हव्या त्या त्या क्षेत्रात स्वतःला झोकून देईल. बेभान होईल, स्वतःला विसरून जाईल. अभ्यास सांभाळून आपले शालेय जीवन त्याला हवे त्या पद्धतीने उपभोगता यावे, त्याचा खऱ्या अर्थानं विकास व्हावा आणि या शालेय वर्षांमधून विश्वात रमताना पुढच्या जीवनासाठी खूप काही त्याच्या हातात यावे. यासाठी शिक्षक-पालकांनी त्याला फुलू द्यायला हवे. आदर्शाचा नुसता डगला चढवून उपयोगी नाही, तर मनापासून त्याने अंतर्बाह्य बदलायला हवे. जे जे चांगले असले ते मनापासून स्वीकारायला हवे, तर तो खरा आदर्श !

## *जीवन हीच एक शाळा*

खरे तत्त्वज्ञान पुस्तकात नसून अनुभवात असते असे म्हणतात, पण हे अनुभव मिळवण्यासाठी आपल्याला कोणत्या वेगळ्या शाळेत जावे लागत नाही, कारण ते फक्त एकाच शाळेत मिळतात, ती शाळा म्हणजे जीवनशाळा.

खरेच, आपले जीवन म्हणजे एक अशी शाळा आहे की, जिथे आपल्याला सर्वज्ञान फुकट मिळते. पण योग्य ते ज्ञान मिळवण्यासाठी स्वार्थत्यागाची तयारीही ठेवावी लागते. आपल्याला प्रत्येकाकडून वेगवेगळे धडे मिळत असतात अन् त्यातूनच आपण आपले आयुष्य सुसंपन्न करीत असतो. तसे म्हटले तर आपल्याला या सृष्टीतल्या प्रत्येक गोष्टींकडून अतिशय मोलाचे धडे घेता येतात. छोट्या मुंगीपासून बलाढ्य हत्तीपर्यंत सर्वचजण आपल्याला त्यांच्या

त्यांच्या परीने शिकवत असतात. पण प्रत्येकाकडून काय घ्यायचे आणि कसे घ्यायचे हे मात्र आपल्यावर अवलंबून असते.

आपल्या शरीररूपी थैलीत आत्मा हा एकच अनमोल हिरा आहे आणि त्याला संस्काराच्या कोंदणात बसवायची जबाबदारी मात्र आपली आहे. हे कोंदण करावयास अनेक अनुभवरूपी कारागीर अन् सोनार उपयोगी पडत असतात आणि तेही आपल्या नकळत ! जीवनाच्या या शाळेत अनुभवांनी उठवलेले ठसे हे चिरंतन लक्षात राहतात. त्यातले काही अनुभव चांगले तर काही वाईट असतात. पण त्यातूनच आपल्या ज्ञानाच्या कक्षा वाढत असतात, आपल्या जीवनाला वेगळे वळण मिळत असते. अज्ञवयातून सुज्ञवयाकडे वाटचाल ही त्यांच्याच मदतीने होत असते.

प्रथम आपल्या आयुष्याबद्दल फारच रम्य आणि छान कल्पना असतात. आपल्याला प्रत्येक व्यक्ती ही आपल्याचप्रमाणे किंबहुना आपलीच वाटत असते. पण आपण ज्या व्यक्तीस आपले मानतो, प्रेम करतो तीच व्यक्ती जेव्हा आपल्या पाठीत खंजिर खुपसते, आपला विश्वासघात करते, त्या वेळी आपल्याला मरणप्राय दुःख होते आणि आपल्या त्या व्यक्तीबद्दलच्या आपलेपणाच्या भावनांना तडा जातो. असल्या ह्या मानसिक ठेचांचे श्रेय नेहमी दुसऱ्यालाच जाते.

जीवन ही एक कल्पना नसून वास्तव आहे अन् हे वास्तवाचे चटके आपल्याला अनुभवच देत असतो. हे अनुभवच आपल्याला पुढे प्रत्येक गोष्टीत मोलाचे साहाय्य करतात. जीवनातील वास्तवतेची ही कटू जाणीव आपल्याला स्वीकारावीच लागते. म्हणून तर असे म्हटले जाते की,

'जीवनाच्या शाळेत अनुभवाचे मास्तर,
कल्पनेच्या हातावर मारतात वास्तवतेचे डस्टर'.

*

# सरावासाठी

निबंधलेखनाचा आत्तापर्यंत आपण विविधांगी विचार केला. निबंधलेखनाची कला, तिचे तंत्र, यशासाठी आवश्यक मंत्र हे सारे बारकावे टिपून अभ्यासले. आता सुरुवातीला काही वानगीदाखल आणि अभ्यासासाठी निबंध दिले आहेत. ते तुम्ही वारंवार वाचावेत. त्यातले बारकावे टिपावेत. वाचन, मनन, चिंतन आणि वाचल्यावर विचार करून त्या त्या निबंधांच्या क्रमवार परिच्छेदात लपलेले– अंतर्भूत असलेले विविध मुद्दे शोधून काढावेत, आपल्याला सुचलेले जास्तीचे मुद्दे घेऊन निराळ्या शैलीत, नवीन मांडणी करून निबंध लिहून पहावेत अशी अपेक्षा आहे, नव्हे, तसा आग्रहही धरणार आहे. सरावामुळे आपला आत्मविश्वास वाढतो, आपल्या लेखनाला आशयघनता, सखोलता, झिलई येते, हा अनेकांचा अनुभव तुम्हालाही मिळावा, हा या योजनेमधील हेतू आहे. पुढील गोष्टी वाचा, ध्यानात घ्या, कृतीत उतरवा. यशासाठी लिहिते व्हा, लिहीत रहा.

(१) निबंध काळजीपूर्वक वाचा.

(२) परिच्छेदातील मुद्दे शोधा.

(३) पूर्वानुभवाशी पडताळून नवे मुद्दे शोधा.

(४) प्रारंभ, मध्य, अंत यांच्यात नावीन्य कसे आणता येईल याचा विचार करा.

(५) सुविचार, सुभाषिते, अलंकार– विषयानुरूप नव्याने हुडका.

(६) मनाशी नीट जुळणी करा, क्रम ठरवा, विचारांना मर्यादित करा.

(७) त्याच विषयावर नव्याने निबंध लिहा.

(८) हस्ताक्षर, लिखाणपद्धती, रचना अधिकाधिक सुबक, नेमके, नेटके, आकर्षक कसे होईल याकडे लक्ष द्या.

खाली दिलेले निबंध अपेक्षित मुद्द्यांच्या आधारे शब्दांकित करा. सायासाने असाध्य काहीच उरणार नाही. लेखनाची प्रयत्नसाध्य कला तुम्हालाही अवगत होईल.

काळजीपूर्वक अभ्यासा, विचारपूर्वक लिहा.

---

## *मानवतेचे उपासक– महात्मा फुले*

मुद्दे :

१. मानवतेचे अन्य उपासक, त्यांचे कार्य.

२. महात्मा फुले– आदर्श, श्रेष्ठ उपासक कसे.

३. जीवनविषयक दृष्टिकोन, कार्य.

४. समाजाशी नाते, अडचणी.

५. शिकवण.

६. ज्योतिबांचे समाजोपासनेतील स्थान.

---

## *देश हा देव असे माझा !*

मुद्दे :

१. आपली ईश्वरविषयक धारणा.

२. देश हा देव कसा.

३. वैशिष्ट्ये, अनुभूती.

४. देशोपासना कशी, कर्तव्ये.

५. निष्ठा, श्रद्धा, त्याग यांची प्रेरणा.

६. समारोप.

## *सुसंगती सदा घडो !*

मुद्दे :

१. सुसंगती म्हणजे–

२. व्यक्तिजीवन आणि संगत.

३. सुसंगतीमुळे होणारे लाभ.

४. सोदाहरण दाखले.

५. विचारवंतांचे अनुभवी बोल.

६. संदेश.

## *पाटीचे मनोगत*

मुद्दे :

१. सद्यस्थिती वर्णन, अनुभव (उपेक्षा, अनास्था).

२. पूर्वकाळ– आठवणी- सुखद.

३. अन्य उल्लेख– गमतीदार किस्से.

दगडी पाटी (पत्र्याची-प्लॅस्टिकची) नावाची पाटी, दुकानाची पाटी– हमालाची पाटी– शेणाची पाटी.

४. सेवा-मनोगत (व्यथा, वेदना).

५. आजची स्थिती-प्रश्न-जबाबदार कोण ?

६. समारोप.

## *निरोप घेताना. . . शाळेचा*

१. निरोप म्हणजे–
२. निरोपाच्या वेळची मनःस्थिती.
३. दाटलेल्या आठवणी.
४. प्रत्यक्ष सभेतील अनुभव.
५. अध्यक्ष, शिक्षक– शिकवण– आशीर्वाद.
६. समारोप.

## *आजचे विद्यार्थी हीच समस्या*

१. आजचे विद्यार्थी– बोलक्या प्रतिक्रिया.
२. घरी पालकांपुढील अडचणी.
३. शाळा-कॉलेज-क्रीडासंस्था– अनुभव.
समस्या विविध स्तरांवर
१) शिस्त.
२) आचरण-विचार-उच्चार.
३) समाजजीवनातील वागणूक.
४) व्यसनाधीनता, उद्दंडता, बेपर्वाई, बेफिकिरी, बंडखोरी, चैन.
५) मूल्य घसरण (कॉपी, मारामाऱ्या, शिवीगाळ).

## *आजच्या विद्यार्थ्यांच्या समस्या*

१. अनेक समस्या आ वासून– दोषी विद्यार्थी नसून परिस्थिती. विविधांगी समस्या.

२. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक.

३. प्रवेश, संधी.

४. नावडते बोजड अभ्यासक्रम.

५. परीक्षांचे दुष्टचक्र.

६. मोहमयी वातावरण.

७. समारोप (विद्यार्थ्यांच्या चष्म्यातून).

---

## राष्ट्रीय एकात्मता आणि मी

१. एकात्मतेची जुनी परंपरा.

२. राष्ट्रीय एकात्मता म्हणजे–

३. एकात्मतेसाठी काय टाळावे–

किंवा

एकात्मतेतील अडसर.

(जातीयता, पंथीयता, प्रांतीयता, धर्मांधता, आर्थिक विषमता, शिक्षण स्तर).

४. राष्ट्रीय एकात्मतेसाठी आजवर झालेले प्रयत्न (देशभक्त, समाजसेवक, साधुसंत).

५. आजची स्थिती– विदारक सत्य.

६. मी या राष्ट्राचा म्हणून एकात्मतेसाठी मी काय करू शकतो (काळाची गरज).

७. घेतलेली प्रेरणा, प्रामाणिक संवेदना, प्रांजल भूमिका.

---

## एका दलिताचे मनोगत

१. आजची स्थिती– आंतरिक वेदना.

२. पूर्वीचा दाहक काळ.

३. परिस्थितीतील स्थित्यंतरे.

४. आजच्या सवलती, सुधारणा.

५. अन्यायाची चीड, विद्रोह.

६. उपकारकर्ते, उद्धारकर्ते— त्यांचे ऋण.

७. समाजाकडून अपेक्षा.

---

## *माझा आवडता कवी*

१. शालेय जीवनात अभ्यासलेले कवी, त्यांची वैशिष्ट्ये.

२. आवडत्या कवीचा उल्लेख, थोडक्यात वर्णन, परिचय.

३. आवडल्याची कारणे, वैशिष्ट्ये.

४. काही काव्यपंक्ती (भाषा, शैली, विचार, अलंकार).

५. शिकवण (जीवनविषयक, समाजविषयक, देशविषयक, निसर्ग).

६. विविध अनुभूती— साहित्यातील स्थान, रसिक मनातील स्थान.

---

## *भ्रष्टाचार ! भ्रष्टाचार ! भ्रष्टाचार !*

१. भ्रष्टाचार म्हणजे—

२. विविध स्तरांवरील भ्रष्टाचाराचे किस्से. राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक.

३. दोष दिग्दर्शन-दुष्परिणाम.

४. भ्रष्टाचाराची कारणमीमांसा— का ? कुणामुळे ? कुणासाठी ?

५. भ्रष्टाचार नष्ट करण्यासाठी— व्यक्ती-समाज-शासन, उपाययोजना.

६. सुसंस्कार : काळाची गरज.

*

# भाग ३

# आकलन

पाठ्यपुस्तकाखेरीज पाठ्येतर गद्याचे वा पद्याचे आकलन करायचा सराव तुम्हाला हवा. निबंधवजा प्रश्नांची उत्तरे लिहिताना आकलन आणि अभिव्यक्ती या सरावाचा आपल्याला खूप उपयोग होतो. अचूकपणा, नेमकेपणा आणि नेटकेपणा या तिन्ही गोष्टींचा मेळ या प्रश्नांच्या उत्तरात आपल्याला साधावा लागतो. आकलन करताना पुढील गोष्टी ध्यानात घेण्याची गरज असते, तरच आकलन परिपूर्ण होऊ शकते.

(१) दिलेला अनुच्छेद हेतू ध्यानात घेऊन कमीतकमी दोनदा तरी काळजीपूर्वक वाचावा.

(२) अनुच्छेदाचा मूळ बीजविचार हुडकावा.

(३) अनुच्छेदाच्या खाली दिलेल्या प्रश्नांची अपेक्षित उत्तरे दिलेल्या संदर्भांच्या आधारे गुंफावीत.

(४) ही उत्तरे लिहिताना पाल्हाळ, विस्कळीतपणा टाळून अचूक उत्तर आटोपशीर, स्वतःच्या शब्दात, सहज, सुबोध भाषेत द्यावे. वाक्ये छोटी पण समर्पक असावीत.

(५) शीर्षक छोटे, उचित, आकर्षक, वेधक, चपखल असावे.

पुढे उतारे दिले आहेत. हे उतारे नीट वाचून, आकलन झाल्यावर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहिण्याचा प्रयत्न करावा.

**अनुच्छेद : १**

परावलंबी जिणं काय कामाचं ? त्यापेक्षा मरण पत्करलेलं चांगलं. म्हणूनच प्रत्येकानं जीवनात हरघडी दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वावलंबी बनून स्वाभिमानानं जगलं पाहिजे. स्वावलंबनातून शिक्षण हे विद्यार्थ्यांचं ब्रीद व्हायला हवं. स्वावलंबनानं उत्साह, उमेद वाढते, स्वाभिमान उसळी मारून जागा होतो. शरीर आणि मन टणक, कणखर बनतं. कुठलंही छोटं-मोठं काम करताना स्वावलंबी विद्यार्थ्याला मग लाज वाटत नाही. निढळाचा घाम गाळून श्रमताना त्याला स्वकष्टाचा उलट आनंद मिळतो. प्रत्येक विद्यार्थ्यानं स्वतःच्या हिमतीवर शिकलं पाहिजे, दुसऱ्यावर अवलंबून न राहता येणाऱ्या अडचणींवर मात करत स्वतःची कामं स्वतः केली पाहिजेत. उद्योगप्रिय बनून आत्मनिर्भर झालं पाहिजे. स्वावलंबन आवडू लागलं की स्वकमाईची ओढ वाटायला लागते. आजकाल बरेच विद्यार्थी 'कमवा आणि शिका' हा मंत्र शिरोधार्य मानून आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी प्रयत्न करायला लागलेत. ही आशादायक गोष्ट आहे.

**प्रश्न**

१. आपण हरघडी काय केले पाहिजे ?

२. स्वकष्टाचा आनंद केव्हा मिळतो ?

३. विद्यार्थ्याचे ब्रीद काय हवे ? त्याने कोणता मंत्र शिरोधार्य मानायला हवा ?

४. स्वावलंबन आपल्याला काय काय शिकवते ?

५. योग्य शीर्षक द्या.

**अनुच्छेद : २**

आपल्या देशाला मिळालेले स्वातंत्र्य हे स्वातंत्र्यवीर सावरकर, लोकमान्य टिळक, दादाभाई नौरोजी, महात्मा गांधी, नेताजी सुभाष, पं. जवाहरलाल नेहरू, सरदार पटेल या आणि अशा अनेक राष्ट्रभक्तांच्या कष्टांचे नाम-अनाम असंख्य हुतात्म्यांच्या असीम त्यागाचे प्रतीक आहे. हे लाखमोलाचेच नव्हे, तर प्राणाहूनही मोलाचे असलेले स्वातंत्र्य राखणे आणि टिकविण्यासाठी सदैव तत्पर राहणे, हे प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य आहे आणि त्यासाठी राष्ट्रीय वृत्ती अंगी बाणणे अगत्याचे आहे. 'माय आणि मायभूमी स्वर्गाहूनही महान' ही जाणीव

लहानवयापासून मुलांच्या मनात रुजायला हवी. आपले राष्ट्र अधिकाधिक सामर्थ्यशाली, वैभवसंपन्न, प्रगत कसे होईल याचा विचार करून प्रत्येकाने धडपडण्याचा प्रयत्न केला पाहिजे. विध्वंस, विनाश, विघातक कार्य करणाऱ्या, ऐक्याला बाध आणणाऱ्या, प्रगतीला खीळ घालणाऱ्या पाशवी शक्तींचा निःपात केला पाहिजे. राष्ट्रप्रेम, राष्ट्रीय एकात्मता यांची जाणीव शाळेत, कुटुंबात, संस्थांत, समाजात वारंवार दिली जावी. राष्ट्रीय एकात्मता ही आजची प्रकर्षाने जाणवणारी महत्त्वाची गरज आहे. तिच्या पूर्तीसाठी सर्वांनी झटले पाहिजे आणि हे साधण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकता ही तत्त्वे, ही मूल्ये देशात रुजवली पाहिजेत.

**प्रश्न**

१. आज प्रकर्षाने जाणवणारी महत्त्वाची गरज कोणती ? तिच्या पूर्तीसाठी आपण काय करायला हवे ?

२. आपल्या देशाचे स्वातंत्र्य हे कशाचे प्रतीक आहे ?

३. प्रत्येक भारतीयाचे आद्य कर्तव्य कोणते ?

४. प्रत्येकाच्या धडपडीमागे कोणता मुख्य विचार हवा ?

५. कुठल्या गोष्टींचा निःपात करण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न व्हायला हवा ?

६. योग्य मथळा द्या.

**अनुच्छेद : ३**

निसर्ग महान जादूगार आहे. तो अतर्क्य असून त्याचे चमत्कार, त्याच्या लीला अगाध आहेत. निसर्ग प्रसन्न, रमणीय, सौंदर्यशाली आहे. त्याच्या सान्निध्यात निराशा, औदासीन्य, मरगळ हे सारे झटकले जाऊन प्रसन्नता, उमेद, उत्साह नव्याने स्फुरायला लागतो. त्याच्या सांगाती रमताना कळत-नकळत आपण खूप गोष्टी शिकतो. आपण अंतर्मुख होतो, विचार करू लागतो. दुथडी भरून वाहणारी नदी, उडी घेणारा जलप्रपात, वाहता झरा हे सारे आपल्याला जणू 'पुढे जा, पुढे पुढे जात रहा' असा संदेश देत राहतात. आसमंत गंधित करणारे सुगंधी फूल, रिझवणारा वारा, शीतल छाया देणारा-रसाळ फळे देणारा वृक्ष, आपल्या कृपेची बरसात करणारा मेघ हे सारे आपल्याला 'देते व्हा, देण्यातला

आनंद लुटा' हा कानमंत्र देत राहतात. निसर्गाने आपल्याला बुद्धी दिली, भावना दिल्या, कल्पना दिल्या, प्रतिभेचे लेणेही काहींना बहाल केले. सुख-दुःख, हास्य-अश्रू सारे त्याने मुक्तपणे दिले. असा हा बहुरंगी, बहुढंगी, विश्वव्यापी निसर्ग आपला सखा, सोबती दिलासा देतो, मातेप्रमाणे परिपुष्ट करतो. जादुई सौंदर्याने भरून-भारून टाकत तहानभूक विसरायला लावतो.

**प्रश्न**

१. निसर्गसान्निध्याचा लाभ कोणता ?

२. निसर्ग आपल्याला काय शिकवतो ?

३. निसर्गाकडून आपल्याला कोणकोणत्या गोष्टी मिळाल्या ?

४. आपल्याशी नाते जोडणारा निसर्ग कसा आहे ?

५. अनुच्छेदाला समर्पक शीर्षक द्या.

वर दिलेल्या अनुच्छेदांचे संक्षिप्तीकरण करा. महत्त्वांश शोधून तो साररूपाने मांडणे म्हणजे सारलेखन, सारांशलेखन. बीजरूपाने असलेल्या विचाराचा विस्तार म्हणजे अनुच्छेद लेखन. विचार समजावून घेणं म्हणजे आकलन आणि अनुच्छेदाचे सार काढणे म्हणजे सारांशलेखन. सरावासाठी, भाषाज्ञान वृद्धीसाठी, शैली आत्मसात करण्यासाठी या साऱ्या प्रयत्नांची नितांत गरज आहे.

*

# सारांश लेखन

थोडक्यात पण महत्त्वाचे–

(१) दिलेला पाठ्येतर उतारा विचारपूर्वक, बारकावे ध्यानात घेत एकाग्रतेने वाचावा.

(२) तुमच्या आकलनक्षमतेची चाचणी घेण्यासाठी, अभिव्यक्तीला वाव देण्यासाठी या प्रश्नाचा अंतर्भाव प्रश्नपत्रिकेत झाला आहे. विचार संकलनासाठी, महत्त्वाचा विचार उताऱ्याचा आत्मा टिपणे, अनुभवणे म्हणजे यशाची निम्मी हमी, हे ध्यानात असू द्या.

(३) विचार सुस्पष्ट व्हावा म्हणून लेखकाने कोणती उदाहरणे, कोणते दाखले दिले आहेत हे ध्यानात घ्या. त्या अनुषंगाने केलेल्या कल्पना, दिलेल्या उपमा अलगद बाजूला करा.

(४) संक्षेप करताना सुसंगती असावी, स्वशब्द असावेत आणि मुख्य म्हणजे हा संक्षेप मूळ उताऱ्याच्या एक तृतीयांश असावा.

(५) सारांशाला सुयोग्य, आकर्षक मथळा द्यावा.

**उतारा : १**

मनुष्यमात्रांच्या सर्व गुणविशेषांचे मूळ म्हणजे परोपकार. परोपकारी वृत्तीमुळे माणसाच्या अंगी अनेक गुण कळत-नकळत बाणले जातात. परोपकारात एक अशी जादू आहे की, त्यामुळे माणसाच्या हृदयात दया, क्षमा,

शांती, निर्मलता इत्यादी गुण उमलू लागतात. म्हणूनच परोपकार म्हणजे 'सर्व सद्गुणांची खाण' असे म्हटले जाते. खरी गोष्ट अशी आहे की, परोपकारी व्यक्ती ही सर्वार्थाने ईश्वरासमान असते. त्याचे मन सागराप्रमाणे विशाल, भूमातेप्रमाणे क्षमाशील आणि दयाघन मेघाप्रमाणे कृपाळू असते. तो दीनबंधू, विश्वबंधू असतो. अखिल मानवजातीसाठी त्याच्या मनात कणव, प्रेम, आस्था दडलेली असते. दुसऱ्यांना देण्यात, त्यांची सेवा करण्यात, त्यांच्या उपयोगी पडण्यात त्याला आनंद मिळतो, कृतार्थता वाटते. बलवान आपल्या शक्तिसामर्थ्याने, धनवान आपल्या धनाच्या जोरावर माणसाच्या शरीरावर कदाचित अधिकार गाजवू शकतात; पण परोपकारी माणूस असंख्य माणसांची मने जिंकतो, त्यांच्या हृदयावर जणू राज्य करतो. म्हणूनच प्रत्येकाने परोपकारी व्हायला हवे.

**उतारा : २**

जीवनात नित्य प्रगतीकडे झेपावणारा विद्यार्थी दररोज सूर्योदयापूर्वीच उठतो. नित्यकर्म उरकून व्यायाम करून तो स्नान करतो. प्रसन्न मनाने तो ईशप्रार्थना करतो आणि एकाग्र चित्ताने स्वयंअध्ययनात रमतो. वाचन, लेखन, पाठांतर यांबरोबरच मनन, चिंतन, आवृत्ती या अभ्यासपद्धतीही तो गरजेनुसार स्वीकारतो, अनुभवतो. आपली ज्ञानेंद्रिये तो सतत परजती ठेवतो. सूक्ष्म अवलोकन, श्रवण, संभाषण आणि अवांतर वाचन यातून परिश्रमपूर्वक तो ज्ञानसंचय करतो. नेमाने वृत्तपत्र वाचणे, रेडिओवरील चिंतन, शालेय कार्यक्रम, मुलाखती आवर्जून ऐकणे, टी.व्ही. वरील कार्यक्रमांतून नेमके चांगले ते टिपणे या साऱ्यांचे त्याला जणू वेड लागते आणि त्यातून त्याचे व्यक्तिमत्त्व घडत राहते, अनुभवविश्व समृद्ध होत राहते. नवीन काहीतरी शिकण्याचा ध्यास घेणारा आणि नेमस्त जीवन जगणारा विद्यार्थीच जीवनात यशस्वी होतो.

**उतारा : ३**

उधार-उसनवारीची शिदोरी अल्पकाळ पुरते. दुसऱ्यांचे विचार, त्यांची मते डोळे मिटून निमूटपणे स्वीकारण्यापेक्षा बुद्धीचा वापर करत स्वतंत्रपणे विचार करायला शिका. खूप अनुभव घ्या. ज्ञानेंद्रियांचा भरपूर उपयोग करा. स्वतःच्या विचारांना मनन-चिंतनाच्या मुशीत घालून, पारखून, पडताळून बघा. भरपूर वाचन,

एकाग्र-स्थिर मनाने केलेले श्रवण, सूक्ष्म अवलोकन, चिंतन यांच्यामुळेच विचारांना चालना मिळेल आणि विचार सुचायला लागतील. स्वतंत्रपणे विचार करायला लागलात की, हातून आचारही आपोआप चांगलाच घडेल. तुमचे सर्वोत्तम विचारच तुमच्यावर योग्य नियंत्रण ठेवू शकतात. भावी जीवनात तुम्ही कोण होणार ? तुम्ही किती शिकणार ? तुम्ही कोणता व्यवसाय पत्करणार ? हे सारे इतरांनी नव्हे, तुम्हीच ठरवायचे. परतंत्राने चालण्यापेक्षा तुम्हीच स्वतंत्र विचार करून योग्य-अयोग्य पारखून इष्ट निर्णय घ्यायला शिका. 'जो दुसऱ्यावरी विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला' यातले मर्म लक्षात घ्या. आपले परिपक्व विचारच आपल्याला जीवनात तारून नेतात.

*

# रसग्रहण

पाठ्येतर कवितेचे आकलन आणि तिचे स्वशब्दात केलेले रसग्रहण, हा एक सहजसुंदर असा रसाळ अनुभव आहे. हा अनुभव अधिक उत्कट व्हावा, म्हणून पुढील गोष्टी ध्यानात ठेवाव्यात.

कवितेचे आकलन करताना–

(१) दिलेली कविता समजून उमजून दोनदा तरी वाचावी.

(२) कवितेचा वर्ण्य विषय, मध्यवर्ती कल्पना, आत्मा, अन्य संदर्भ ओळखून मनाशी जुळणी करावी.

(३) कवितेखाली दिलेले प्रश्न काळजीपूर्वक वाचून त्यातली सूचकता हुडकावी.

(४) प्रत्येक प्रश्नाचा संबंध नेमक्या कोणत्या ओळीशी निगडित आहे, याचा नीट विचार करावा.

(५) प्रश्नाचा रोख, कवितेतील त्याचे महत्त्व हे सारे ओळखून उत्तर संक्षिप्त वा विस्तारित द्यावे.

(६) शीर्षक देताना ते छोटे, समर्पक, नेमके असावे.

कवितेचे रसग्रहण करताना–

(१) कवितेचा घाट, मूळ स्रोत, मुख्य काव्यरस यांचा साक्षेपाने विचार व्हावा.

(२) कवितेतले भावसौंदर्य ज्यातून व्यक्त होते, ते सारे रसग्रहणात वापरावे.

(३) कवितेतील विचारसौंदर्य, कल्पनासौंदर्य संदर्भासह विवेचित करावे.

(४) कवितेची धाटणी, शैली ध्यानात घ्यावी.

(५) कवितेत व्यक्त झालेला जीवनविषयक दृष्टिकोण अचूक शब्दात टिपावा.

(६) सांगोपांग विचार करून नेमके, नेटके, सारगर्भ रसग्रहण करावे.

(७) रसग्रहण हे एकप्रकारे सलग आणि परिपूर्ण आकलन असावे.

*तू गे माझी माय । वासुरासी गाय ।*
*होते तुझी सय । विठाबाई ॥१ ॥*
*संसार सागरूं । भरकटे तारूं ।*
*कसे मी सावरू । तुझ्यावीण ! ॥२ ॥*
*भोळा माझा भाव । व्याकुळला जीव ।*
*घेई झणी धाव । विठाबाई ॥३ ॥*
*सोसवेना ताप । उपसेना व्याप ।*
*लागलीसे धाप । विठाबाई ॥४ ॥*
*अंतरले माहेरासी । मुकले ग दर्शनासी ।*
*लेकीला का विसरसी । विठाबाई ॥५ ॥*
*पोचविली तूच येथे । धरोनियां ग हाताते ।*
*नेई आता तूच माते । मजलागी ॥६ ॥*
*चुकले ग लाखवेरी । आता आले तुझ्या दारी ।*
*चुकले मी, क्षमा करी । विठाबाई ॥७ ॥*
*बावरे कोकरू । वेडे हे पाखरू ।*
*नको दूर सारू । विठाबाई ॥८ ॥*
*देई दृष्टभेटी । लेक तुझी हट्टी ।*
*नाहीतर कट्टी । तुझ्यासंगे ॥९ ॥*
*नको मज काशी । नको गंगा मशी ।*
*घेई मज कुशी । विठाबाई ॥१० ॥*

१. कवयित्रीने कुणाची आठवण काढली आहे ? का ?

२. कवयित्री कुणाशी कट्टी घेणार आहे ? कधी ?

३. 'तूच मला ने' असं विठाबाईला कवयित्री का म्हणते ?
४. विठाईशी कोणत्या नात्याने कवयित्रीने जवळीक साधली आहे ?
५. कवितेला सुयोग्य शीर्षक द्या.
वरील कवितेचे रसग्रहण करावे.

*

# कल्पनाविस्तार

अनुच्छेद लेखनात ज्याप्रमाणे बीजरूपाने असलेला विचार आपण विस्ताराने सांगतो, तसंच काहीसं कल्पनाविस्तारात अपेक्षित असतं. एखादी म्हण, सुविचार, सुभाषित किंवा नेमकी काव्यपंक्ती दिली जाते. त्याआधारे गर्भितार्थ शोधून त्यातले आंतरिक मर्म, सौंदर्य आपण खुलवून विस्ताराने लिहितो ते कल्पनाविस्ताराचा प्रश्न हाताळताना ! कल्पनेतील गुपितं, रूपकातला मथितार्थ उकलून दाखवणं म्हणजे कल्पनाविस्तार ! कल्पनाविस्तार अधिकाधिक चांगला व्हावा, म्हणून पुढील गोष्टी प्रामुख्याने ध्यानात ठेवाव्यात.

(१) दिलेला (बीजरूपात) विचार, कल्पना, काळजीपूर्वक वाचावा. पूर्वानुभावावरून आडाखे बांधावेत, संदर्भ शोधून काढावेत.

(२) सुरुवातीला सर्वसामान्य अर्थ सुस्पष्टपणे मांडावा.

(३) कल्पनेतील 'गर्भितार्थ', 'लक्ष्यार्थ' समर्पक उदाहरणांनी मोजक्या शब्दात मांडावा.

(४) मूळ कल्पनेचा विस्तार करताना त्या कल्पनेशी जुळणारी अन्य म्हण, सुभाषित किंवा दुसऱ्या भाषेतला सुयोग्य संदर्भ (काव्यपंक्ती) विस्ताराच्या ओघात अवश्य द्यावे.

(५) कल्पनाविस्तार फक्त १२-१५ ओळीतच असावा. लांबण किंवा पाल्हाळ लावला, तर तो निबंध होईल.

(६) भाषा सुस्पष्ट, नेमकी, नेटकी, रसाळ, वेधक असावी.

(७) विचार संक्षिप्त, उदाहरणे पोषक आणि रचना आटोपशीर असावी.

## (१) सुमसंगे मातीस वास येई–

नानारंगी, बहुरूपी फुलांचा जन्मच मुळी देण्यासाठी, सेवेसाठी झालाय ! त्याचा स्वभावविशेष, खास गुणधर्म आहे सुगंध देणे. हातचा न राखता आपल्यातील परिमल उधळून देत पुष्प आसमंत दरवळून टाकते. त्याच्याजवळ भेदाभेद नाही, आपपरभाव नाही. ते कुणाच्याही हातात पडो, रुमालात दडी मारून बसो, हारात गुंफले जावो, केसात माळले जावो किंवा मातीत पडो– ते कुठेही असले तरी जवळ असलेल्या, संगतीत येणाऱ्याला सुगंधाची खिरापत महादानी बनून वाटणारच.

सत्संगतीचा परिणाम किती त्वरित दिसतो, जाणवतो बरं ?

*आपणासारिखे करिती तत्काळ ।*
*नाही काळवेळ तयालागी ॥*

या सत्संगतीचा परिणाम-प्रभाव व्यक्त करणाऱ्या उक्तीची प्रचीती फुलासवे मातीही गंधित होते यातून पटते. संस्कृत सुभाषितात हेच किती समर्पकपणे सांगितलंय पहा ना !

*आमोदं कुसुमभवम् मृदेव दत्ते ।*
*मृद्‌गंधम् नहि कुसुमानि धारयन्ति ॥*

मातीचा वास फूल स्वीकारत नाही, पण आपल्या सहवासात आलेल्या मातीला मात्र गंधित करते. सद्‌गुणाच्या ठायी असलेल्या परिसस्पर्शाने दुसऱ्याचे जीवनही सोन्याप्रमाणे उजळून, तेजाळून जाते. दानाचा महान आदर्श आमच्यापुढे ठेवणारे छोटेसे फूल आपल्या गुणांनी आपल्याजवळ येणाऱ्या, सहवासात येणाऱ्यालाही सुगंधित करून सोडते. हे फूल म्हणजे सद्‌गुणी व्यक्तीचे, साधुसंतांचे जणू प्रतीकच. आपल्याजवळ जे जे चांगले आहे ते इतरांना देत त्यांनाही आपल्यासारखे बनवा हा संदेश.

## (२) काट्यावाचुनि गुलाब नाही–

सुंदर, मनमोहक, सुगंधी, मनोहारी गेंदेदार गुलाब ! त्याला तोडण्यासाठी पुढे झेपावलं की लगेच दिसतात-जाणवतात खुपणारे असंख्य काटे, त्यांचे अटळ अस्तित्व ! ज्याला गुलाब पाहिजे त्याने हसतमुखाने काटेही स्वीकारायला

हवेत. यातून वास्तवाचे भान हवे, सत्य स्वीकारायला हवे. हे मोठ्या कौशल्याने सूचित केले आहे.

गुलाब गेंदाचा, त्याच्या राजेशाही थाटाचा, त्याला मिळणाऱ्या मोठेपणाचा-सन्मानाचा आपण हेवा करतो. पण त्याचे मोठेपण हसतमुखाने असंख्य काटे अंगाखांद्यावर बाळगण्यात, निमूटपणे स्वीकारत दुःख, वेदना, स्वतः सोसत इतरांना मात्र सौंदर्य, रंग, रूप, गंध यांचे सौख्य देण्यात आहे, हे आपण विसरतो. त्याकडे यातून सूचकपणे प्रकाशझोत टाकत लक्ष वेधले आहे.

सुख रूपी गुलाब हवा असेल, तर दुःखरूपी काटेही तितक्याच आनंदाने आपण सोसायला, स्वीकारायला हवेत. ध्येयरूपी गुलाब हस्तगत करताना अडचणी-आपत्तीरूपी काटे ओरबाडायला, घायाळ करायला टपले आहेत, या वास्तवाचे भान ध्येयवादी व्यक्तीला असायला हवे होते. जितके उच्च पदी विराजमान व्हायचे भाग्य माणसाला लाभते, तितकेच त्या पदावर बसताना भोवताली काटेरी पखरण आहे याचा आठव ठेवायला हवा. ज्याला यशरूपी गुलाब खुडायची जिद्द आहे त्याने अपशयाचे, अडंचणींचे काटेही समर्थपणे, ताकदीने झेलले पाहिजेत. त्यांच्याकडे डोळेझाक करणे म्हणजे अज्ञान, वास्तवाचे भान नाही. दुःखरूपी, विरोधरूपी, अन्यायरूपी काटे हे सुखासवे अभिप्रेत असतात. ते स्वीकारणे म्हणजे सत्याला सामोरे जाणे.

**(३) असाध्य ते साध्य करता सायास—**

संत तुकारामांनी मोठ्या समर्पक शब्दांत आपल्याला सांगितले आहे की, या जगात अशक्य, असाध्य, अप्राप्य असे काहीच नाही. नुसते मनातल्या मनात मांडे खात, आळशीपणाने वागणे अयोग्य आहे. आपण परिश्रम करायला हवेत. विनासायास संकल्प, कोणतेही ध्येय सिद्धीस जात नाही. त्यासाठी जिद्दीने भरपूर सायास करायची, प्रयत्न करायची, कष्ट करायची तयारी करायला हवी. 'कारण अभ्यास तुका म्हणे' यातले मर्म नेमके हेच आहे. सतत प्रयत्नशील असणाऱ्याची, असंख्य कष्ट झेलण्याची तयारी असलेल्याची दुर्मिळ स्वप्नेही साकारू शकतात. प्रत्यक्षात उतरू शकतात.

एके काळी 'निळया आकाशी विहरत जावे' हे स्वप्न वाटायचे. पण मानवाने अथक परिश्रमांच्या बळावर हे असाध्य, अप्राप्य वाटणारे स्वप्न सत्यात

उतरविले. मानवाने चंद्रावर जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले. पण ते फक्त कल्पनेत कुरवाळत तो स्वस्थ बसला नाही. तो जिद्दीने, अनेक आपत्तींना तोंड देत, कष्टत, झुंजत राहिला. नवनवीन प्रयोग करत राहिला. शेवटी संकल्प सिद्धीस गेलाच. स्वप्नपूर्ती प्रत्यक्ष सत्यात झाली. वैज्ञानिक प्रगती, उद्योगातील नेत्रदीपक यश, स्वातंत्र्यासाठी शर्थीने दिलेला लढा, अज्ञानतिमिर दूर सारत साक्षरता प्रसार या साऱ्यांच्या मुळाशी प्रामाणिक, मनापासून केलेले अथक आणि शर्थीचे प्रयत्न आहेत, हे आपण ध्यानात घ्यायला हवे.

दुर्दम्य इच्छेला जिद्दीच्या प्रयासांची जोड हवी. अंतिम साध्य तुमच्या पायाशी लोळण घेईल, परिपूर्तीचा आनंद मिळवून देईल, यात शंका नाही. ही उक्ती आपल्याला आशावादी, प्रयत्नवादी व्हा, असा नकळत संदेश देते.

*

# पत्रलेखन

भाषा विषयाच्या प्रश्नपत्रिकेत पत्रलेखनाचा प्रश्न अंतर्भूत असतो. अभ्यासाने आणि सरावाने हा लेखनप्रकार आपल्याला चांगला हाताळता येतो आणि त्यात आपल्याला अधिकाधिक गुणही मिळवता येतात. पत्रलेखन ही एक सहजसुंदर, सहजस्फूर्त कला आहे. लिखाणाची धाटणी, मांडणी यांचेही एक विशिष्ट शास्त्र आहे. अभ्यासाने, सरावाने तंत्र-मंत्र आत्मसात झाले की, अपेक्षित यश खचितच मिळणार, अशी खूणगाठ विश्वासपूर्वक बांधायला काहीच हरकत नाही.

दूरस्थ व्यक्तीशी जवळीक साधण्यासाठी, संपर्क साधण्यासाठी पत्रलेखन हे खास माध्यम आहे. या दृष्टीने पत्रलेखन म्हणजे अर्धी भेट, असे म्हटले जाते ते योग्यच वाटते. दोन मनांना सांधणारा, जोडणारा दुवा म्हणजे पत्र. ही पत्रलेखनाची कला शालेय जीवनात अवगत झाली, तर भावी जीवनात आपण अडत नाही, गोंधळत नाही. दुसऱ्यावर यासाठी आपल्याला अवलंबूनही राहावे लागत नाही. परस्परपरिचय वाढावा, स्नेहबंध टिकून राहावेत, तक्रारी नोंदवाव्यात, गैरसमज दूर करावेत, मागणी करावी, विनंती करावी, शुभेच्छा द्याव्यात, अभिनंदन करावे, शाबासकी द्यावी, सांत्वन करावे, अडचणी सोडवाव्यात, धीर द्यावा या आणि अशा अनेक हेतूंनी आपल्याला भावी जीवनात अनेक पत्रे पाठवावी लागतात. पत्र लिहिणे आणि पत्रोत्तर धाडणे यात नेमकेपणा-नेटकेपणा, व्यवस्थितपणा असतो आणि अनेक माणसे केवळ

आळसाने पत्र लिहिण्यास हयगय करतात, चालढकल करतात. परिणामान्ती इतरांचा रोष ओढवून घेतात, नाराजी पत्करतात. आप्त-स्वकीय, परिचित-अपरिचित, मित्र, वडीलधारी मंडळी, गुरुजन, वरिष्ठ या साऱ्यांना आपण पत्राद्वारे भेटू शकतो, विचार पोहोचवू शकतो, माहिती मागवू शकतो, संदेश पाठवू शकतो. या उपयुक्त कलेचा, लेखनप्रकाराचा सराव आणि सखोल अभ्यास तुम्ही-आम्ही म्हणूनच करायला हवा.

पत्रलेखनाचे ढोबळमानाने पुढील प्रकार आहेत.

१. निमंत्रण
२. अभिनंदन
३. शुभेच्छा
४. सांत्वन
५. आभार
६. मागणी
७. तक्रार
८. निवेदन, माहिती
९. घरगुती पत्र (खुशाली)
१०. नोकरीकरिता अर्ज
११. हिशेब, वसुली

पत्र लिहिताना पुढील गोष्टी ध्यानात ठेवा—

(१) पत्राच्या वरच्या बाजूस, उजव्या हाताच्या कोपऱ्यात पत्र लिहिणाऱ्याचा पूर्ण पत्ता आणि तारीख लिहावी. व्यवस्थितपणा अंगी मुरला आहे, अशी माणसे लिखाणाची वेळही नमूद करतात.

(२) पत्राच्या वर मध्यभागी ॥ श्री ॥ लिहावे.

(३) पत्राचे स्वरूप आणि पत्र ज्याला धाडणार आहोत त्याचे वय, लहान-मोठेपण लक्षात घेऊन 'मायना' लिहावा.

(४) घरगुती पत्राचा विषय लिहिण्याची गरज नाही. मात्र कार्यालयीन किंवा व्यावसायिक कामकाजविषयक पत्र लिहिताना विषय अवश्य नमूद करावा.

(५) मायन्यानंतर योग्यतेनुसार अभिवादन आणि त्यानंतर पत्राचे कार्यकारण स्वरूप लक्षात घेऊन त्यानुसार विस्तार करावा.

(६) समर्पक, नेमक्या शब्दांत समारोप केला जावा.

(७) पत्र धाडणारा आणि ज्याला पत्र मिळणार आहे, या दोघांतील स्नेहसंबंधानुसार उल्लेख करून मग स्वाक्षरी केली जावी. (परीक्षेच्या वेळी स्वतःचा उल्लेख विद्यार्थ्यांने टाळावा.)

(८) भाषा सहजसोपी, सुबोध, आकर्षक असावी. रूक्ष, रटाळ भाषा टाळून

घरगुती पत्रात भावनेचा ओलावा असावा.

(९) पत्र ज्याला पाठवायचे, त्याचा संपूर्ण पत्ता (पिनकोड सहित) लिहावा. (नमुना पहावा.)

थोडक्यात, पत्रलेखन हा व्यक्तिजीवनात एक आवश्यक, जिव्हाळ्याचा विषय आहे. व्यवहारासाठी, आंतरिक ओढीसाठी, खुशाली कळण्या-कळविण्यासाठी आपण पत्राचा आधार घेतो, म्हणून पत्र वाचनीय असले पाहिजे, सुस्पष्ट असले पाहिजे, आकलनीय व्हायला पाहिजे. पत्रात सौजन्य असावे, आर्जव असावे, आस्था असावी, अकृत्रिमता असावी. मुख्य म्हणजे पत्र आटोपशीर असावे.

पुढील गोष्टी ध्यानात ठेवा.

| जिला पत्र धाडायचे ती व्यक्ती | मायना— | |
|---|---|---|
| १. वडीलधारी माणसे | तीर्थस्वरूप | शि. सा. नमस्कार |
| | * शेवट— आपला/आपली | |
| २. समवयस्क मंडळी मित्र | प्रिय | सप्रेम नमस्कार |
| | * शेवट— तुमचा/तुमची तुझा/तुझी | |
| ३. छोटा भाऊ, बहीण, मित्र इ. | प्रिय | आशीर्वाद<br>शुभाशीर्वाद<br>सर्वोत्तम आशीर्वाद |
| | * शेवट— तुझा/तुझी | |
| ४. त्रयस्थ | मान्यवर, महोदय, महाशय | स. न. वि. वि. |
| | * शेवट— आपला नम्र<br>आपला विश्वासू | |

## (१) अभिनंदन

॥ श्री ॥

१३/१०३, 'सीताकुंज'
गल्ली क्र. ७,
पुणे.
दि. ७ जुलै १९९१

प्रिय चि. समीर,

अनेक उत्तम आशीर्वाद.

आज 'केसरी'त झळकलेला तुझा फोटो पाहिला आणि अभिमानाने ऊर भरून आला. स्केटिंग स्पर्धेत सुवर्णपदक पटकावलेला समीर माझा दादा आहे, असं छोटी मिनू ज्याला त्याला सांगत सुटली. तुझा फोटोही तिनं साऱ्या चाळीला दाखवला. शाब्बास पठ्ठे ! त्रिवार अभिनंदन. आता शाब्दिक पण नंतर प्रत्यक्षात येऊन तुला भलंमोठ्ठं बक्षीस देणार आहे मी ! घराण्याचं नाव काढलंस, पोरा ! भाऊ आणि मी आज धन्य धन्य झालो. माझी कॉलर तर एकदम ताठ झालीय. आहे की नाही गंमत !

तुझी जिद्द, मनापासून केलेले परिश्रम आणि सरांचे लाभलेले कुशल मार्गदर्शन या तिन्हींमुळेच आज तू या नेत्रदीपक यशाचा मानकरी बनलास. कौतुक करावे तितके थोडेच ! आज राज्यपातळीवर मर्दुमकी गाजवलीस, पण नजर उद्याच्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये मिळणाऱ्या यशाकडे लागायला हवी, खरं ना ! आता यशाकडेच सदा झेप घ्यायची. आजीनं इथूनच दृष्ट काढलीय तुझी ! डोळे पाणावलेले आणि हातात तुझा फोटो— आज कधी नव्हे ती देवपूजाही थांबलीय. असो.

पुन्हा एकदा हार्दिक अभिनंदन.

तुझाच,
छोटू काका.

## (२) सांत्वनपर पत्र

॥ श्री ॥

८/२१ सुख निवास,
रानडे रोड,
दादर.
दि. ६ नोव्हें. १९९०

प्रिय संजूस,

स. नमस्कार.

पत्रापेक्षा प्रत्यक्ष येऊन खरं तर तुझं सांत्वन मी स्पर्शातून करायला हवं. मनुआजी गेल्याचं तुझ्या मावशीनं फोनवरून सांगितलं मात्र मी रडायलाच लागलो. आई-बाबा किती वेळ शांत करण्याचा, समजाविण्याचा प्रयत्न करत होते, पण मला मात्र रडू आवरत नव्हतं. छान छान गोष्टी सांगणारी, आवडते पदार्थ करून खाऊ-पिऊ घालणारी आणि उदंड माया करणारी तुझी मनुआजी. तिचा प्रेमळ चेहरा नजरेसमोरून अजूनही हटत नाहीये.

माझी ही अवस्था, मग तुझी काय स्थिती असेल याची कल्पनाच करवत नाही. तू तर तिचा लाडका 'सोन्याचा तुकडा'. केवढा अभिमान होता तिला तुझा ! आपलं काही चुकलं, तर किती हळुवारपणे समजावून सांगायची ती ! संजू, आपल्यावर प्रेम करणारी मनुआजी अशी कशी रे गेली न सांगता सवरता ? आभाळागत माया करणारी मनुआजी, पुन्हा कध्धी कध्धी दिसणार नाही. छे ! मग आपल्या यशाचं तोंडभरून कौतुक यापुढे कोण रे करणार ?

दोस्ता, कशी समजूत घालू रे तुझी ? ए, पण तिला रडलेलं आवडायचं नाही ना ! आठवतं ? लगेच म्हणायची, 'रडायचं कशाला ! रडून का संकटं टळतात ?' आठवलं ? म्हणूनच तिच्या सांगण्याप्रमाणे आपण हे कटू सत्य स्वीकारायला हवं. तिची इच्छा पुरी करण्यासाठी धडपडायला हवं, श्रमायला हवं. खरं ना ! आता आजोबांना अधिक जपायला हवं. तुझ्या बाबांनाही मातृवियोगाचं दुःख सहन करावं लागतंय ना ! त्यांची काळजी घे. जास्त काय लिहू ? मी तुमच्याच घरातला— या दुःखद प्रसंगी माझ्याबरोबर माझे आई, बाबा आणि

दादाही तुम्हा सर्वांच्या पाठीशी आहेत. सुट्टी लागली की इकडे येशीलच. मोठ्यांस नमस्कार. शुभास आशीर्वाद.

ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो.

तुझा,
राजू

---

## (३) निमंत्रण पत्र

---

॥ श्री ॥

'प्रशस्ती'
१०१/१७ गोखले पथ,
विलेपार्ले (पूर्व)
मुंबई.
दि. ५ जाने. १९९१

माननीय रा. रा. गोपाळराव यांस,

सस्नेह, सादर नमस्कार.

ईशकृपेने लवकरच आम्ही आमच्या नव्या वास्तूत राहण्यासाठी जाणार आहोत. २२ जानेवारी रोजी वास्तुशांत करण्याचे योजिले असून त्यानिमित्त स्नेहमेळावा आणि अंगतपंगत, असा कार्यक्रमही आखलेला आहे. निमंत्रणपत्रिका धाडत आहेच. आपण अन्य कार्यक्रम ठेवू नये, म्हणून हे निमंत्रणपत्र पाठवीत आहे. वास्तुशांतीसाठी आपण दोन दिवस आधीच सहकुटुंब सहपरिवार यावयाचे आहे, हे लक्षात असू दे. घर आपल्या स्वागतासाठी सिद्ध आहेच. लोभ वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

आपला स्नेहाकांक्षी
माधव भिडे आणि भिडे परिवार

## (४) मागणी पत्र

प्रगती विद्यालय,
नगर.
१५ जून १९८९

प्रति,
माननीय संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ,
पुणे.

स. न. वि. वि.

विषय : शाळेच्या ग्रंथालयासाठी आवश्यक असलेल्या पुस्तकांची मागणी करणे.

आपल्या मान्यवर प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेली पुढील उपयुक्त पुस्तके आम्हाला तातडीने हवी आहेत. कृपया आपण आमच्या मागणीपत्राला अग्रहक्क देऊन त्यानुसार त्वरित पुस्तके पाठविण्याची व्यवस्था करावी. सोबत आपण बिल पाठवावे, म्हणजे तेवढ्या रकमेचा धनादेश त्वरित पाठविण्याची व्यवस्था आम्हाला करता येईल.

पुस्तकांबद्दल योग्य ती सूट आपण आम्हाला द्यालच.

| पुस्तकाचे नाव | इयत्ता | प्रतीसंख्या |
|---|---|---|
| बालभारती | ५ वी | ५० |
| बालभारती | ६ वी | ५० |
| कुमारभारती | ८वी, ९वी, १० वी | प्रत्येकी ६० प्रती |

आपला कृपाकांक्षी,
अ. म. जोशी
(मुख्याध्यापक)
प्रगती विद्यालय, नगर

# परिशिष्ट—

## *(अ) निबंध विषय (सरावासाठी)*

क्रम विषयाचे नाव

१. सुट्टी नसतीच तर !
२. सूर्याचे मनोगत
३. कंटाळा आला अभ्यासाचा !
४. हिमालय बोलू लागला !
५. फोनची कैफियत
६. आजच्या काळातले सीमोल्लंघन
७. वाचाल म्हणजे वाचाल
८. आमचं खेडं
९. घराचे मनोगत
१०. पानशेत धरण बोलू लागले
११. मेघराजा रुसला तर !
१२. आमची वर्षासहल
१३. जय जवान जय किसान

१४. बलिदान आणि आम्ही मुलं
१५. निसर्गग्रंथ अभ्यासा
१६. माझा आवडता खेळाडू
१७. माझी स्वप्नं
१८. ध्येयसिद्धीसाठी !
१९. उत्सव असे साजरे करू या
२०. सण दिवाळी, दिवाळी
२१. आला आषाढ, आषाढ
२२. मी डेक्कनक्वीन बोलतेय !
२३. माझे आवडते साप्ताहिक
२४. स्वातंत्र्यसैनिकाचे मनोगत
२५. शापित वास्तू बोलू लागली !
२६. पंख हवे मज...
२७. तुरुंगाचे मनोगत
२८. पत्र नव्हे मित्र
२९. माझा एस.टी. चा प्रवास
३०. खरंच देव आहे का ?
३१. स्वामी विवेकानंदांचे कार्य
३२. संतांचे कार्य, संतांची शिकवण
३३. ये रे ये रे पावसा
३४. गावची जत्रा
३५. मी पाहिलेली सर्कस
३६. भविष्य आपुल्या हाती
३७. अपघाताच्या कथा-व्यथा
३८. आमचे स्नेहसंमलेन
३९. तिळगूळ घ्या गोड बोला
४०. दैनंदिन जीवनात विज्ञान
४१. संगणक आणि आम्ही
४२. दूरदर्शन आणि मी

४३. मानवतेचे पुजारी
४४. अशी घडावी देशसेवा
४५. आदर्श समाजसेवक
४६. विज्ञानाचे चमत्कार
४७. मी अदृश्य झालो तर !
४८. 'लापता'तला चेहरा बोलू लागला
४९. मी स्वयंपाक करतो
५०. हो, मी सिंहगड बोलतोय !
५१. जीवन एक धडपड, एक संघर्ष
५२. चूल बोलू लागली !
५३. बचत
५४. प्रगतीचा ध्यास हवा
५५. मी आहे घड्याळ
५६. क्षण : जगाचा निर्माता
५७. मनुष्य अमर झाला तर !
५८. सगळेच शतायुषी झाले तर !
५९. भंडावलं या महागाईनं !
६०. आरोग्य श्रेष्ठ की पैसा ?
६१. मी संरक्षणमंत्री झालो तर !
६२. माझ्या कल्पनेतील शाळा
६३. देश माझा, मी देशाचा
६४. जोगेश्वरीची कैफियत
६५. फुटका बुरुज बोलू लागला
६६. मी तिरंगा बोलतोय
६७. माझी आवडती कविता
६८. अपंगाचे मनोगत
६९. नको त्या निवडणुका !
७०. संप ! संप ! संप !
७१. आपली सार्वजनिक कर्तव्यं

७२. रात्रीचे मनोगत
७३. साक्षरता प्रसार कार्यात माझा वाटा
७४. चाळीचे मनोगत
७५. पुतळे बोलू लागले तर !
७६. असे साजरे करू या वाढदिवस !
७७. हुतात्म्यांची खरी स्मारके
७८. मी पंजाबवासी बोलतोय !
७९. रानफुलाचे मनोगत
७०. सागरकिनाऱ्याची कथा-व्यथा
८१. मी वही बोलतीय !
८२. शिवराज अवतरले तर !
८३. मी पर्वती बोलतीय !
८४. चांदण्या रात्री फेरफटका
८५. शब्दांचे सामर्थ्य
८६. आम्हा विद्यार्थ्यांच्या मागण्या
८७. मातृभाषा-शिक्षणाचे माध्यम
८८. मीही माणूस आहे !
८९. जनसेवा खरी ईशसेवा
९०. हुंडाबळी : एक भयानक समस्या
९१. मी 'चहा' बोलतोय
९२. सुसंगती सदा घडो
९३. हरवलेले बालपण
९४. वृत्तपत्रांचे कार्य
९५. भिंतीवरी कालनिर्णय असावे
९६. देण्यातले सुख
९७. आकाशवाणी-लोकशिक्षणाचे साधन
९८. ध्वनिक्षेपक बंद पडतो तेव्हा
९९. नको तो रविवार
१००. सकाळी उठोनी—

१०१. जीवन हीच एक शाळा
१०२. माझे रिकामपणाचे उद्योग
१०३. सारं फुकट मिळालं तर
१०४. राष्ट्राचे ऋण
१०५. जाहिरातीची कला
१०६. फॅशनच्या दुनियेत !
१०७. भ्रष्टाचार : एक महारोग
१०८. श्रमाचे मोल
१०९. खनिज तेल संपले तर !
११०. मी आरसा बोलतोय !
१११. एक तरी ओवी अनुभवावी
११२. ही भूमी असे कैकांची !
११३. आमची गल्ली, आमची पेठ
११४. अनुभवलेली रम्य पहाट
११५. मी केलेले सत्कर्म
११६. माझी आई : एक आदर्श माता
११७. जननी-जन्मभूमी
११८. रक्षाबंधन
११९. नको असलेले पाहुणे
१२०. शाळेची घंटा बोलू लागली
१२१. आला वसंत
१२२. माझी आवडती कथा
१२३. आम्ही चालवू हा पुढे वारसा
१२४. भारताचे नंदनवन
१२५. मुलांचे लाडके नेहरूचाचा
१२६. शाळा बोलू लागली !
१२७. शाळेचा निरोप घेताना
१२८. याला जीवन ऐसे नाव
१२९. एक अविस्मरणीय क्षण

१३०. छंद जोपासा
१३१. पावसाळ्यातल्या गमती-जमती
१३२. बंद, बंद आणि आम्ही
१३३. मी केलेले साहस
१३४. आई नोकरी सोड !
१३५. मोलकरणींचा संप : एक वैताग
१३६. रात्र नसती तर !
१३७. यंत्राची कैफियत
१३८. सूर्यकिरणे बोलू लागली
१३९. जीवनात परीक्षांचे महत्त्व
१४०. गिरिभ्रमणातला आनंद
१४१. अडू नका, खचू नका
१४२. वार्धक्य : कथा-व्यथा
१४३. जग हीच शाळा
१४४. माझ्या कल्पनेतले आदर्श कुटुंब
१४५. घर असे असावे
१४६. एका खेडुताचे मनोगत
१४७. जाहिराती आणि आम्ही
१४८. जीवनात झाड व्हा
१४९. आनंदाच्या माझ्या कल्पना
१५०. राष्ट्रीय एकात्मता
१५१. मनाचे सामर्थ्य
१५२. शब्द नसते तर !
१५३. मी मुका झालो तर !
१५४. मनाचे अपंगत्व
१५५. आजच्या गरजा
१५६. दानात दान
१५७. निसर्गशाळेत काही तास
१५८. कवी नसते तर !

१५९. अंधश्रद्धा आणि आम्ही !
१६०. गुण वेचावे, वेचावे
१६१. माझ्यातले गुण-दोष
१६२. माझी आवडती कला
१६३. माझा लाडका विषय
१६४. मने-मनगटे : खरे भांडवल
१६५. भारतीय शास्त्रज्ञ
१६६. जीवन व्हावे सोने
१६७. एक आदर्श खेळाडू
१६८. आपत्ती : माणसाची खरी कसोटी
१६९. सत्य वदावे, प्रिय बोलावे
१७०. आमचे फॅमिली डॉक्टर
१७१. शिक्षणाचे माध्यम कोणते असावे ?
१७२. कोकणचा निसर्ग
१७३. मी एक भटक्या
१७४. तबला बोलू लागला
१७५. गानकोकिळा लता
१७६. अभंग तुकयाचा !
१७७. माझी माणसं
१७८. विश्वचि माझे घर
१७९. मी धबधबा बोलतोय
१८०. आळसे कार्यभाग नासतो
१८१. भगवंत भुकेला भक्तीचा
१८२. लोकशाही : आदर्श राज्यपद्धती
१८३. जय जय महाराष्ट्र माझा
१८४. लॉटरीचे तिकीट बोलू लागले
१८५. गर्दी ! गर्दी ! गर्दी !
१८६. क्रीडांगणाची कैफियत
१८७. व्रतवैकल्ये आणि आम्ही !
१८८. आला फेरीवाला
१८९. उंचीचे फायदे-तोटे
१९०. निसर्गराजाचा दरबार
१९१. उंच इमारतीचे मनोगत
१९२. संत गाडगेबाबा
१९३. सावधान ! सावधान
१९४. सौजन्य सप्ताहातल्या गमती-जमती
१९५. नको विषमता हवी समता
१९६. मी भाजी आणतो
१९७. वठलेल्या वृक्षाचे मनोगत
१९८. स्वातंत्र्य मिळाले, पण...
१९९. पसायदान : एक श्रेष्ठ प्रार्थना
२००. एका युवकाचे मनोगत
२०१. मतिमंदांच्या समस्या
२०२. मला आवडलेला चित्रपट
२०३. मी आणि विनोद

*

## (ब) सुविचार (विस्तारासाठी- अनुच्छेद लेखन)

१. विनयशीलता ज्ञानाचा शुभारंभ
२. निकोप मन, खरा दागिना
३. मनी असावी भूतदया
४. क्षण मोहाचा टाळावा
५. परिश्रमी व्हा
६. बलदंड होऊ या
७. हात असू दे देण्यासाठी
८. पुरुषार्थ गाजवणे म्हणजे जीवन
९. भिऊ नको, अडू नको
१०. नको दुर्बलता, हवी सबलता
११. यत्नाची कास धरा
१२. ध्येयाची आस असू दे
१३. मन असू दे प्रसन्न
१४. आचरण डोळस हवं.
१५. वाचावीर नको, कृतिवीर व्हा.
१६. ज्ञानदीप उजळू या
१७. अंधश्रद्धा म्हणजे अज्ञान
१८. संकटांना सामोरे जा
१९. आधी करा मग सांगा
२०. विनयाचा साज हवा
२१. आशीर्वाद लाख मोलाचा
२२. चांगलं पेरा, चांगलं उगवेल
२३. कुरबुर नको, मैत्री कर
२४. मनोनिग्रह हवा
२५. अपव्यय टाळा
२६. चैतन्य म्हणजे जीवन
२७. स्थिरता म्हणजे मृत्यू
२८. दीर्घोद्योगी बना
२९. रडू नको, कुढू नको.
३०. मनाचे समाधान, खरा पुरस्कार

*

## (क) कल्पनाविस्तार

१. मानवाच्या एकतेची पूर्ण होवो कल्पना
२. वेदना जाणावयाला जागवू संवेदना
३. एकजूट ही पाहून पडतील अन्यायाला तडे

४. आचंद्रसूर्य नांदो स्वातंत्र्य भारताचे
५. माणसास माणूस येथे मानणार केव्हा ?
६. तेथे कर माझे जुळती
७. ही तहान सांगा केव्हा संपायाची ?
८. पावतो विमलशा भक्ता
९. तुझ्यावरी विसंबुनी कितीक काम टाकले
१०. घेती हिरीदाचा ठाव, ऐका ताटीचे अभंग
११. वैभव होता माजो नये
१२. परोपकार सांडू नये, परपीडा करू नये
१३. दिशादिशांतून घुमवा येथे समतेचा संदेश
१४. एक फुलाच्या विविध पाकळ्या
१५. लाल रगत सांडते हिर्वं सपन फलते
१६. तू हो परिस्थितीवर स्वार
१७. माझे मीपण गळून जावे
१८. क्षण चमकुनि मी विलुप्त व्हावे
१९. पवित्र मजला सत्यासाठी, धडपडणारे स्वतंत्र डोके
२०. दास एकांती राहतो, चिंता विश्वाची वाहतो
२१. रामराज्य यावे अखिल भूमंडळी
२२. संत नाम गाय कामधेनू
२३. त्वचेलाही फुटतील शब्दांचे धुमारे
२४. आमचं नालंदा तुमचं घर
२५. शोधावा नवा नवा रस्ता
२६. मनामनात उरावा, फक्त प्रेमाचा सुवास
२७. अशी पुसावी आसवे, ओठी हासू फुलवावे
२८. देव भावाचा भुकेला
२९. नित भजि जो मानवतेला, तोचि आवडे देवाला
३०. असाध्य ते साध्य, करिता सायास

REFBK-0026570

# निबंध लेखन : संकल्प ते सिद्धी

**आशयघन आंचार-विचार ।**
**शब्द, सुविचारांचे मौलिक भांडार ।।**
**अवलोकन, मनन, चिंतन, जागर ।**
**यातून होई निबंध साकार ।।**

व्रत घ्या, वसा घ्या,
अवलोकनाचा, वाचनाचा, अनुभव वेचण्याचा,
बहुश्रुत होण्याचा, कलात्मक शैलीचा अन् कौशल्यपूर्ण मांडणीचा.
व्रत स्वीकारुन वसा घ्या
संकल्पाकडून सिद्धीपर्यंत जाण्यासाठी अखंड वाटचालीचा —
तरच निबंधलेखन कला तुम्हालाही साध्य होईल.

उन्मेष प्रकाशन